
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय [illegible]
सं. क्र. ६८८



# कॉसमॉसने बारा दिवस

शीला शिवदे



REFBK-0025220

संदर्भ [illegible]
६८८
२५२२०
३०।१२।८६

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JAN 1987
1 FEB 1987
22 FEB 1987
11 MAR 1987
19 MAR 1987
15 APR 1987
22 APR 1987
3 MAY 1987
29 JUL 1987
1 JAN 1988
13 JAN 1991

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

# कॉसमॉस ने बारा दिवस

सौ. शीला शिवदे

REFBK-0025220

हीरक प्रकाशन

नागपूर

प्रकाशिका :

सौ सीमंतिनी सहस्रबुद्धे,
'कला निवास' हनुमान पथ,
धरमपेठ, नागपूर–१०

प्रथमावृत्ती : गणेश चतुर्थी
(७.९.८६)

मुद्रक
सोनी प्रिंटर्स,
रामदासपेठ, नागपूर–१०

© सौ. शिवदे

मूल्य रुपये ३०

प्रकाशन क्रमांक : २३

माझे प्रेरणास्थान

प्रिय अशोक यास

प्रेमपूर्वक अर्पण

# मनोगत

माझे पहिलेच पुस्तक वाचकांच्या समोर ठेवताना एक प्रकारची धाकधुक वाटते आहे त्याचे यशापयश वाचकच ठरवतील

प्रत्येक गोष्टीला प्रेरणा तर लागतेच पण योगही यावा लागतो अनेक वेळा अमेरिकेच्या वाऱ्या करुनही अमेरिकेवर लिहायचा योग आला नाही

परन्तु गेल्यावर्षी प्रथमच युरोपची ट्रीप करायची ठरवली व त्याच सुमारास ह्या पुस्तकाचे प्रकाशक श्री. सहस्त्रबुद्धे ह्यानी प्रवासवर्णनांवरची पुस्तके प्रसिद्ध करायची ठरवली हा योगायोगच त्यानी युरोपवरचे पुस्तक मागितले. माझी मैत्रिण सौ सुलभा हेर्लेकर व पती डॉ अशोक शिवदे ह्यानी प्रोत्साहन दिले म्हणूनच मी लिहिण्याचा प्रयत्न केला. प्रथम एवढ काय लिहिणार अस वाटत होत, ते नतर मर्यादित पानांत बसवताना माझी तारांबळ उडाली

युरोपातील सर्व देशांना सृष्टी सौंदर्याचे वरदानच आहे प्रत्येकाचा इतिहास ख्रिस्तपूर्व काळा पासून सुरु झाला आहे प्राचीन व अर्वाचीन ह्याचा सुरेख सगम इथे दिसतो प्रवास करताना कोणालाही लिहिण्याची स्फूर्ती यावी असे हे देश वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया मोकळे पणाने जरुर कळवाव्यात.

दि ७ ९ ८६ सौ. शीला शिवदे

ग्रंथालय ठाणे

# जम्बोच्या सहवासांत

एखाद्या प्रचंड गरुडाने आकाशात झेप घ्यावी व स्वच्छंदपणे विहार करावा तशी आमच्या विमानाने मुंबईच्या विमानतळावरुन डौलात आकाशात झेप घेतली व हळू हळू एकेका हवेच्या थराला भेदत ढगाच्याही वरुन भरारी मारायला सुरवात केली आता आमचे कुवेत एअरवेजचे जंबो जेट २५ हजार फुटावरुन चालले होते.

अनेक वेळा अमेरिकेचा दौरा केला असल्याने खिडकीशी जागा मिळाली नाही तरी काही वाटले नाही नेहमीच्या अनुभवावरुन खिडकीतून, नुसता कापूस पिंजून ठेवावा तसे पांढरे शुभ्र, मधून मधून काळे, सोनेरी व रुपेरी कडा असलेले ढगच ढग दिसतात हे माहितच होते ढगांचा समुद्रच कधी कधी बर्फाच्छादित पर्वतराजी असल्याचा पण भास होतो त्या ढगाचे असंख्य आकार तयार होत असतात, विरत असतात तो ढगाचा खेळ बघण्यात खरोखर मजा येते मधूनच विमान खाली जाते तेव्हा मात्र एखाद्या देशावरुन जात असेल तर खालच्या नद्या, नदी पर्वत व रस्ते इतके रेखीव दिसतात की शाळेत असताना आपण देशाचा नकाशा काढायचो त्याची आठवण व्हावी

सर्व प्रवासी जागेवर स्थिरस्थावर होत नाहीत, तोच हवाई सुंदरी फळाच्या रसाचे ट्रे घेऊन आली. संत्र्याच्या रसाची चव जिभेवर आहे तोच ब्रेकफास्ट, खाद्यपदार्थांनी भरलेले ट्रे इतके सुबक व सुंदर असतात की जवळ ठेवून घ्यायचा मोह व्हावा. पाठोपाठ चहा कॉफी आली खाण्यापिण्याच्या नादात कितीवेळ गेला ते समजलेही नाही आबुधाबी जवळ आल्याची घोषणा व्हायला लागली सतत

चरत ठेऊन प्रवाशाना इतर कसला विचार करायला फुरसतच देत नाहीत प्रवासी पण किती खायच आता काही नको, अस एकमेकात म्हणत यथेच्छ पुख्खा झोडतात

खाण्याच्या बरोबरच इयरफोन्स कानाला लावून सगीताची पण मेजवानी घेता येते सगीताकरता पाच चॅनल्स असतात. एका चॅनलवर मायकेल जॅक्सन किवा मॅडोना असते बर दुसऱ्यावर वसतराव देशपाडे किवा भीमसेन जोशी तिसऱ्यावर रविशकरची सतार तर चौथ्यावर फिल्मी गाणी व पाचव्यावर पाश्चिमात्य सिंफनी ऐकायला मिळते मुबई–लडन ह्या प्रवासात एक व नतर लडन–न्यूयॉर्क एक असे दोन चित्रपट बहुतेक ऐअर लाईन्स दाखवतात

आबुधाबीला विमान थाबल पण आम्हाला विमानातच बसायचे होते. फक्त कर्मचारी बदलले व जेवणाचे ट्रे चढले पाऊण तासात परत जम्बोने झेप घेतली.

आता चित्रपट दाखवतील असे वाटले पण परत कुवेतला थाबायचे असल्याने वेळच नव्हता आमच्या बरोबर आमचे मित्र अशोक व जयश्री पटवर्धन होते त्यामुळे प्रवास कटाळवाणा वाटत नव्हता

लडनला उतरून, पुढे लडनहून निघणाऱ्या कॉसमॉस ट्रॅव्हल एजन्सीची बारा दिवसांची युरोपची ट्रिप आम्ही ठरवली होती ही एक जगप्रसिद्ध एजन्सी आहे त्याच्या अनेक टूर्स आहेत सात दिवसापासून तर पचेचाळीस दिवसापर्यंत, निरनिराळी शहरे व देश प्रत्येकाचे दर निराळे आम्ही बारा दिवसाच्या ट्रिपचे माणशी २९९ पौंड, व विम्याचे १० पौंड भरले होते शिवाय ऐच्छिक ट्रिप्सचे वेगळे भरायचे होते ऐच्छिक ट्रिप्सची यादी दिलेली होती त्याचे दर पण पुढे दिलेले होते. आपल्याला कोणत्या ट्रिप्स घ्यायच्या ते नतर प्रवासाच्या सुरवातीला ठरवून त्याचे पैसे वेगळे भरायचे होते. कॉसमॉसचे रिझर्वेशन आमचे स्नेही डॉ. लाजेवार ह्याचे एक नातेवाईक श्री मुरलीधर काळबाडे ह्यानी केले होते आम्ही

लडनला त्याचेकडेच उतरणार होतो त्याना आम्ही प्रथमच भेटणार होतो. कस स्वागत होतय ह्या विषयी काळजी वाटत होती.

गप्पाच्या नादात किती वेळ गेला ते कळलेही नाही परत एकदा चहा–कॉफी बिस्किटे आली आमच्या घड्याळात साडे बारा झालेले असले तरी कुवेतला साडेदहाच वाजलेले होते त्यामुळे जेवणाची वेळ झालेली नव्हती

कुवेतला आम्हाला विमान बदलायचे होते विमान कुवेत एअरपोर्टवर अलगद उतरले व ते एका बोगद्याला लागले त्या बोगद्यातूनच आम्ही लाऊजमधे आलो, त्यामुळे बाहेरची गर्मी किंवा रखरखीतपणा जाणवला नाही बोगदा व एअरपोर्टची बिल्डिंग छोटीच पण सुदर व स्वच्छ आहे गुळगुळीत सगमरवर सगळीकडे वापरलेला आहे बिल्डिंगच्या आजूबाजूला कित्येक मैल कुठेही वस्ती दिसली नाही झाडे किंवा टेकड्याही दिसल्या नाहीत रुक्ष व वैराण प्रदेश आहे हा एअरपोर्टच्या बाजूला मात्र एका बाजूला मुद्दाम लावलेली कृत्रिम झाडी तयार केलेली आहे तसेच बाफ्चामधे झेंडू, फ्लाक्स व सदाफुली वगैरे ओळखीचीच फुलझाडे फुललेली होती

दीड तासाने आमच्या दुसऱ्या जम्बोने परत आकाशात भरारी मारायला सुरवात केली आता आम्हाला जेवण मिळाले लडन म्हटल्यावर दोन वर्षांपूर्वीचा एक किस्सा आठवला ब्रिटिश एअरवेजची मुबई–न्यूयॉर्क ही फ्लाईट रद्द झाल्याने आम्हाला एअर-इडियाने लडन पर्यंत आणले होते. पण इथूनही पुढची फ्लाईट न मिळाल्याने लडनला हॉटेलमधे आमची सोय केली होती त्यावेळी मी एकटीच प्रवास करत होते हॉटेलमधे पोहोचल्यावर ह्यांना फोन करण्याकरता रात्री बारापर्यंत जागाव लागल होत. कारण अमेरिका व इग्लंड ह्यामधे सात तासाचा फरक हे पाच नतर घरी भेटणार तो पर्यंत वेळ काढायला टी. व्ही लावला तर 'मिस युनिव्हर्स' ही स्पर्धा बघायला मिळाली. जवळ पौंड नव्हते पण कलेक्टकॉल लावता आला ऑपरेटरला नबर मागितला की ती

दुसऱ्या पार्टीला कॉल घ्यायचा का ? म्हणून विचारते, त्या पार्टीने हो म्हटल की फोन जोडून देते कारण ह्या कॉलचे बिल फोन घेणाऱ्या पार्टीला जाते

विचाराच्या तन्द्रीत केव्हा तरी झोप लागली ते एअर होस्टेसच्या घोषणेनेच जाग आली विमान लंडनच्या हीथ्रो विमानतळावर उतरत होते सीट बेल्ट बांधण्याचे आवाज यायला लागले व काही वेळातच एक छोटासा हादरा बसून विमान धावपट्टीवर धावू लागले.

लंडनचा हा एअरपोर्ट खूप मोठा आहे तरी सुद्धा सदोदित गजबजलेला असतो इथूनच विमान बदलून युरोपांत जाता येत तसच युरोपातून इतर ठिकाणी जाता येत. लंडन हे जंक्शनच आहे म्हटल तरी काही वावग होणार नाही पॅसेंजर लाऊंजमधे जाताना वाटेत सरकते रस्ते आहेत त्यावर नुसते उभे राहायचे की रस्ताच सरकतो ह्या खेपेस आम्हाला लंडनलाच उतरायचे असल्याने तिकडे जायचेच नव्हते

कस्टममधून विनासायास बाहेर पडलो टोकन म्हणून अधून-मधून एखाद्याची बॅग तपासत होते. पटवर्धनाना बॅग दाखवावी लागली खाद्यपदार्थ बरोबर होते पण नशीबाने त्याच्या लक्षात आले नाही

बाहेर पडलो तर होस्ट मंडळी हजरच होती प्रथम नागपूरचे डॉ वझे दिसले त्यांना पाहून आश्चर्यच वाटले ते दरवर्षी लंडनची ट्रिप करतात सध्या ते नागपूरला स्थायिक झाले आहेत त्याच्या मागे लपलेली एक वामन मूर्ती तेवढ्यात पुढे झाली व त्यानी हॅलो म्हणून हस्तांदोलनासाठी हात पुढे केला तेव्हा त्याच्याकडे आमचे लक्ष गेले व हेच श्री काळबांडे असल्याची खात्री पटली, तेवढ्यात हसत हसत सौ काळबांडे पण पुढे आल्या दोघाचे प्रसन्न व्यक्तिमत्व बघून व आगत्य बघून कित्येक दिवसाची ओळख असल्या सारख वाटू लागले अस सुंदर स्वागत झाल्यामुळे आमच टेन्शन पार नाहिस झाल

त्यांच्या छोटचाशा कारने आम्ही त्याच्या घरी गेलो त्याच घर लडनच्या एजवेअर ह्या सब्रबमधे आहे

घर छोटस व कॉमनवॉलच असल तरी दुमदार व स्वच्छ आहे तीन बेडरुम्सच असल्याने आम्हाला स्वतत्र खोली मिळाली चहा पाणी झाल्यावर आमच्या युरोपच्या ट्रिपची कागदपत्र त्यानी आम्हाला दिली आम्ही सहा तारखेला सकाळी लडनच्या व्हिक्टोरिया बस स्थानकावरुन निघणार होतो दोन दिवस लडन बघायला होते आज आराम करुन उद्या सकाळी हिंडायला जायचे ठरवले

अशोक व जयश्री पटवर्धन त्याच्या भावाकडे उतरले होते डॉ वझे आमचे बरोबरच होते रात्री बऱ्याच गप्पा रगल्या. जोत्स्ना काळबाडे लग्नाच्या आधी पासून लडनलाच रहाते आहे तिचे आईवडील श्री बिजवे पण लडनलाच असतात ती एज्युकेशन डिपार्टमेंट मधे ऑफिसर आहे तर मुरली काळबाडे ट्रान्सपोर्ट मधे दोघेही कामावर जाणार म्हणून डॉ वझेच आम्हाला हिंडवणार होते.

विमानात आराम असला तरी बसून बसून शरीर अवल्या-सारख झाल होत रात्री कधी झोप लागली ते समजलही नाही

# लंडन

आज ४ मे सकाळी नाश्ता करून आम्ही बाहेर पडलो लंडन मधील प्रेक्षणीय स्थळ सर्व डाऊनटाऊन मधेच आहेत व हा भाग सदोदित एवढा गजबजलेला असतो की ह्या भागात कारने हिंडण महाकठीण होत कार पार्क करायला जागाच मिळत नाही व शोधण्यात फार वेळ जातो परत रस्ते लहान व अनेक लंडनदर्शन बसेस व कार्सने रस्त्यात ट्रॅफिकजॅम असतो एक एक इंच सरकायला एक एक मिनिट जातो तेव्हा लंडन बघायला कारने जाणे मूर्ख-पणाचे ठरते त्या विषयी एक जोक सांगतात,

एका माणसाला उशीरा ऑफिसमधे आल्याबद्दल त्याच्या बॉसने जाब विचारला तेव्हा तो म्हणाला मी कारने येण्याचा मूर्ख-पणा केला पार्किंगला जागा शोधता शोधता मी घरीच पोहचलो व गाडी गॅरेजमधे पार्क करून बसने आलो

आम्ही चालतच मेट्रोच्या स्टेशनवर गेलो मे महिना असला तरी हवा थंड होती एक स्वेटर खरतर पुरत नव्हता पण चालण्याने उब आली लंडनची सर्व सबर्बस मेट्रोने जोडलेली आहेत जवळ जवळ तीन चतुर्थांश भागात मेट्रो जमिनीखालून गेलेली आहे तिला ट्यूब म्हणतात प्रत्येक स्टेशनमधे त्या स्टेशनवर येणाऱ्या व जाणाऱ्या गाड्यांचा पूर्ण मार्ग नकाशात दाखवलेला असतो मोठाल्या फलकावर पूर्ण माहिती लिहिलेली असते ठिकठिकाणी मार्गदर्शक खुणा असतात फलक नीट वाचले तर नवीन माणूस सुद्धा न चुकता कोठेही जाऊ शकेल

ऑफिसेस सुरु व्हायच्या व सुटायच्या वेळी ह्या गाड्यांना अतिशय गर्दी असते. व गाडींत बसायला जागा मिळत नाही पण

तरीही सर्व शिस्तित चालत सीट मिळवण्या करता रेटारेटी, बाचाबाची होत नाही कितीहि गर्दी असली तरी आवाज कोणाचेच चढत नाहीत सर्व चुपचाप न बोलता उभे असतात.

लडन विषयी अनेकाची पुस्तक व कथा वाचलेल्या असल्याने लडन तसे ओळखीचेच वाटत होते एक सारखी ठेंगणी सुबक उतरत्या छप्पराची घरे, छपरावर धुराडे जुन्या पद्धतीची घरे अजूनही आहेत नवीन भागामधे मात्र पाच ते सहा मजली अपार्टमेंट हाऊसेस दिसतात

घरामधे आपल्या कडल्या सारखे नाविन्य दिसत नाही ! सर्व घरे एक छाप अमेरिकेसारख्या गगनचुबी इमारती पण फारशा नाहीत जुन्या ऐतिहासिक महत्वाच्या इमारती मात्र भव्य, भक्कम पण तिलवचाच भयाण वाटतात

ह्या शहराला वीस, एकविस शतकाचा इतिहास आहे इग्लड-मधील पहिली वस्ती थेम्स नदीच्या काठी ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात इथेच वसली पूर्वी लडनचे नाव लँडिनियम असे होते. पूर्ण शहराच्या चारी बाजूंनी रोमन लोकानी सरक्षणाकरता भित बाधलेली होती रोमन लोकानतर अँग्लोसॅक्सन लोकाची येथे वस्ती होती ऑगस्टीन ह्या ख्रिश्चन धर्मगुरुने इथे ख्रिश्चन धर्माचा प्रसार केला व ह्या भागाला अँग्ला लँड किवा लँड ऑफ अँग्लेस हे नाव दिले व त्याचेच पुढे इग्लड झाले

मध्यतरी केव्हातरी नॉर्मंडीचा फ्रेंच ड्यूक राज्यावर होता तेव्हा फ्रेंच राजभाषा होती पुढे फ्रेंच व अँग्लोसॅक्सन मिळून इग्लिश भाषा तयार झाली

ब्रिटिश लोक शिस्त प्रिय म्हणून प्रसिद्धच आहेत तसेच ते रुढीप्रिय आहेत. बरेच जुने समारभ अजूनही जुन्याच पद्धतीने होतात. येथे राजसत्ताक लोकशाही आहे राजघराण्याचा अजूनही मान राखला जातो.

मेट्रोने आम्ही ऑक्सफर्ड स्ट्रीट वर उतरलो लडन प्राचीन शहर असल्याने वेडेवाकडे पसरलेले आहे. रस्ते छोटे व लहान

ऑक्सफर्ड स्ट्रीट हा मुख्य बाजाराचा रस्ता मोठ मोठी डिपार्टमेंटल स्टोअर्स इथे आहेत हा रस्ता सदोदित प्रवाशामुळे गजबजलेला असतो चित्र विचित्र पोशाख व हेअर स्टाईल केलेले लोक इथे बघायला मिळतात लंडन मधूनच फॅशनची सुरवात होते असं म्हणतात

ऑक्सफर्ड स्ट्रीट वरुन आम्ही पिकाडिली सर्कस चौकात आलो सर्व ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळे इथेच आसपास आहेत येथून पुढचाच चौक ट्रॅफलगर चौक म्हणून प्रसिद्ध आहे

## ट्रॅफलगर

ह्या चौकात अॅडमिरल लॉर्ड नेल्सनचा पुतळा एका उंच स्तंभावर हीरोच्या थाटात उभा आहे इथेच लॉर्ड नेल्सनने शत्रूचा पराभव केला ह्या चौकात सतत तऱ्हतऱ्हेच्या सभा भरत असतात सप सत्याग्रह पण नेलसनच्या साथीने होतात ख्रिसमस मधे मोठा ख्रिसमस वृक्ष इथे सजवतात व गाणी बजावणी होतात लंडनचे हे हृदय आहे चारी बाजूला दगडी सिंह पहारा देत बसले आहेत एरव्ही प्रवाशाना आकर्षून घेणारी गोष्ट म्हणजे कबुतरे असंख्य कबुतरे इथे निर्भयपणे हिंडत असतात इतकी की चालताना एखादे पाया खाली येईल की काय अशी भिती वाटते ह्या कबुतराना दाणे खायला घालणे हा अतिशय आवडता छंद आहे इथे येणाऱ्याना इथलं वातावरण अतिशय उल्हसित व जिवंत वाटतं

ह्या चौकाच्या आजूबाजूचा भाग खूपच गजबजलेला आहे अनेक लंडन दर्शन बसेस इथूनच सुटतात गर्दी व इमारतींच्या साधर्म्यामुळे इथे मुंबईतील फोर्ट ह्या भागात आल्या सारखेच वाटते ह्या गजबजाटून बाहेर पडल्यावर मोकळी हवा खायला ह्या हृदयाच्या बाजूलाच मोठे मोठे बगीचे आहेत त्याना लंडनची फुफसे म्हणतात स्वच्छ हवा फक्त इथेच मिळू शकते.

बगीच्यांचे नुसतेच दर्शन घेऊन आम्ही थेम्सनदीकडे मोर्चा वळवला वेस्टमिनिस्टर ब्रिज जवळ पार्लमेंट हाऊसची लांबलचक

बिल्डिंग आहे इ स १५२९ पर्यंत हा राजवाडा होता आठव्या हेन्रीने व्हाईट हॉल पॅलेस बांधला व ही बिल्डिंग पार्लमेंटला मिळाली ह्या बिल्डिंगला वर्षाच्या दिवसाइतक्या म्हणजे ३६५ खिडक्या आहेत.

बाजूला सुप्रसिद्ध बिगबेन घड्याळ असलेले टॉवर आहे समोरच पुरातन राणी बोडेशिया हिचा रथातला पुतळा आहे ह्याच्या जवळच सुप्रसिद्ध वेस्टमिनिस्टर अॅबे हे चर्च आहे हे सातव्या शतकात बांधलेले आहे नॉर्मन काळात सर्व राजाचे राज्याभिषेक इथे होत असत, तसेच मेल्यानंतर त्यांना इथेच पुरत असत त्यामुळे अनेक राजे-राण्या व प्रसिद्ध व्यक्तिंची इथे थडगी आहेत

व्हाईट हॉल समोर चर्चिलचा फार सुंदर पुतळा आहे पार्लमेंट हाऊसकडे मोठ्या टेसात व अभिमानाने मान उंचावून बघत असल्या सारखा वाटतो

लंडनच्या मध्यबिंदू वर एक स्मारक आहे तेथे दरवर्षी 'रिमेंबरन्स डे' ला राणी, पॉपीची रोपे स्वत लावते जवळच सुप्रसिद्ध १० डाऊनिंग स्ट्रिटवर मार्गारेट थॅचरचें घर बघितले बिल्डिंग काळी आहे व आजूबाजूला सर्वच इमारती उंच असल्याने इथे उजेडपण कमीच आहे, त्यामुळे हा भाग उदास वाटतो

राणीचे हॉर्सगार्डस तर प्रसिद्धच आहेत राणीच्या राजवाड्या बाहेरच्या हॉर्सगार्डच्या कार्यालया बाहेर दोन गार्डस पहारा देत असतात माहित नसेल तर ते पुतळेच वाटतात, इतके ते स्तब्ध उभे असतात हे रक्षक बदलण्याचा पण समारंभ असतो तो बघायला मुद्दाम लोक येतात

पुढे माल हा पॅलेसकडे जाणारा रस्ता लागतो. हा राजवाडा बकिंगहॅमच्या ड्यूक कडून १८३५ मधे विकत घेतलेला आहे, म्हणून ह्याला बकिंगहॅम पॅलेस म्हणतात

इथून आम्ही पिकाडीली सर्कसवर परत आलो. दुपारी लंच करता इथल्याच एका इंडियन हॉटेलमधे आम्ही आलो होतो

इथल्या एका बोळात ३-४ इंडियन हॉटेल्स आहेत लंडनचे धावते दर्शन घेऊन इथूनच मेट्रोने आम्ही परतलो ९ वाजले होते तरी सूर्यास्त व्हायचाच होता एजवेअर स्टेशनवरून आम्हाला परत पायीच जायचे होते दिवसभर पायी हिंडून पायाचे तुकडे पडायची वेळ आली होती. पण बसेसची माहिती नव्हती. त्यामुळे पायी जाणेच भाग होते पाय ओढत आम्ही चाललो होतो थोड पुढे गेल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूनी चेरीची झाडे, फुलानी फुललेली दिसली व आमचा थकवा कुठच्या कुठे पळाला. कॅमेरा काढून त्यामुदर चेरीब्लॉसमचा फोटो काढण्याचा मोह आवरता आला नाही मन प्रसन्न व उल्हसित झाले

चहा पिता पिता ज्योत्स्ना व मुरलीला सर्व वृत्तात ऐकवला तेव्हां ते म्हणाले इतक चालण्यापेक्षा तुम्ही मेट्रोचे दिवसभराचे तिकिट काढले असते व प्रत्येक ठिकाणी मेट्रोने गेला असता तर बरच चालण वाचल असत अर्थात प्रत्येकवेळी स्टेशनवर जाव लागल असत.

दुसऱ्या दिवशी तसच केल आम्ही आज जयू व अशोक पण बरोबर होते लडनला अनेक म्यूझियम्स प्रसिद्ध आहेत पण त्यातल मादाम टूसाच वॅक्सम्यूझियम आगळ-वेगळ आहे. म्हणून तेच बघायच ठरवल क्यू मधून १ तास रखडाव लागल तेव्हा म्यूझियममधे प्रवेश मिळाला

प्रवेशदारापासूनच फसव्या पुतळ्याना सुरवात झाली पहारे-करी खरेच वाटतात मधे मधे ठेवलेले पुतळे, प्रेक्षक किंवा देखरेख करणाऱ्या लोकासारखे वाटतात

सर्व राजघराण्यातील मडळीना तसेच जागतिक किर्तीच्या लोकाना मेणात बसवलें आहे इदिरा गाधी, नेहरू व महात्मा गाधीचा पण पुतळा इथे आहे आता सुनील गावस्कर पण मेणाचा होणार आहे. अनेक सुप्रसिद्ध खेळाडूमधे पेलें, मेकॅन्रो, हे मुख्य तसेच प्रसिद्ध नट नटचा, लीझा मिनेली, अल्फ्रेड हिचकॉक स्वत व मादामटूसॉ

अनेक ऐतिहासिक प्रसग दाखवणारे पुतळे, व ह्या सर्वांना योग्य वातावरण, त्या त्या दालनांत केल आहे मायकेल जॅक्शन मागून त्याची गाण्याची रेकॉर्ड लावलेली होती

युद्धाचे प्रसग दाखवणारी दृष्ये, मागून गोळ्याचे, तोफाचे धडधडण्याचे आवाज एका ठिकाणी एक सुदरी पलगावर झोपलेली तिच हृदय स्पदन पावतय, त्यामुळे ती जिवतच वाटते. तिच्या भोवती खूपच गर्दी होती

पूर्ण म्यूझियम बघायला दोन तीन तास सहज लागतात. बाहेर पडलो ते भारावलेल्या स्थितीत आता काहीच बघावेसे वाटेना

गमत म्हणूनच आम्ही एक लडन दर्शनची टूर घेतली बसच्या दुसऱ्या मजल्यावर बसून १ तास कालच बघितलेले सर्व बस मधून बघितले व घरी परत आलो उद्याची तयारी करायची होती आमची कॉसमॉसची बस सकाळी सात वाजता होती युरोपमध्ये आपले भारतीय जेवण मिळणार नव्हते, म्हणून दोन दिवस आम्ही यथेच्छ खाऊन घेत होतो

ज्योत्स्ना व मुरलीधरानी आमची चागलीच बडदास्त राखली होती ज्योत्स्ना नोकरी करते तरी रात्री साग्रसंगीत स्वयपाक करत होती मुरलीधर पण तिला मदत करायचे इतके वर्ष तेथे राहूनही ते बदललेले नाहीत पक्के वऱ्हाडी आहेत त्यांना माणसे हवीत. दोनच दिवसात आमच्याशी इतकी दोस्ती झाली की जणू आमची कित्येक वर्षांची ओळख आहे. त्याचा छोटा शशीपण आमच्याशी मोकळेपणाने बोलत होता खूष होता.

दिवस भरच्या हिंडण्याने भलतेच दमलो होतो झोप केव्हा लागली ते कळलेच नाही.

# युरोपच्या वाटेवर

सहा मे आज आमची कॉसमॉसची ट्रिप सुरु होणार. सकाळी साडे सहा वाजता व्हिक्टोरिया बस स्थानकावर सर्वांना जमायच होत.

भारतीय जेवण तर मिळणार नव्हतच पण पाणी तरी सगळीकडे मिळेल की नाही ह्या विषयी वादच होता म्हणून एक वॉटर बॅग बरोबर घ्यायच ठरवल. भारतातून निघतानाच आम्ही चिवडा. चकल्या, शकरपाळे व पुरणपोळ्या बरोबर घेतल्या होत्या युरोपातील सर्वच देश दूध दुभत्याकरता प्रसिद्ध असल्याने दूधतरी सगळीकडे मिळेल ह्याची खात्री होती शिवाय स्वस्त. तेथे मिनरल वॉटरची बाटली दुधा पेक्षा महाग मिळते अस कळल

श्री काळवाडचानीच आम्हाला सकाळी बसस्टँडवर सोडल सर्व सोपस्कार होऊन आमची बस ७ ३० वाजता निघाली ही बस आम्हाला डोव्हर ह्या इग्लंडच्या बंदरापर्यंत नेणार होती बसमधे एकूण बावन प्रवासी होते पैकी साठ टक्के अमेरिकन दिसत होते.

लंडन मधून बाहेर पडून लहान लहान गावातून आमची बस चालली होती लहान खेडी पण अतिशय स्वच्छ व सुंदर आहेत टुमदार छोटी छोटी घरे समोर बगीचा, प्रत्येक घराला कुंपण म्हणून मेंदी लावलेली त्याही पुढे रस्त्यापर्यंत परत हिरवळ लावलेली बाजूने दोन घरामधे मात्र कुंपण कोठेच दिसले नाही त्याऐवजी हिरवळच राखलेली दिसली दोन गावाच्या मधे लांबच लांब शेते पसरलेली त्यामुळे मैलन् मैल हिरवागार गालिचा टाकल्या सारखेच वाटत होते नकळतच मी 'हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमलीचे' हे बालकवीचे गाणे गुणगुणू लागले. अमेरिकेत पण

सर्वत्र असेच हिरवे गालिचे बघायला मिळतात व पूढे पूर्ण युरोपभर वसुंधरेच हे हिरव रुप डोळ्यात साठवून घेतल

रस्त्याने कोठेही गुरे ढोरे वाटेत आली नाहीत, त्यामुळे चुकल्या चुकल्या सारखे वाटत होते, गुरे शिस्तित त्याच्या राखीव कुरणात चरत होती

काही वेळा नतर मात्र तोच तोच पणा जाणवायला लागला व डोळे मिटून विचार करता करता इग्लडचा इतिहास पुसटसा आठवू लागला एवढेसे चिमुकले राष्ट्र पण धडाडी व चिकाटी ह्या गुणामुळे जगभरचे प्रदेश काबीज केले १५ व्या शतकापर्यंत जगाच्या अर्ध्या भागावर इग्लड राज्य करत होते फ्रान्स, बेल्जियम, नेदरलड, ऑस्ट्रिया नतर भारत, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलड, मध्यपूर्व आशिया, आफ्रिकेतील काही वसाहती व कॅनडा त्याच्या ताब्यात होते १७७६ पर्यंत अमेरिका पण ब्रिटनच्या ताब्यात होती १७७६ मधे अमेरिका स्वतत्र झाली नेपोलियनने फ्रान्स मधे बड केले पण त्याचा पराभव झाला

पुढे सुएझ कालवा पण ब्रिटिशांनी ताब्यात घेतला पण नतर मात्र एक एक राष्ट्र स्वतत्र होऊ लागले आयर्लंड स्कॉटलड व वेल्स पण आता स्वतत्र झाले आहे पण ह्या सर्वांचा मिळून केलेले ध्वज मात्र तोच आहे युनियन जॅक एके काळी बलाढ्य असलेले हे राष्ट्र आता मात्र तिसऱ्या नबरचे राष्ट्र आहे

राजघराण राज्यावर असल तरी बाराव्या शतकापासूनच राज्यकारभार मात्र निवडक लोक बघत त्याना बॅरन्स म्हणत त्यात कँटरबरीचा आर्चबिशप व बडे व्यापारी ह्याचा समावेश असे पुढे टू हाऊस पार्लमेंट सुरू झाले अप्पर हाऊस व लोअर हाऊस अप्पर हाऊस मधूनच बहुमत असलेल्या पार्टीचा नेता निवडून त्याला प्राइम मिनिस्टर केले जाते

आपल्याकडील पद्धत ही ब्रिटिशाच्या पद्धतीवरच आधारलेली आहे पूर्वी इथे रोमनकॅथॉलिक हाच सर्वांचा धर्म होता परंतू १५०९ मधे ७ व्या हेन्रीला मुलगा हवा होता त्याकरता त्याला

राणीला घटस्फोट देऊन दुसरे लग्न करायचे होते. पण पोपने परवानगी दिली नाही तेव्हा पोपची आज्ञा झुगारून त्याने दुसरा विवाह केला पोपचा ह्याबाबतीतला अधिकार रद्द करुन तो पार्लमेंट मध्ये पास करवून घेतला चर्चची मालमत्ता जप्त करून नवीनच पथ सुरू केला व स्वत: त्याचा प्रमुख बनला. हाच प्रोटस्टट पथ किंवा ह्यालाच 'चर्च ऑफ इग्लड' पण म्हणत असत नतर त्याला मुलाकरता सहा वेळा लग्न करावे लागले. पुढे अनेक वेळा प्रोटेस्टट व कॅथॉलिक्स मध्ये धर्मयुद्धे झाली आता तर तेथे मेथॉडिस्ट हा नवाच पथ उदयाला आला आहे ह्या प्रत्येकाची चर्चेस निराळी असतात

आपल्या देवळा प्रमाणेच इथे अनेक चर्चेस असतात पुढे युरोपात तर खूप चर्चेस बघायला मिळाली. बायबल मधल्या अनेक प्रसिद्ध व्यक्तिची चर्चेस आहेत

विचाराच्या तंद्रीत केव्हा डोव्हरला येऊन पोहोचलो ते कळलेच नाही उंच उंच पांढरे शुभ्र खडूचे डोंगर उन्हामुळे चमकत होते त्यामुळे जणूकाही चांदीचा मुलामा दिलेली शिखरेच आहेत असे वाटत होते चुन्याचे हे डोंगर समुद्रातूनच उगवल्या सारखे वाटत होते पायथ्याशी समुद्राच्या फेसाळत्या लाटा धडकत होत्या म्हणूनच हे नैसर्गिक बदर आहे

प्रसिद्ध कवी मॅथ्यू अर्नोल्डला हा किनारा इतका आवडला की त्याच्या अनेक सुप्रसिद्ध कवितांचा जन्म ह्या किनाऱ्यावर झालेला आहे

इथे आमच्या सामानाला आमच्या बसच्या नबरची लेबल्स लावून सामान त्याच्या ताब्यांत दिले इथून सीलिंक ह्या बोटीने आम्ही इंग्लिश खाडी ओलांडणार होतो. इग्लंड हून बेल्जियम मध्ये जायचे असल्याने ह्या सीपोर्टवर पण फॉर्म भरणे, पासपोर्ट–व्हीसा बघणे वगैरे सर्व सोपस्कार झाले, व मग आमची वरात बोटी कडे निघाली.

बोट खूपच मोठी होती. तिच्या तळमजल्यावर मोठाल्या १२ बसेस व १०–१२ टूरिंग कार्स मावल्या होत्या. स्वत:च्या कारने प्रवास करणारे अनेक असतात तसेच काही ट्रॅव्हल एजन्सीज इंग्लडहून स्वत च्याच बसेस आणतात. आम्हाला मात्र बेल्जियम मध्ये वेगळी बस मिळणार होती वरच्या दोन मजल्यावर टूरिस्टना बसायची सोय होती बाजूला पूर्ण ओपन डेक होता तेथे छोटया छोटया लाईफ बोटी टांगून ठेवलेल्या होत्या. बोट कोरी दिसत होती हजारावर प्रवाशाची सोय होती बाजूनी काचेच्या मोठाल्या खिडक्या होत्या खिडक्यातून अधून मधून ओकणाऱ्याकरता पिशव्या ठेवलेल्या होत्या सीट्स खाली लाईफ जॅकेट्स होती

समुद्र सथ होता त्यामुळे बोट पण सथपणे चालू होती किनारा मागे पडला व सगळीकडे नुसती निळाई पसरली त्यामुळे बोट जागेवरच स्थिर उभी असल्यासारखी वाटत होती मधूनच एखादी लाट आली तर हेलकावे खात होती

बोटीवर डयूटीफ्रिशॉप होते इंग्लडपेक्षा येथे दारुच्या बाटल्या खूपच स्वस्त मिळतात, तसेच तंबाखू सिगार्स व परफ्यूम्स पण म्हणूनच आमच्या होस्ट नी आम्हाला कांही खरेदी करायला सांगितली होती.

इथे अनेक हॉटेल्स पण होती, पण हॉटेल्समधे आपल्या आवडीचं किंवा खाण्यालायक मिळण कठीणच, तेव्हा बरोबरचेच खाल्ले तीन तासात आम्ही उस्टॅंड ह्या बेल्जियमच्या बंदरावर आलो. आमच्या घडयाळात ११। वाजला होता पण तेथे ३ वाजलेलें. घडयाळे १।। तास पुढे करावी लागली

परत बाहेर पडताना पासपोर्ट व्हीसा वगैरे दाखवावा लागला बाहेर आलो तर अनेक बसेस बाहेर उभ्या, ५०–६० तरी असतील कॉसमॉसच्याच ६–७ बसेस होत्या. आमच्या नंबरची बस शोधून आम्ही तेथे येऊन उभे राहिलो सामान बरोबर आल पण तरी एकदा चेक करुन घेतल. बसच्या तळाला बाजूनी सामान ठेवायला जागा होती

बस जवळ एक फ्रॉक मधली गोरीगोरी निळ्या डोळ्याची गुटगुटीत युवती हातात लीस्ट घेऊन उभी होती प्रसन्न चेहऱ्याची लिंडा आमची गाईड होती. ती ब्रिटिश–वेल्स होती.

छोट्या चणीचा एक इटालियन, बसचा ड्रायव्हर होता. त्याच नाव निकी.

सर्व प्रवासी आले सामान चढल तरी बस हालेना सर्व बसेस एक एक करुन गेल्या १ तास व्हायला आला तरी आमची बस मात्र हलायच चिन्ह दिसेना सगळेच नवीन तेव्हा विचारायचा कोणाला तेवढ्यात अजून एक बोट आली व थोड्याच वेळांत एक बाई बसकडे येताना दिसली. तिच्याकरता आम्ही थावलो होतो तिची सोय कॉसमॉसनेच लंडनच्या हॉटेलवर केली होती लंडनहून निघताना तिच्या बॅगचा काहीतरी घोटाळा झाल्याने ती वेळवर स्टॅडवर येऊ शकली नाही त्यामुळे ती नतरच्या बसने जेव्हरला आली पण इथेही बोट सुटल्याने दुसऱ्या बोटीनी तिला याव लागल व आम्हाला उस्डंडला तिच्याकरता थाबावच लागल

बस वातानुकूलीत असून बाजूनी अर्ध्याच्या वर पूर्ण काचेच्या खिडक्या होत्या

निळा रग असल्याने ब्लू–बर्ड हे नाव शोभत होते बस मधे दोन ठिकाणी टबल्स होती तेथे खुर्च्या समोरा समोर येत. आज सर्व, जशी, जागा मिळाली तसे बसले होते उद्या पासून सर्वांनी रोज उजवी कडून दोन सीट्स पुढे व डावीकडून दोन सीट्स मागे बसायच होत रोटेशनने बसण्याने रोज वेगळी जागा, वेगळा शेजार मिळणार होता शेवटच्या दोन रागा मात्र धूम्रपान करणाऱ्यांकरिता राखून ठेवलेल्या होत्या

आज आम्हाला टेबला समोरच्या खुर्च्या मिळाल्या होत्या समोर एक मलेशिअन जोडप बसल होत त्याच्यावर जेव्हा ब्रिटिशानी राज्य केल तेव्हा त्या लोकानी पूर्ण पोशाख त्यांचा स्वीकारला स्वत चा पोशाख ते कधी तरी सणासुदीला घालतात. बायका पण स्कर्ट ब्लाऊस, पॅंट्सच घालतात

मलेशिअन बाईचे नाव रोहानी होते आपल्या रोहिणी सारखे ती नर्स होती व नवरा बँकेत मुलाना आजी आजोबा जवळ ठेऊन प्रवासाला निघाले होते त्याच्या व आपल्या चालीरितींमधे बरच साम्य आहे

सर्व स्थिर स्थावर झाल्यावर लिंडाची कॉमेंट्री सुरु झाली आज आम्हाला बेल्जियम मधील नामूर ह्या गांवी मुक्काम करायचा होता.

# बेल्जियम

इंग्लंडपेक्षा इथला निसर्ग एकदम बदललेला जाणवला उंच उंच पाईनची झाडं रस्त्याच्या दुतर्फा लावलेली होती रस्ते मोठे स्वच्छ व सुंदर

बारा हजार चौरस मैल क्षेत्रफळाचे हे छोटेसे राष्ट्र वस्ती फक्त एक कोटींच्या जवळपास म्हणजे मुंबई एवढी उत्तरेला नेदरलंड पुर्वेला जर्मनी, दक्षिणेला लक्झेंबर्ग व फ्रान्स पश्चिमेला इंग्लिश खाडी

शील्ड साबरे व मूस ह्या मुख्य तीन नद्या. सतत ढगाळ वातावरण असल्याने सूर्यदर्शन क्वचितच घडते वर्षभर थोडा थोडा पाऊस पडतो एक पंचमांश भागात जंगले आहेत फुलझाडे फक्त उन्हाळ्यातच फुलारतात त्यामुळे प्रत्येकाच्या बागेत रंगीबेरंगी फूल बघायला मिळाली

बस मधून जंगला जवळून, तर मधूनच वस्तीतून जात होती वस्ती खूपच तुरळक होती साठ टक्के शेतीची जमीन असून सहा टक्के लोकच शेती करतात म्हणूनच मैलन मैल पसरलेल्या शेतांत किंवा कुरणात गुरं चरताना दिसली पण माणसांचा पत्ताच नाही तेव्हा इतकी मोठाली शेतं कोण राखत असा प्रश्न पडला डोंगर उतारावर पण शेत होती सर्वदूर नीटनेटकेपणा जाणवत होता रस्त्यावरची वाहतुक मुख्यत्वेकरुन मोटारने तरी गावातून जाताना शाळेची मुलं दप्तर पाठीला लावून सायकलने घरी जाताना दिसली मधूनच एखादी मोपेड फर्र्कन जात होती.

प्रत्येक छोट्या गावात एक चर्च, एक बगीचा असलाच पाहिजे. प्रत्येक गाव आखीव, रेखीव वाटले

बेल्जियमच्या उत्तर व पश्चिम भागात फ्लेमिग्ज, सॅलिअन व फ्रँकिश हे मूळचे जर्मानिक लोक राहातात ते फ्लेमिश भाषा बोलतात हिचे डच भाषेशी साम्य आहे दक्षिणेला वालून लोक रहातात, ते फ्रेंच बोलतात ह्या दोन्ही भाषाला बेल्जियममधे सारखच महत्व आहे बहुतेक सर्वांना दोन्ही भाषा येतात

रस्त्याची नावे, दुकानावरच्या पाट्या दोन्ही भाषात असतात. जर्मनी जवळच्या काही भागात जर्मन भाषा बोलली जाते.

इथले बहुतेक लोक रोमन कॅथॉलिक आहेत.

चौथ्या शतकात ज्युलिअस सीझरने इथल्या मुळच्या सेल्टिक लोकाचा पराभव करुन बेल्जियम युरोपला जोडले त्या आधी येथे अनेक स्वतत्र राज्ये होती पुढे कांही फ्रान्सच्या तर काही जर्मनाच्या व डचाच्या ताब्यात गेली पुढे १५ व्या शतकात 'डयूक ऑफ वरगडीने' पूर्ण बेल्जियम आपल्या अधिपत्याखाली आणल पण पुढे अनेक युद्धे झाली, कधी स्पेनच्या ताब्यात तर कधी ऑस्ट्रियाच्या ताब्यात शेवटी अठराव्या शतकात फ्रान्सच्या ताब्यात बेल्जियम आले पुढे १८१५ मधे नेपोलियनचा वॉटरलू इथे पराभव झाला तेव्हा बेल्जियम फ्रान्स कडून नेदरलडला भेट म्हणून दिले गेले

ह्या युद्धामुळे कटाळून येथे स्वातत्र्याचे वारे वाहू लागले. स्वातत्र्याच्या पार्श्वभूमिवर लोक नाटके करू लागली. त्यावरुन स्फूर्ती घेऊन लोकानी नेदरलडच्या राजाची व मत्र्याची घरे लुटली, व बड पुकारले पुढे पॅरिसमधल्या उच्च अधिकाऱ्यानी त्याना मदत केली. व स्वातत्र्य घोषित केले तरी नेदरलडचे हल्ले चालूच होते. फ्रान्स व ब्रिटनच्या मदतीने ह्या लोकानी हे हल्ले परतवले

स्वातत्र्य घोषित झाले तरी राजेशाहीच चालू होती पण राजा प्रजेने निवडला इग्लडच्या राणी व्हिक्टोरियाचा काका प्रिन्स लिओपोल्ड–१ ह्याला गादीवर बसवले पुढे ह्याच्या मुलाच्या राज्यात बेल्जियमची खूप भरभराट झाली ह्याने आफ्रीकेतील कांगो भागातील अनेक उद्योगधद्याना पैसे पुरवले व ते ताब्यात घेतले शिवाय बरीच मोठी–२ लक्ष चौरस मैलाची जमीन विकत

घेऊन तेथे रबर व कापसाची शेती सुरू केली हृया जमिनींत त्याला ताम्ब्याच्या, सोन्याच्या व हिऱ्याची खाणी गवसल्या हस्तिदंत पण मुबलक प्रमाणांत मिळू लागले हा सर्व कच्चा माल बेल्जियममधे जाऊ लागला व बेल्जियममधे मोठ मोठे कारखाने उभारले गेल व सर्व भरभराटीला आले १९०८ मधे हृया भागाला बेल्जियमची कॉलनी म्हणून मान्यता मिळाली हृया मुळेच बेल्जियम श्रीमत झाले. पण पुढे १९६० मधे हा भाग स्वतंत्र झाला 'डेमॉक्रॅट्रिक रिपब्लिक ऑफ कांगो' चा रिपब्लिक ऑफ झाइर (Zaire) झाला अजूनही बेल्जियमचे त्याच्याशी सलोख्याचे संबंध आहेत

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात जर्मनानी येथे फारच धुमाकुळ घातला पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्यावर हिटलरनी पण तटस्थ राष्ट्र म्हणून हृयाला मान्यता दिली होती पण दुसऱ्या महायुद्धात परत हल्ला चढवून राजाला कैद केले पण भूमिगत बेल्जियमच्या सैन्याने जर्मनांचा पराभव करून परत स्वातंत्र्य घोषित केले

सध्या लिओपोल्ड-३ हृयाचा मुलगा बोदाईन-१ हा राजा आहे पण इंग्लंड प्रमाणेच नावाचा राजा राज्य कारभार लोकशाही पद्धतीनेच शेजारी राष्ट्राशी संबंध एकोप्याचे आहेत.

बेल्जियम, नेदरलंड व लक्झेंबर्ग हृया तीन राष्ट्रांना मिळून 'बेनेलक्स युनियन' म्हणतात. पूर्ण युरोपच्या एकोप्याकरता व भरभराटीकरता इथे अनेक संस्था कार्यरत आहेत बेल्जियम ही त्याची आघाडीची फळी आहे

स्थिर अर्थव्यवस्था, कारखान्याची भरभराट व जागतिक सहकाऱ्याचे पुढारी पण टिकवायला बेल्जियम कंबरकसून उभे आहे तरी अधून मधून इथेही उत्तरेचे फ्लेमिश व दक्षिणेचे वालून हृयामधे पार्टिशनचे वारे वाहतात, दंगेधोपे होतात आपल्या हिंदू-मुस्लिम किंवा हिंदू-शिख हृयाप्रमाणे

ब्रुसेल्स ही राजधानी. बारा टक्के लोक हृया शहरात रहातात त्यातील ८० टक्के फ्रेंच बोलणारे बहुतेक लोक लहान गावात रहाणे

पसत करतात दुकाने लहानच आहेत एखाद दुसरे डिपार्टमेंटल स्टोअर असते

ह्या लोकाना घराची फॅमिलीची कार ओढ असते आपले घर व बगीचा स्वच्छ व सुंदर ठेवण्याकडे कटाक्ष असतो हे लोक अतिशय कष्टाळू आहेत. आळशीपणा व कामचुकारपणा म्हणजे गुन्हा समजला जातो शभर टक्के साक्षरता आहे राजकारणात खूप रस ऐतिहासिक प्रसिद्धीचे दिवस मिरवणुका काढून साजरे करतात. वर्षातून एकदा धार्मिक मिरवणूक काढली जाते तिला 'होली ब्लड इन् ब्रुज' असे म्हणतात मिरवणुकीच्या सुरवातीला गावचा मेयर ग्लासमधे शँपेन ओतून त्यात एक छोटा जिवत मासा सोडतो व माशा सहित शँपेन पितो मग कार्यक्रमाना सुरवात होते गाणी, नाच, स्पर्धा, खेळ असे तऱ्हतऱ्हेचें कार्यक्रम होतात

हे लोक खिलाडूवृत्तीचे आहेत सॉकर बुद्धिबळ, बाऊलिंग, कार रेस, स्कूटररेस हे आवडते खेळ जिवत मासे व ससे म्हणजे पक्वान्न 'वॉटरझुई' हे प्रसिद्ध सूप कोंबडी व भाज्याचे बनवलेले असते

लिंडाच्या कॉमेंट्रीमुळे तीन तास कसे गेले ते समजलेही नाही आता बस एका नदीच्या किनाऱ्याने चालली होती ही मूस नदी आम्ही चाललो होतो त्या रस्त्याना मोट–वेज म्हणतात सपूर्ण युरोपभर ह्या मोट–वेजचे जाळे पसरलेले आहे हजारो प्रवासी बसेस रोज ह्यावरुन जातात. अती ट्रॅफिकमुळे हे रस्ते वरेचेवर दुरूस्त करून तदुरुस्त ठेवावे लागतात कोट्यावधी रुपये ह्यावर दरवर्षी खर्च होतात म्हणून प्रवासी वाहानाकडून जबरदस्त टॅक्स घेतला जातो.

आता आम्ही एका गावात आलो हेच नामूर नदीकाठच्या 'हॉटेल व्हाल मूस' च्या आवारात आमची बस आली सात वाजले होते पण उन्ह चांगलेच होते आमच्या नशीबानी आज सूर्यदर्शन घडले होते उन्हाळ्यात इथे दहा पर्यंत उजेड असतो.

लिंडा रुम्स ठरवून आली व आम्ही आपल्या आपल्या रूम्सचा कब्जा घेतला हॉटेल गावाबाहेर नदीकाठी असल्याने शांत होतें एकूण ११८ रूम्स, १८ मोठे कॉन्फरन्स हॉल, पोहोण्याचा तलाव वगैरे सर्व सोईंनी युक्त होते

हॉटेलच्या मानाने खोल्या लहान होत्या खोलीत रेडिओ व टि. व्ही होता बाथरुम मधे कमोड सिस्टिम, टब, टेलिफोनिक शॉवर, टब ला पडदाच नाही अमेरिकेंत टब ला पडदा असतो त्यामुळे अंघोळ करताना पाणी बाहेर उडून ओले होत नाही टॉवेलसची एक चळतच ठेवलेली होती साबण पण होता

भारतातून आलेल्याना ह्या सोई बघून दिपल्यासारखे होते पण अमेरिकन "स्टँडर्डच्या मानानी ह्यातही गैरसोई होत्या हातात धरायचा शॉवर त्यानी कधी बघितला नसेल आमची ही ट्रीप मध्यमवर्गीयाकरता असल्याने हॉटेल्स पण मध्यमदर्जाची होती

ताजेतवाने होऊन आम्ही ८॥ वाजता जेवायला खाली आलो आमची जेवणाची सोय पूर्ण काचेच्या भिंती व छप्पर असलेल्या बालकनीत केली होती प्रथम व्हेजिटेरियन सूप आल व त्या बरोबर ब्रेड, सूप छान होत. त्यानतर मात्र नॉनव्हेज डीश आम्ही व्हेजि-टेरियन म्हणून सांगितल्यावर त्या ऐवजी आम्हाला सॅलड आणून दिल पण टोमॅटोच्या दोन चकत्या खेरीज त्यात काहीही खाण्या सारख नव्हत अक्षरश: आजूबाजूच्या कुंडयामधला पाला उपटून डीश सुशोभित केल्यासारखी दिसत होती व ते वेटर्स अशा तऱ्हेने आमच्याकडे बघत होते की जणूकाही आपण गाय किंवा बकरी आहोत अस वाटायला लागल अमेरिकेत सॅलड म्हणजे चंगळ असते, टॉमॅटो, गाजर, काकडी, कांदा, लिंबू मिरची ह्याचे काप शिवाय फळाचे काप, सॅलडवर घालायला दोन तीन प्रकारची ड्रेसिंग्ज, शिवाय कोशिंबिरी प्रमाणे उकडलेल्या बटाट्याची कोशिंबीर, नूडल्ससॅलड, दोन तीन प्रकारच चीज, फ्रूट सॅलड अस सर्व बाऊल्स मधे वेगळ वेगळ ठेवलेल असत आपल्याला हव तेवढ हव तितक्यादा घ्यायच तेवढी मुबलकता युरोपात नाही.

इथे सॅलडबरोबर खायला ड्रेसिंग पण नव्हत ऑलिव्ह ऑईल व व्हिनेगर ठेवलेल होत· तेवढच पण सूप–ब्रेडने तसे पोट भरले होते. शेवटी डेझर्ट म्हणून पुडिंग आले ते मात्र छान होते

जेवणाविषयी साशक होतो पण पोट भरले. जेवल्यावर हॉटेलच्या लाऊजमधे हिंडलो. लाउज छान सजवलेले होते पूर्ण लाऊजभर गालिचा काही मोठी झाड, काही फुलझाड. मोठी झाड कृत्रिम असतील अस वाटल पण जवळ गेल्यावर ती खरी असल्याच लक्षात आल काही फुलझाड खरी वाटली तर ती कृत्रिम होती असा खऱ्या खोट्याचा सुदर मिलाप तिथे दिसला मॉडर्न आर्टची कांही म्यूरल्स सुदर होती मद लाईट व सुगधी वातावरण त्यामुळे प्रसन्न वाटत होते

दिवसभराच्या प्रवासाने डोळे शिणले होते रुमवर परतलो पलगाच्या पॅनललाच सर्व दिवे टि. व्ही. व रेडिओची बटण होती त्यामुळे झोपून सर्व ऑपरेट करता येत होते ही सोय छान वाटली टि. व्ही लावला तर त्या चॅनलवर फ्रेंच भाषेत सिनेमा चाललेला होता दुसऱ्या चॅनलवर इग्लिश शिकवत होते ते पाहून आश्चर्य वाटले निरनिराळ्या शब्दांचा वाक्यात कसा उपयोग करायचा ते सागत होते हा एज्युकेशन चॅनल होता इग्लिशला जगात किती महत्व आहे हेच सिद्ध झाल इथे दोनच चॅनल चालतात व टी व्ही आपल्या प्रमाणेच फक्त सध्याकाळी व रात्री असतो

बघण्यासारखे काही नसल्याने झोपून गेलो

फोन वरून आम्हाला ६॥ वाजता उठवणार होते पण आधीच जाग आली

आज ७मे सर्व आवरून आम्ही साडेसहा वाजता तयार होऊन बसलो दिवस मोठा असल्याने ४ वाजताच उजाडल होत आता सूर्य चागलाच वर आला होता मे असून खिडकीतून थड वाऱ्याची झुळुक येत होती स्वेटर घालावा लागला

युरोपांत हवामान अतिशय अनिश्चित असते घटकेंत अल्हाद-दायक वाटेल तर घटकेंत थंडगार वारे वाहू लागतील व थडी

पडेल, इतकी की स्वेटरपण पुरणार नाही म्हणूनच दोन जाड स्वेटर्स व एक स्की जॅकेट हूड असलेले आम्ही बरोबर घेतले होते ते वापरायची पण वेळ अनेकदा आली.

सुटकेसेस रुमबाहेर ठेऊन आम्ही खाली आलो आम्हाला वाटल आम्हीच पहिले असू पण नाही सर्व अमेरिकन लोक आमच्या आधी आलेले परत व्यवस्थित कपडे व मेकअप सहित शिवाय ताजेतवाने वाटत होते ह्यात पाच सहा म्हातारी जोडपी होती नातवड पतवड असलेली

इथे ब्रेकफास्ट करता सेल्फ सर्व्हिस होती ब्रेकफास्ट व रात्रीची १२ पैकी ८ जेवण कॉसमॉस तर्फे होती दोन जेवण जास्त पैसे भरून ऐच्छिक होती गरम गरम चहा दूध व कॉफी नळ असलेल्या स्टीलच्या पिंपातून ठेवलेली होती हवी तेवढी घ्यायची होती शेजारच्या ट्रे मधे, कोकोची पॅकेट्स, साखरेची पॅकेट्स होती बाजूच्या मशीन मधून गरम गरम ब्रेडचे लोफ येत होते जवळच लोणी जॅमची पॅकेट्स हा कॉन्टीनेंटल ब्रेकफास्टच पुढे सगळीकडे मिळणार होता

आम्ही त्यातलेच कांही लोक जॅम व लोण्याची पॅकेट्स टिशुपेपर नॅपकिन मधे लच करता चक्क बाधून घेतली युरोपात पाणी सर्व्ह करत नाहीत अस ऐकल होत पण काल जेवताना व आज ब्रेकफास्टच्या वेळी पण वेटर्सनी पाणी आणून दिल तरी वाटेत लागल तर असाव म्हणून आम्ही आमची वॉटर-बॅग दररोज भरुन घेत होतो

साडेसात वाजता बस निघाली आज आम्हाला ब्रुसेल्स मधून पुढे लक्झेंबर्ग व नतर फ्रान्सच्या हद्दीतून पुढे स्वित्झर्लंडच्या लेक लुझर्न ह्या गावी मुक्कामाला जायचे होते काल आम्ही लडन ते डोव्हर ८० मैल व उस्टॅंड ते नामूर ११५ मैल असा प्रवास केला होता आज आमचा प्रवास ३८० मैलाचा होणार होता

## ब्रुसेल्स

एका तासातच आम्ही ब्रुसेल्सला आलो ब्रुसेल्स हा बेल्जियमचा मध्यबिंदू इथले पण रस्ते स्वछ व नीटनेटके. एका चौकांत विसाव्या शतकाचे सिंबॉल म्हणून मोठ मोठया मॉडेल ॲटम्सच ॲटोनियम उभारलेल आहे बहुतेक मॉडेल्स म्हणजे मोठ्याची छोटी प्रतिकृती असते पण इथे उलटच छोटे मायक्रोस्कोपिक ॲटम्स मोठे केलेले १०० ते १५० फूट उंच असेल. सुंदर दिसत होत इथे चॅनल–५ ह्या जगप्रसिद्ध परम्यूमचा कारखाना आहे

इथल्या दुकानांवर तीन भाषेंत पाटया आहेत फ्लेमिश, फ्रेंच व इंग्लिश हा दूध दुभत्याचा प्रदेश त्यामुळे दुधाचे पदार्थ इथे स्वस्त

ब्रुसेल्समधे अनेक राजवाडे आहेत जुन्या पद्धतींच्या घरांबरोबरच आता नवीन स्टाईलची अपार्टमेंट हाऊसेस पण दिसतात

घर फारच टुमदार व छान दिसतात. स्वप्नांतल्या घरासारखी मागे पुढे बगीचा, बगीचात रंगीबेरंगी फुलाचे ताटवे, लॉन. इ

ब्रुसेल्स मधून बाहेर पडून आम्ही आरडेन ह्या सर्वांत सुंदर प्रदेशावरुन चाललो होतो. आता तर गार्डनमधूनच रस्ता जातोय अस वाटत होत मधून मधून कांही ठराविक भागामधे मुद्दाम जवळ जवळ व उंच झाड लावून जंगल तयार केलेली आहेत कारण लाकूडतोड हा एक प्रमुख धंदा आहे हिरव्या रंगाच्या असंख्य छटा बघायला मिळाल्या बाहेरचे मनुष्याने निर्माण केलेले सृष्टीसौंदर्य इतके विलोभनीय होते की सर्वांची तोंड बंद होती अगदी लिंडाची कॉमेंट्रि पण भरभरुन दृष्टीसुख आम्ही घेत होतो.

तीन तासात आम्ही बेल्जियम पार करुन लक्झेंबर्गच्या सीमेवर आलो इथल्या एका रेस्टपोस्टवर कॉफी–चहा पानाकरता थांबायचे होते.

पडेल, इतकी की स्वेटरपण पुरणार नाही म्हणूनच दोन जाड स्वेटर्स व एक स्की जॅकेट हूड असलेले आम्ही बरोबर घेतले होते ते वापरायची पण वेळ अनेकदा आली.

सुटकेसेस रुमबाहेर ठेऊन आम्ही खाली आलो आम्हाला वाटल आम्हीच पहिले असू पण नाही सर्व अमेरिकन लोक आमच्या आधी आलेले परत व्यवस्थित कपडे व मेकअप सहित शिवाय ताजेतवाने वाटत होते ह्यात पाच सहा म्हातारी जोडपी होती नातवंड पतवंड असलेली

इथे ब्रेकफास्ट करता सेल्फ सर्व्हिस होती ब्रेकफास्ट व रात्रीची १२ पैकी ८ जेवण कॉसमॉस तर्फे होती दोन जेवण जास्त पैसे भरून ऐच्छिक होती गरम गरम चहा दूध व कॉफी नळ असलेल्या स्टीलच्या पिंपातून ठेवलेली होती हवी तेवढी घ्यायची होती शेजारच्या ट्रे मधे, कोकोची पॅकेट्स, साखरेची पॅकेट्स होती बाजूच्या मशीन मधून गरम गरम ब्रेडचे लोफ येत होते जवळच लोणी जॅमची पॅकेट्स हा कॉन्टीनेंटल ब्रेकफास्टच पुढे सगळीकडे मिळणार होता

आम्ही त्यातलेच कांही लोक जॅम व लोण्याची पॅकेट्स टिशुपेपर नॅपकिन मधे लंच करता चक्क बांधून घेतली युरोपात पाणी सर्व्ह करत नाहीत अस ऐकल होत पण काल जेवताना व आज ब्रेकफास्टच्या वेळी पण वेटर्सनी पाणी आणून दिल तरी वाटेत लागल तर असाव म्हणून आम्ही आमची वॉटर बॅग दररोज भरुन घेत होतो

साडेसात वाजता बस निघाली आज आम्हाला ब्रुसेल्स मधून पुढे लक्झेंबर्ग व नतर फ्रान्सच्या हद्दीतून पुढे स्वित्झर्लंडच्या लेक लुझर्न ह्या गावी मुक्कामाला जायचे होते काल आम्ही लडन ते डोव्हर ८० मैल व उस्टॅंड ते नामूर ११५ मैल असा प्रवास केला होता आज आमचा प्रवास ३८० मैलांचा होणार होता

## ब्रुसेल्स

एका तासातच आम्ही ब्रुसेल्सला आलो ब्रुसेल्स हा बेल्जियमचा मध्यबिंदू इथले पण रस्ते स्वछ व नीटनेटके एका चौकात विसाव्या शतकाचे सिंबॉल म्हणून मोठ मोठया मॉडेल ॲटम्सच ॲटोनियम उभारलेल आहे बहुतेक मॉडेल्स म्हणजे मोठयाची छोटी प्रतिकृती असते पण इथे उलटच छोटे मायक्रोस्कोपिक अँटम्स मोठे केलेले १०० ते १५० फूट उच असेल सुदर दिसत होत इथे चॅनल–५ ह्या जगप्रसिद्ध परम्यूमचा कारखाना आहे

इथल्या दुकानांवर तीन भाषेत पाटचा आहेत फ्लेमिश, फ्रेंच व इंग्लिश हा दूध दुभत्यांचा प्रदेश त्यामुळे दुधाचे पदार्थ इथे स्वस्त

ब्रुसेल्समधे अनेक राजवाडे आहेत जुन्या पद्धतींच्या घराबरोबरच आता नवीन स्टाईलची अपार्टमेंट हाऊसेस पण दिसतात.

घर फारच टुमदार व छान दिसतात. स्वप्नांतल्या घरासारखी मागे पुढे बगीचा, बगीचात रगीबेरंगी फुलाचे ताटवे, लॉन इ :

ब्रुसेल्स मधून बाहेर पडून आम्ही आरडेन ह्या सर्वांत सुदर प्रदेशावरुन चाललो होतो. आता तर गार्डनमधूनच रस्ता जातोय अस वाटत होत मधून मधून कांही ठराविक भागामधे मुद्दाम जवळ जवळ व उच झाड लावून जंगल तयार केलेली आहेत कारण लाकूडतोड हा एक प्रमुख धदा आहे हिरव्या रगाच्या असंख्य छटा बघायला मिळाल्या बाहेरचे मनुष्याने निर्माण केलेले सृष्टीसौंदर्य इतके विलोभनीय होते की सर्वांची तोड बद होती अगदी लिडाची कॉमेंट्रि पण. भरभरुन दृष्टीसुख आम्ही घेत होतो.

तीन तासांत आम्ही बेल्जियम पार करुन लक्झेंबर्गच्या सीमेवर आलो. इथल्या एका रेस्टपोस्टवर कॉफी–चहा पानाकरता थांबायचे होते.

बेल्जियम जर्मनी व फ्रान्सनी वेढलेल जर्मनकवी 'गोथे' म्हणतो – Luxembourg is a scene which resembles nothing but itself' परन्तु ह्या सम हा ह्या त्याच्या मताशी आम्ही सहमत झालो

एवढ्याशा राष्ट्रांत शंभराच्यावर किल्ले आहेत. सर्व डोंगर शिखरावर आहेत प्रत्येक किल्ल्याला टॉवर आहे. युद्धाच्या वेळी ह्या टॉवर्संचा उपयोग तोफा डागण्याकरता किंवा शत्रूची हालचाल न्याहाळण्याकरता केला गेला त्यामुळेच हजार वर्षे हे चिमुकले राष्ट्र आपले स्वातन्त्र्य टिकवून आहे

इथे लोखडाच्या खाणी असल्याने स्टील चे अनेक कारखाने आहेत स्टीलमुळेच हे राष्ट्र श्रीमत बनलय इथल्या लोकाची रहाणी उच्च प्रतीची आहे

इथे अनेक रोमन अवशेष सापडतात त्यामुळे रोमन काळा पासून इथे वस्ती असावी इ. स ९६३ मध्ये एका काऊटने ही जागा विकत घेतली व एका रोमन किल्ल्यात तो राहू लागला तो स्वत.ला काऊट ऑफ लुसिलिनबर्च म्हणवून घेऊ लागला व आपल्या किल्याला त्याने 'लिटल फोर्ट' नाव दिले हेच पुढे लक्झेंबुर्ग. झाले

अनेक वर्षं राजघराण राज्य करत असल तरी आता मात्र राजसत्ताक लोकशाही आहे युरोपात मध्यवर्ती असल्याने ह्या चिमुकल्या राष्ट्राला खूपच महत्व आहे. इथला शेतकरी खूप कष्टाळू व हुशार आहे डोंगरदऱ्यात जेथे जागा मिळेल तेथे शेती करतात, व आपल्याला पुरेसे गहू व बटाट्याचे उत्पन्न काढतात तसेच डोंगर उतारांवर जिकडे तिकडे द्राक्षाचे मळे आहेत. ह्या द्राक्षापासून वाईन बनवतात म्हणून ह्याना इकडे वाइनरीच म्हणतात

आता अनेक किल्ले पडीक आहेत ह्याचा उपयोग भटके लोक कँप सारखा करतात. काही मध्ये म्यूझियम्स आहेत तर काहींची हॉटेल्स बनवली आहेत

ह्या किल्याबद्दल अनेक दंतकथा प्रसृत आहेत राजाचे खून व लढायामधे मेलेल्या लोकांच्या कथामुळे हे किल्ले भूताखेतानी झपाटलेले असल्याच्या अफवा पसरलेल्या आहेत ह्याचा उपयोग अनेक चित्रपट तयार करण्याकडे केलेला आहे

डोंगर, दऱ्या, धबधबे व तळी ह्याचीपण येथे रेलचेल असल्याने अनेक चित्रपटाचे शूटिंग पण इथे होते डोंगर शिखरावर चित्रविचित्र आकारांचे खडक दिसतात तर दऱ्यांमधे जगली फुले फुललेली दिसतात जणूकाही फुलाचा गालिचाच घातला आहे. पण हे सौंदर्य फक्त उन्हाळ्यातच नेपोलियनने हे राष्ट्र जिंकले होते नंतर अनेक राजानी ह्यावर राज्य केले दोन्ही महायुद्धात जर्मनानी इथे धुमाकुळ घातला, व ह्या राष्ट्राची अतोनात हानी केली. इ स १९३९ मधे इगलडने ह्या राष्ट्राला स्वतत्र व तटस्थ राष्ट्र म्हणून घोषित केले.

आत्ताचा राजा (हॉऊस ऑफ नॉसॉ) ग्रँड ड्यूक जीन हा आहे. इ सन् १९६४ मधे तो गादीवर आला. बेल्जियम प्रमाणेच इथेही फ्रँक हे नाणे चालते. पण इथला फ्रँक वेगळा आहे

ह्याच्या मातृभाषेवर अनेक भाषाचा प्रभाव पडला आहे प्रथम फ्रेंच होती. जर्मनाच्या ताब्यात असताना जर्मन कपलसरी झाली पण आता फ्रेंच हीच राजकीय भाषा आहे शिवाय इंग्लिश व जर्मन पण बोलली जाते

यूनायटेड नेशन्सचे हे सभासद आहे तसेच नाटो व कॉमन मार्केटचे पण सभासद आहे युरोपियन एकात्मतेचा हा मध्यबिंदू आहे

एका तासातच आम्ही लक्झेंबर्ग ओलाडून फ्रान्सच्या सीमेवर पोहोचलो सीमेवर दोन्ही देशांच्या चौक्या समोरा समोर आहेत. परत पासपोर्ट बघण्याचा कार्यक्रम होऊन आम्ही फ्रान्स मधे प्रवेश केला आत्ता आम्हाला फक्त फ्रान्स मधून स्वित्झर्लंडला जायचे होते

रेस्टपोस्टवर प्रवाशाना लागणाऱ्या अनेक छोटया मोठ्या वस्तुचे दुकान आहे व बाजूलाच हॉटेल बाथरुमची व्यवस्था पण असते तेथे पांच बेल्जियम फ्रँक्स द्यावे लागले. पुढे युरोपात सगळीकडेच पैसे मोजावे लागल्याने बरेच पैसे अक्षरश: पाण्यात गेले

इथे २५ तरी प्रवासी बसेस थाबलेल्या होत्या. त्यामुळे गावात रस्त्यांवरुन एखाद दुसराच माणूस दिसत असला तरी इथे मात्र खूपच गर्दी होती चहा कॉफी करता भला मोठा क्यू होता

दुकानात चॉकलेट गोळ्या बिस्किटां बरोबरच दुधाच्या बाटल्या (दुधाने भरलेल्या लहान बाळाला पाजायच्या नव्हेत) बघून लहान मुलांनपेक्षाही जास्त आनंद झाला. पुरणाच्या पोळी बरोबर दूध हवेच फ्रेंचमधे दुधाला ओले म्हणतात दुधा सहित कॉफी हवी असल्यास किंवा चहा हवा असल्यास कॅफे ओल किंवा टी-ओले म्हणतात

एक तास थाबून ११॥ वाजता आम्ही पुढे निघालो

# लक्झेंबर्ग

आता आमच्या रस्त्याच्या एका बाजूला बेल्जियम तर दुसऱ्या बाजूला लक्झेंबर्ग सुरु झालें, व लगेचच दोन्ही देशाची सीमा आली इथे पासपोर्ट दाखवावे लागले ठराविक सोपस्कार झाल्यावर आम्ही निघालो, लगेच रस्त्याच्या कडेनी ओळीनी अनेक पेट्रोलपंप आहेत लक्झेंबर्ग हे टॅक्स फ्री राष्ट्र असल्याने पेट्रोल स्वस्त त्यामुळे सर्व प्रवासी बसेस व ट्रक्स इथे पेट्रोल भरुन घेतात एवढच काय पण बेल्जियमचे रहिवाशीसुद्धा इथे येऊन पेट्रोल भरुन जातात

लक्झेंबर्ग हे चिमुकले स्वतंत्र राष्ट्र आहे ह्याला प्रिन्सिपालिटी म्हणतात कारण हे राजाचे राज्य आहे त्यामुळेच इथे अनेक परिकथा व आख्यायिका ऐकायला मिळतात

हे डोंगरदऱ्यांतून वसलेलें असल्याने यथे निसर्गाचा वरदहस्त आहे स्वरसप्तकात बसवायच झाल तर इंग्लड षड्जावर, बेल्जियम ऋषभावर तर लक्झेंबर्गला गाधार म्हणाव लागेल एक एक पायरी आम्ही वर चढत होतो

इथे हिरव्यागार पाचूच्या रगाच्या कुरणांबरोबरच मधून मधून निळेभोर जलाशय होते ठिकठिकाणी बेल्जियम पेक्षा इथली वनश्री नुकतीच न्हायल्यासारखी टवटवींत दिसत होती

लक्झेंबर्गच खर नांव 'ग्रँड डची लक्झेंबर्ग' असे आहे. लक्झेंबर्ग ही राजधानीं जेमतेम ५५ मैल लाब व ३५ मैल रुंद. म्हणजे क्षेत्रफळ फक्त दोन हजार चौ फूट लोकवस्ती फक्त साडेतीन लाख म्हणजे आपल्याकडल्या लहान गावा एवढी

बेल्जियम जर्मनी व फ्रान्सनी वेढलेल जर्मनकवी 'गोथे' म्हणतो – Luxembourg is a scene which resembles nothing but itself' परन्तु ह्या सम ह्या. ह्या त्याच्या मताशी आम्ही सहमत झालो

एवढ्याशा राष्ट्रात शभराच्यावर किल्ले आहेत. सर्व डोंगर शिखरांवर आहेत प्रत्येक किल्ल्याला टॉवर आहे. युद्धाच्या वेळी ह्या टॉवर्सचा उपयोग तोफा डागण्याकरता किंवा शत्रूची हालचाल न्याहाळण्याकरता केला गेला. त्यामुळेच हजार वर्षे हे चिमुकले राष्ट्र आपले स्वातंत्र्य टिकवून आहे

इथे लोखडाच्या खाणी असल्याने स्टील चे अनेक कारखाने आहेत स्टीलमुळेच हे राष्ट्र श्रीमत बनलय इथल्या लोकाची रहाणी उच्च प्रतीची आहे

इथे अनेक रोमन अवशेष सापडतात त्यामुळे रोमन काळा पासून इथे वस्ती असावी इ. स ९६३ मधे एका काऊटने ही जागा विकत घेतली व एका रोमन किल्ल्यांत तो राहू लागला तो स्वत ला काऊट ऑफ लुसिलिनबर्च म्हणवून घेऊ लागला व आपल्या किल्याला त्याने 'लिटल फोर्ट' नांव दिले हेच पुढे लक्झेंबुर्ग झाले

अनेक वर्ष राजघराण राज्य करत असल तरी आता मात्र राजसत्ताक लोकशाही आहे युरोपांत मध्यवर्ती असल्याने ह्या चिमुकल्या राष्ट्राला खूपच महत्व आहे इथला शेतकरी खूप कष्टाळू व हुशार आहे. डोंगरदऱ्यांत जेथे जागा मिळेल तेथे शेती करतात, व आपल्याला पुरेसे गहू व बटाट्याचे उत्पन्न काढतात तसेच डोंगर उतारांवर जिकडे तिकडे द्राक्षाचे मळे आहेत ह्या द्राक्षांपासून वाईन बनवतात म्हणून ह्याना इकडे वाइनरीच म्हणतात

आता अनेक किल्ले पडीक आहेत. ह्याचा उपयोग भटके लोक कँप सारखा करतात. काही मधे म्यूझियम्स आहेत तर काहींची हॉटेल्स बनवली आहेत

ह्या किल्याबद्दल अनेक दंतकथा प्रसृत आहेत राजाचे खून व लढायामधे मेलेल्या लोकाच्या कथामुळे हे किल्ले भूताखेतानी झपाटलेले असल्याच्या अफवा पसरलेल्या आहेत. ह्याचा उपयोग अनेक चित्रपट तयार करण्याकडे केलेला आहे

डोंगर, दऱ्या, धबधबे व तळी ह्यांचीपण येथे रेलचेल असल्याने अनेक चित्रपटाचे शूटिंग पण इथे होते डोंगर शिखरावर चित्रविचित्र आकाराचे खडक दिसतात तर दऱ्यांमधे जंगली फुले फुललेली दिसतात जणूकाही फूलाचा गालिचाच घातला आहे पण हे सौंदर्य फक्त उन्हाळ्यातच नेपोलियनने हे राष्ट्र जिंकले होते नतर अनेक राजानी ह्यावर राज्य केले दोन्ही महायुद्धात जर्मनानी इथे धुमाकुळ घातला, व ह्या राष्ट्राची अतोनात हानी केली इ स १९३९ मधे इंग्लडने ह्या राष्ट्राला स्वतत्र व तटस्थ राष्ट्र म्हणून घोषित केले

आत्ताचा राजा (हॉऊस ऑफ नॉसॉ) ग्रॅंड ड्यूक जीन हा आहे. इ सन् १९६४ मधे तो गादीवर आला. बेल्जियम प्रमाणेच इथेही फ्रॅंक हे नाणे चालते. पण इथला फ्रॅंक वेगळा आहे

ह्याच्या मातृभाषेवर अनेक भाषाचा प्रभाव पडला आहे प्रथम फ्रेंच होती जर्मनाच्या ताब्यात असताना जर्मन कपलसरी झाली पण आता फ्रेंच हीच राजकीय भाषा आहे. शिवाय इंग्लिश व जर्मन पण बोलली जाते

यूनायटेड नेशन्सचे हे सभासद आहे तसेच नाटो व कॉमन मार्केटचे पण सभासद आहे युरोपियन एकात्मतेचा हा मध्यबिंदू आहे

एका तासातच आम्ही लक्झेंबर्ग ओलाडून फ्रान्सच्या सीमेवर पोहोचलो. सीमेवर दोन्ही देशाच्या चौक्या समोरा समोर आहेत. परत पासपोर्ट बघण्याचा कार्यक्रम होऊन आम्ही फ्रान्स मधे प्रवेश केला आत्ता आम्हाला फक्त फ्रान्स मधून स्वित्झर्लंडला जायचे होते

## सह प्रवासी

काल बस मधे बसल्यावर 'रोज रोटेशने जागा बदलायच्या' असे लिंडाने सांगितले होते पण काल बस मधे बसताना हे माहित नव्हते आम्हाला वाटल होत की जागा ठरवलेल्या असतील त्यामुळे आम्ही आरामात उशीरा बसमधे चढलो त्यामुळे उरलेल्या मिळतील त्या जागा घ्याव्या लागल्या अशोक व जयूला लांब बसावे लागले. असेच अनेकाना झाले त्यामुळे आज सर्वांनी हव्या त्या जागा पटकावल्या, थोडे वाद विवाद झाले पण लिंडाने सर्वांची समजूत काढून ते मिटवले

आत्ताचा प्रवास बराच मोठा होता व बाहेर बघण्यासारखे फारसे नव्हते म्हणून लिंडाने आपली आपली ओळख करुन घेण्याची टूम काढली. फॅमिलीतील एकाने समोर येऊन आपली व फॅमिलीची थोडी माहिती सांगायची होती प्रत्येक जण धडधडत्या अंत करणाने येऊन वाघ मागे लागल्यासारखे बोलून जात होते मातृभाषा इंग्लिश असूनही पन्नास लोकांसमोर न घाबरता बोलण्याच धैर्यही फार थोड्या लोकांत असत हे लक्षात आल

आता इतक्या लोकांची नावे लक्षात रहाण कठीणच पण वेळ छान गेला दोन मलेशियन जोडपी, दोन हॉंगकॉंगची चीनी जोडपी. एकाची तरूण मुलगी व एक चिनी मुलगा त्यांच्याच मागच्या सीटवर बसलेले. हा चीनी मुलगा हॉंगकॉंगचाच. पण सध्या इंग्लंडला एज्युकेशन ऑफीसरच्या ट्रेनिंगकरता आलेला काल प्रत्येकाने त्याच्या विषयी निरनिराळे तर्क केलेले मला ते बहिण भाऊ वाटले तर अशोक व जयूला नवरा बायको. आज कळल की त्याची ओळख कालच झाली मग तिच्याकडून कळल की अनेकांना ते तरूण युगुल आहे असच वाटल होत व हे सांगताना ती इतकी गोड लाजली की तिच गुपित आम्ही ओळखल. पण तिचे वडील मात्र घुश्शात दिसले. दोघेही छान होते, अगदी मेड फॉर इच अदर त्याचे नाव 'चू' होते तर तिचे 'ली'.

आम्ही चार कुटुंबे इंडियाची होतो एक मुबईचे सारगन व त्याचा आठ वर्षाचा मुलगा त्याना कॅटबरीच्या स्पर्धेत ४५ हजार रुपयाच बक्षिस मिळालेल एक मुस्लिम डॉक्टर सध्या दुबईला असलेला व मुल भारतात शिकायला ते चौघेही होते एक ब्रिटिश जोडप परन्तु सध्या अमेरिकेत असलेले ती ब्रिटिश बाई खूपच टापटिपित शिस्तीत व मोजून हसण मोजून बोलण अशी होती. तिला बघूनच ती ब्रिटिश आहे हे कळत होते बहुदा म्हातारपणी लग्न केल असाव. तिचा नवरा ओळख करून द्यायला आला तर त्याने आपण विडो असल्याचे चुकून सांगितले ती बाई त्याला रागावली तेव्हा परत येऊन त्याने चुकीची दुरुस्ती करुन बायकोची ओळख करून दिली व नतर त्या बाईने बरेच जोकही व कोडी सागितली.

बाकी सर्व अमेरिकन होते तीन बहिणी होत्या फिजिकल ट्रेनिगच्या इन्स्ट्रक्टर त्यानी दिवसातुन दोन वेळा व्यायाम म्हणून बस भोवती फेऱ्या मारण्याची टूम काढली एक श्रीमत विधवा थोडी मदमती वाटत होती. ज्याला त्याला गुदगुल्या करुन हसवायची व काहीं तरी बोलून स्वत ही हसायची. तिच बोलण कळतच नसे आपण काही विचाराव तर ती भलतच बोलायची व सतत हसत असायची तिच नाव नवराते होत

एक लठ्ठ होता तो नेहमीच अगदी मागच्या बाकावर दोन रागाच्या मधल्या सीटवर बसायचा कारण नेहमीच्या सीटवर तो मावलाच नसता ओळख करून देताना त्याने सरळच बॅचलर असून अॅव्हायलेबल असल्याचे सागून टाकले एक आणिक विधवा बाई होती तिच्याशी दोस्ती करण्याचा त्याचा प्रयत्न चालू होता. पुढे तीला दुसऱ्या बस मधे मैत्रिण मिळाली तर तीने बसच बदलून घेतली एक हॉटेलची मालकीण अगदी म्हतारी आपल्या मॅनेजर बाई बरोबर होती ती तिची कपॉनियन होती चार म्हातारी जोडपी होती. एकाची बायको चेन स्मोकर होती त्यामुळे त्यांना सतत मागे बसावे लागे त्याला त्रास होई तेव्हां तो पुढे येऊन उभा राही.

शेवटी लिंडानी स्वतःची व निकीची ओळख करून दिली लिंडा अविवाहित असून तिचा लग्न न करण्याचा विचार आहे

तिची फॅमिली खूप मोठी आहे गरजेपोटी ती कामाकरता बाहेर पडली फ्रान्स व इटलीत तिचे शिक्षण झाल्याने इग्रजी बरोबरच फ्रेंच व इटालियन ती चागल बोलते दोन ट्रीप्स मधे फक्त एक दिवस ती विश्राती घेते सतत हिंडण तिला आवडत तिला जर्मन थोड येन ती स्वत व्हेजिटेरियन आहे कोणाला मारुन खाण तिला पसत नाही ती व निकी आमच्या बरोबर कधीच जेवत नसत, त्यामुळे लिंडा व्हेजिटेरियन म्हणून काय खाते ते कळले नाही

निकी इटालियन असून तीन मुलाचा बाप आहे तो जवळ जवळ चाळिशीचा होता तरी सर्व इटालियन्स प्रमाणेच रगेल आहे अस लिंडा सागत होती त्याला प्रवासात अनेक गर्लफ्रेंडस आहेत असही तिन सांगितल तेन्हा आम्हाला ती मजा करते आहे अस वाटल पण नतर खरोखरच त्याची गर्लफ्रेंड आम्ही नुसती बघितली नाही तर तिने आमच्या बस मधून थोडा प्रवास पण केला कॉलगर्ल असावी

एवढ होई पर्यंत एक वाजला लचची वेळ झाली एका रेस्ट पोस्टवर थाबलो आज क्यू मधे उभे राहून क्रोसाड नावाचा ब्रेडचा प्रकार घेतला भरपूर लोणी आत असत त्यामुळे हे क्रोसाड मऊ व खुसखुशीत लागतात खेकड्याच्या पुढच्या पाया प्रमाणे त्याचा आकार असतो

आता आम्ही स्ट्रासबर्ग व नॅन्सी ह्या दोन गावामधून चाललो होतो स्ट्रासबर्ग पूर्वी जर्मनीत होत म्हणे त्यामुळे तेथे जर्मन भाषिक लोक जास्त आहेत हे र्‍हाईन ह्या प्रसिद्ध नदीकाठच शहर. ह्या नदीतून मोठ्या प्रमाणात वाहतुक होते त्यामुळे हे बंदरच आहे. येथे ह्या नदीतून अनेक कॅनॉल्स काढून रस्त्या सारखाच ह्याचा वाहतुकीला उपयोग करतात

कॉन्सिल ऑफ युरोप ह्या सस्थेचे मुख्य कार्यालय इथे आहे युरोपात एकात्मता व शातता राखणे व ह्या देशाची प्रगती करणे हे ह्या सस्थेचे प्रमुख उद्दीष्ट आहे.

फ्रान्सच्या ह्या भागात तसे सृष्टीसौंदर्य नाहीच, पण लाबच लांब पसरलेल्या वाइनरीज, शेते व मधेच दिसणारे पिवळ्या धमक

फुलाचे गालीचे ह्यामुळे नयनरम्य दिसते ही फुले मोहरीच्या फुला-सारखी ह्याच्या बियापासून तेल काढतात ह्याना पुशो म्हणतात मे मधे ह्याचा फुलण्याचा सीझन असतो ही शेते सुदर दिसतात.

आम्ही आता फ्रान्स व स्वित्झर्लंडच्या सीमेवर होतो सेंट लुई हे फ्रान्स मधल तर बाल किंवा बाझल. हे स्वित्झर्लंड मधील सीमेवरच शहर समोरा समोर दोन्ही देशांच्या चौक्या दोन्ही अधिकारी एकमेकाशी सुखसवाद करत उभे होते बाझलला लागूनच जर्मनीची पण सीमा आहे सर्व प्रोसीज्यर होऊन सीमा ओलांडली तर एक इटालियन हॉटेल दिसल. फ्रान्स, जर्मनी व स्वित्झर्लंडच्या सीमेवर इटालियन हॉटेल पाहून आश्चर्य वाटले. इटालियन खाद्य-पदार्थ किती प्रसिद्ध आहेत ह्याचा प्रत्यय आला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८८ २२९
३-१२

# स्वित्झर्लंड

## बाल–बाझल

बाल हे स्वित्झर्लंड मधील दुसऱ्या नंबरचं शहर पहिलं जिनेव्हा बालची लोकसंख्या फक्त चार लाख ऱ्हाईन नदीवर वसलेले ह्या नदींतून इतर देशाशी व्यापार चालतो इथे रोमन अवशेष बरेच सापडतात ख्रिस्तपूर्व पन्नाशे वर्षापूर्वीच्या किल्याचे अवशेष सापडले आहेत म्हणजे हे अतिपुरातन शहर असले पाहिजे

इथले रस्ते दुकाने छोटी छोटी आहेत. परन्तु स्वच्छ व नीट-नेटकी बाझल मधून जात असता मोठ मोठ्या प्रसिद्ध औषधी कंपन्यांच्या इमारती दिसल्या सिबा गायगी सँडोज, रोश तिन्ही कंपन्यांचे कारखाने व मुख्य कार्यालये इथे आहेत

येथे टॅक्स नाही शिवाय उत्तम हवा व भरपूर पाणी ह्यामुळे अनेक श्रीमंत लोकांनी इथे धंदे सुरू केले जगातील अनेक श्रीमंत लोकांची इथल्या बँकेत खाती आहेत कारण इथल्या बँका ह्या बाबत गुप्तता राखतात. त्यामुळे कोणीही कितीही रक्कम इथे सुरक्षित ठेऊ शकतो

बाझल मध्ये एक परफ्यूम फॅक्टरी आहे तसेच अनेक कापडाच्या गिरण्या आहेत दरवर्षी इथे मोठे औद्योगिक प्रदर्शन भरते. इथे बससेच्या बरोबरीने ट्राम्स दिसल्या–पण ह्या ट्राम्स रूळावर नसून रस्त्यानेच धावत होत्या ट्राम्सना बस सारखी टायर्सची चाके होती.

इथली गावे सुंदर त्यांच प्रमाणे इथली माणसे सुंदर उंच गोरी, तगडी, निळ्या डोळ्याची व भुऱ्या केसाची निरोगी. सगळच कसं मनोवेधक.

बाझल सोडून पुढे निघालो स्वित्झर्लंड, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया व इटलीनी वेढलेला राजकारणात तटस्थ, उत्तरेचा भाग डोंगराळ दक्षिणेला सुप्रसिद्ध आल्प्स मध्य स्वित्झर्लंड हे पठार मुख्य शेती ह्या पठारावरच होते तरी डोंगराच्या उतारावरही जिकडे तिकडे शेती दिसत होती पण ह्या देशाचा फक्त एक चतुर्थांश भाग शेतीला उपयुक्त आहे. त्यामुळे धान्य व भाजीपाला आयात करावा लागतो आल्प्सच्या उतारावर अनेक फळझाडे लावून फळ काढतात व त्याचे जॅम व जेलीज करुन निर्यात करतात. ह्या फळापासून ब्रँडी तयार होते

आता रस्ता एका बोगद्यात शिरला बोगदा बराच मोठा आहे बोगद्यात दिव्याचा चागलाच झगमगाट होता ह्या बोगद्यात इमरजेंन्सीकरता फोनची सोय पण होती

लहानपणी वडील स्वित्झर्लंडचे सीन असलेली सुदर कॅलेंडर्स आणायचे ते सीन बघून आम्ही हरखून जायचो कधीतरी ही स्वप्न-सृष्टी बघायला मिळेल अस स्वप्नात पण त्यावेळी वाटल नव्हत. ती, मी खरोखरच त्या स्वप्नसृष्टींत आले होते. व भरभरून सृष्टीसुख घेत होते.

आता आम्ही लुझर्न ह्या सरोवराकाठच्या लुझर्न ह्या गावा जवळ आलो हे गाव पठारावर आहे. फक्त २० मैलावर आल्प्स आहे लाबूनच बर्फाच्छादित शिखरे दिसायला लागतात अनेक उंच शिखरे नेहमीच बर्फाच्छादित असतात ह्या उन्हात लखलखणाऱ्या शिखरांखाली हिरवे गर्द डोंगर, मधून मधून पिक रगाचे सगम-रवराचे डोंगर ह्या डोगरामधे मधून मधून सुदर घरे वर स्वच्छ निळे आकाश. नजर फिरवली की वेगळा सीन कॅलिडिओस्कोपची नळी हलवली की जसे प्रत्येक वेळी निराळ्या रगसगतीचे निराळे डिझाईन दिसते तसेच वाटत होते अनेक रंग. पण इथल्या सौंदर्यांत वसुधरेची फक्त कोमलता नव्हती तर तीव्रता होती. तीव्र मंदार लागल्या सारखा वाटत होता. खाली वनश्रीचे कोमल हिरवे गार रुप तर वर बर्फाची शुभ्रता. उन्हामुळे रजततेजाने चमकणारी शिखरे

पांढरा शुभ्र बर्फ पण सुंदर दिसू शकतो फक्त त्याला जोड हवी हिरव्या निळ्या व इतर रंगाची मंत्रमुग्ध अवस्थेत असतानाच एक झटका देऊन बस थांबली एकदम समेवर आल्यासारखे वाटले रेस्टपोस्टवर कॉफी–ब्रेक होता आम्ही तहान–भूक हरपलो होतो पण आमची गाईड व ड्रायव्हर आपले कर्तव्य विसरत नव्हते. त्यांना ह्या सर्व गोष्टी नेहमीच्याच

आधी मोर्चा टॉयलेट मध्ये सिंकला तोटीच नाही आता काय करावं ? बाजूच्या सिंकच्या नळातून पाणी येत होत तेथे एक बाई हात धूत होती थोडं निरिक्षण केल्यावर लक्षात आल की नॉब पायाशी आहे त्यावर पाय ठेवल्या बरोबर नळातून पाणी यायला लागलें

आज येथे गर्दी होती. गर्दीचा फायदा घेऊन बशींत पैसे न टाकताच आम्ही तिथल्या बाईचा डोळा चुकवून आत शिरलो व पैसे वाचवले.

चहा शंकरपाळे खाऊन बसशी आलो अमेरिकन वहिणी बस भोवती फेऱ्या मारत होत्या अमेरिकन लोकांचा हा मोकळेपणा मला फार आवडतो उगीचच कोण काय म्हणेल ह्याचा फालतू विचार ते करत नाहींत आपल्याला हव ते करून मोकळे होतात परत खिलाडू वृत्तीनी. आपल्याला बस भोवती धावायची नक्की लाज वाटेल पण अशोक पटवर्धननी मात्र न लाजता धावायला सुरवात केली पण त्यांचा वेग कमी पडल्याने त्या वहिणीमधली एक त्यांच्या मागे येऊन त्यांना घाई करायला लागली व हसत हसत तिने धमकीच दिली की तुम्ही जोरात धावला नाहीत तर आता मी तुम्हाला पकडणार व तसाच अविर्भाव ही केला दोन वेळा धमकावल्यावर ते शरणागती पत्करून सरळ बाजूला झाले. आमची हसता हसता पुरेवाट झाली इकडे जयू डोळे वटारून त्यांचे कडे बघत होती बहुधा तिच्या डोळ्याकडे बघूनच त्यानी काढता पाय घेतला असावा. त्या नंतर मात्र त्यानी धावणच बंद केल

सर्व जण बसमध्ये चढले व बसने वेग घेतला बाजूच्या डोंगर उतारावर द्राक्षाची लागवड केलेली दिसत होती लिडाची कॉग्रेंट्री सुरू झाली इथे इनकम टॅक्स नसल्याने अनेक लोक इथल्या बँकेत आपला काळा पैसा ठेवतात. व्याज फक्त ३ ते ४ % मिळत. पण अकाउंट्स गुप्त राखले जातात दहा हजार डॉलर्सच्या वर रक्कम अकाऊंटला असेल तर स्पेशल अकाऊंटट बँकेतर्फे मिळतो तो तुमचे सर्व व्यवहार बघतो बँक प्रत्येकाला एक कोड नंबर देते तो सांगितल्या शिवाय आंत प्रवेशच मिळत नाही सरकार तर्फे इथे फक्त पोस्ट ऑफीस चालवले जाते बाकी सर्व गोष्टी प्रायव्हेट कंपन्या किंवा फर्मस् बघतात इथल्या प्रत्येक रहिवाशाला सैनिकी शिक्षण आवश्यक असते दर पाचवर्षांनी परत ट्रेनिंग घ्यावे लागते खर तर हे तटस्थ राष्ट्र आहे. गेल्या ४०० वर्षांत ह्याना कधी युद्धाचा प्रसंग आलेला नाही. तरीही युद्धाची जय्यत तयारी ठेवलेली असते बायकांना सुद्धा रायफल चालवायचे ट्रेनिंग दिलेले असते

इथे लोकवस्ती कमी असल्याने, कामाकरता बाहेरुन लोक बोलवावे लागतात बहुतेक मेहनतीच्या कामा करता दक्षिण इटली व स्पेन मधून लोक येतात

गावाबाहेर पडल्यावर परत निसर्गाच्या सान्निध्यात आलो समोरच्या हिरव्यागार डोंगरांतून मधून मधून असंख्य छोटे मोठे धबधबे कोसळत होते त्याच फेसाळत पाणी उन्हाने चमकत होते त्यांच्या तुषारामधून सूर्यकिरण गेल्यावर इंद्रधनुष्याचे रंग पसरत होते असंख्य हिरे चमकल्या सारखे वाटत होते तळी व धबधब्यांच्या बाबतीत ह्याचा दुसरा नंबर आहे ऑस्ट्रियाचा पहिला नंबर लागतो आल्प्स पर्वत पश्चिमेला फ्रान्स पर्यंत, तर पूर्वेला ऑस्ट्रिया-च्या मध्यापर्यंत पसरलेला आहे. लांबीला हिमालया एवढाच असला तरी हिमालयाची उंची मात्र गाठलेली नाही सर्वात उंच शिखर १५ हजारफूट उंच आहे, ते ऑस्ट्रियात आहे

उद्या आम्हाला एंग माऊंटनवर केबलकारने जायचे होते ही ऐच्छिक राईड होती इथली घर वेगळ्या पद्धतीची आहेत. खालून

वर दोन्ही बाजूनी निमुळती होत गेलेली दोन्ही बाजूनी उतरती छप्परे व मध्ये एक परत छप्पर घराना खूप खिडक्या जेमतेम ३ ते ४ मजली घरे होती आम्ही लुझर्नमध्ये प्रवेश केला होता रस्ते स्वच्छ नीट नेटके पण फारच छोटे होते बस जेमतेम जात होती एका बोळातून आम्ही चौकात आलो चौकांत एक पुतळा उभारलेला आहे व त्याच्या बाजूनी कारंजी त्यांचा हीरो विल्यम टेल ह्याचा तो पुतळा आहे चौकातच डाव्या हाताला आमचे हॉटेल रोझेली आहे

सामान उतरवून निकी बस दुसरी कडे पार्क करायला घेऊन गेला तेथे जागाच नव्हती हॉटेल लहानसेच त्यामुळे लिफ्ट ही छोटीच म्हणूनच आम्ही सरळ जिन्यानेच आमच्या चौथ्या मजल्या-वरील खोलीत गेलो

रूम म्हणजे एक अरुंद बोळच होती. दोन सिंगल बेड्स एका पाठोपाठ एक भिंती लगत ठेवलेले सुरवातीलाच बाथरूम कमोड शेजारीच पार्श्वभाग धुण्याकरता एक सीट होती मी तरी हा प्रकार प्रथमच बघितला म्हणजे हे लोक अमेरिकन लोकाप्रमाणे टिशू पेपर वापरत नाहीत तर

रस्त्याच्या बाजूला एक खिडकी होती खिडकीशी गेल्यावर मात्र खोलीतील गैरसोई विसरून आल्प्सचे विलोभनीय सौंदर्य बघण्यात मग्न झालो लांब वरची बर्फाच्छादित शिखरे रजत तेजाने चमकत होती खाली हिरवेगार डोंगर मधूनच लाल पिवळ्या दगडाच्या टेकड्या डोंगराच्या अंगा खांद्यावर बागडणारे धबधबे मधून मधून रंगीबेरंगी घरे, तलाव, शेते सर्व कस चित्र काढल्या सारख दिसत होत फटाफटा फोटो काढले खिडकीतून हलावेसेच वाटेना. पण आता अंधाराचे साम्राज्य पसरु लागले व आठ वाजता खाली जेवायला जायचे होते

आज व्हेजिटेबल सूप व ब्रेड नंतर टोस्ट व त्यावर मशरूम चीज सॉस अशी डीश आली मशरुमला आपण कुत्र्याची छत्री म्हणतो व म्हणून ते खावेसे वाटत नाही पण कापून शिजवलेले

मशरुम छान लागते हे आजच कळले चीज सॉस खूपच छान लागले आज जेवणाचे समाधान मिळालें शेवटी स्वीट डीश होतीच पाणी पण मिळालें

आज ८ तारीख पहाटेच जाग आली पण उजाडले होतेच. परत एकदा खिडकीतून लाबवर दृष्टी टाकली सर्व आवरून खाली आलो देश बदलत होते, निसर्ग बदलत होता पण आमचा नाश्ता मात्र कायम तोच, त्यात काही बदल नाही नेहमी प्रमाणे शिदोरी बाधून घेतली

साडे सातला बस निघाली गावांत दोन तास खरेदीकरता सोडणार होते लिंडाची कॉमेंट्री सुरू झाली कालच्या प्रमाणे आज ही प्रथम तिने निकीला विश केले व आम्हालाही त्याला गुडमॉनिंग करायला सांगितले पुढे रोज आम्ही सर्व एकदम दोघाना विश करु लागलो

स्वित्झर्लंडचे क्षेत्रफळ जवळ जवळ महाराष्ट्राच्या निम्मे म्हणजे १६००० चौ फूट आहे ऱ्हाईन ऱ्होन, टिसिनो व इन ह्या चार मोठ्या नद्या आल्प्सच्या कुशीत उगम पावून चार दिशांना वाहतात

बर्न ही स्वित्झर्लंडची राजधानी. तिची लोकसख्या फक्त ७० लाख आहे

दक्षिणेला आल्प्स तर उत्तरेला जुरा पर्वत पसरलेला आहे इथल्या नद्या व तळ्याचा उपयोग वीज निर्मिती करता मोठ्या कौशल्याने केलेला आहे व कोळशाची उणीव भरुन काढली आहे म्हणून इथल्या पाण्याला हे लोक 'व्हाईट कोल' म्हणतात ह्या हायड्रोइलेक्ट्रिक पॉवरवरच इथे अनेक कारखाने चालतात. खर तर कच्चामाल इथे फारसा तयार होत नाही सर्व बाहेरुन आयात होतो दक्षिणेला आल्पस्च्या पायथ्याशी मोठ मोठी कुरणे आहेत, इथे दुधदुभत्याचा धंदा जोरात चालतो इथे चॉकलेट पण मोठ्या प्रमाणात तयार होते. इथले चीज चॉकलेट व इतर दुधाचे पदार्थ जगप्रसिद्ध आहेत अमेरिकेत तर स्विसमिस ह्या कपनीचे पदार्थ सर्व

दुकानात मुबलक प्रमाणात दिसतात छोटासा देश असला तरी जे पदार्थ इथे होतात ते मोठ्या प्रमाणावर बनवले जातात

इथली घड्याळे तर सुप्रसिद्ध आहेतच. इथले लोक अतिशय कष्टाळू आहेत. असं म्हणतात की सतराव्या शतकांत एक इंग्लिश माणूस इथे आला असता त्याचे घड्याळ बंद पडले. सहज उत्सुकता म्हणून त्याच्या जवळच्या एका स्विस माणसाने ते बघायला मागितले व रिपेअर करुन दिले. व त्याचे डिझाईन लक्षात ठेऊन लगेच तसे बनवले व तेव्हा पासून त्याचा घड्याळे बनविण्याचा धंदा सुरु झाला व वाढता वाढता वाढे ह्या न्यायाने जगभर ही घड्याळे प्रसिद्ध झाली. प्रसिद्ध 'सिको' कंपनी इथलीच

ह्या बर्फाच्छादित पर्वत राजींमुळे जेवढे सौंदर्य ह्या देशाला प्राप्त झाले आहे तेवढीच भिती पण निर्माण झालेली आहे अनेकदा जोराच्या वाऱ्याने बर्फ वितळून मोठाले बर्फाचे खडे मोकळे होतात व खाली घसरत येऊन वाटेत येणारी घरे झाडे व शेतेच्या शेते गडप करतात त्याला 'अॅव्हालंच' म्हणतात पण अनेक वेळा हेच पर्वत देशाच संरक्षण पण करतात

ह्या बर्फाच्छादित पर्वतांवर स्केटिंग व स्कीईंग हे सर्वांत आवडते पण तेवढेच धोक्याचे खेळ इथले लोक सऱ्हास खेळतात. प्रत्येक मुलाला लहानपणीच ह्या खेळाचे शिक्षण मिळते.

इथल्या सृष्टी सौंदर्यामुळे अनेक चित्रपटाचे शूटिंग इथे होते, तसेच प्रवाशाची पण इथे सतत वर्दळ असते प्रवासी हे इथल मोठं उत्पन्न आहे प्रवाशाकरता तशाच उत्तम सोई पण इथे आहेत

रस्ते सतत दुरुस्त करून सुंदर राखले आहेत काही ठिकाणी डोंगरावर जायला रेल्वेची सोय दिसली पायथ्यापासून माथ्यापर्यंत सरळरेषेत रेल्वे जाते. त्यामुळे अंतर वाचते. त्याना कॉग रेल्वे म्हणतात अनेक ठिकाणाहून केबल कारची व्यवस्था आहे केबल कार ने खूप उंचीवर जाऊन तेथे स्कीईंग किंवा हायकिंग करतात शिवाय येथे मांऊटेनिअरिंगकरता पण लोक येतात

उन्हाळ्यात ह्या देशाची लोकसंख्या तीन ते चारपट होते इथून ऑस्ट्रिया इटली, फ्रान्स व जर्मनीत जायला मोठ मोठे आंतरराष्ट्रीय रस्ते पर्वतातून बोगदे काढून किंवा दोन पर्वत पुलाने जोडून काढलेले आहेत पूर्वी पर्वतात काढलेल्या सेंट बर्नार्ड ह्या खिंडित म्हणे वाट चुकलेल्या लोकांच्या मदती करता शिकवलेले कुत्रे सोडत असत त्यांच्या गळ्यात एक टोपली अडकवलेली असे व त्यांत ब्रँडीची बाटली ठेवलेली असे. हरवलेला प्रवासी बर्फाने गारठला असेल तर त्याने ब्रँडी घेऊन त्या कुत्र्याच्या मागे जायचे केवढी ही कल्पकता ! त्यावेळी चांगले रस्ते व सोई नव्हत्या आता कुत्री सोडायची जरुरी नाही सर्व सुख सोयी व राजरस्ते लोकांच्या मदतीला तय्यार आहेत

'युनिटी थ्रू डायव्हर्सिटी' हे इथल्या लोकांच ब्रीद वाक्य आहे. हे लोक खूपच देशप्रेमी आहेत घरा इतकच देशाला महत्व देतात. डायव्हर्सिटी म्हणजे चारभाषीक लोक व त्यांच्यात युनिटी आहे.

इथे शभर टक्के साक्षरता आहे शिक्षणाची उत्तम सोय, पब्लिक स्कूलस् द्वारा आहे स्विस माणूस कुटुंबप्रिय आहे तो आपल्या घरात व माणसात रमतो हे लोक थोडे कॉन्झर्व्हेटिव्ह आहेत. आपल्या फॅमिलीचा ( खानदान ) अभिमान बाळगणारे, वाटायला शिष्ठ कोणाच्या भानगडींत पडायला त्यांना आवडत नाही. शांत व सरळ आयुष्य त्यांना आवडते त्यांची घरे ते स्वच्छ व सुंदर ठेवतात. घरचे काम बहुधा बायकाच करतात प्रत्येकाच्या घरापुढे बगीचा बरोबरच स्केटिंग करता एक छोटासा का होईना भाग ठेवलेला असतो आपल्या कडे आपण बॅटमिंटनकरता किंवा लॉन करता ठेवतो तसा, इतर खेळापेक्षा स्कीईंग, स्केटिंग, माऊंटेनिअरिंग, रोईंग ह्या खेळातच जास्त रमतात दोन वेळा इथे विंटर ऑलिंपिक्स झालेली आहेत

चीज हे ह्या लोकाचं मुख्य खाण उत्तरेकडील जर्मन भाषिक लोक सॉसेज हा गायीच्या मासाचा प्रकार व कोंबडीचे मास पिठात घोळवून भज्या प्रमाणे तळून खातात व बरोबर चीज फ्रेंच भाषीक

दुकानात मुबलक प्रमाणात दिसतात छोटासा देश असला तरी जे पदार्थ इथे होतात ते मोठ्या प्रमाणावर बनवले जातात

इथली घड्याळे तर सुप्रसिद्ध आहेतच. इथले लोक अतिशय कष्टाळू आहेत असं म्हणतात की सतराव्या शतकांत एक इंग्लिश माणूस इथे आला असता त्याचे घड्याळ बंद पडले सहज उत्सुकता म्हणून त्याच्या जवळच्या एका स्विस माणसाने ते बघायला मागितले व रिपेअर करुन दिले. व त्याचे डिझाईन लक्षात ठेऊन लगेच तसे बनवले व तेव्हा पासून त्याचा घड्याळे बनविण्याचा धंदा सुरु झाला व वाढता वाढता वाढे ह्या न्यायाने जगभर ही घड्याळे प्रसिद्ध झाली. प्रसिद्ध 'सिको' कंपनी इथलीच

ह्या बर्फाच्छादित पर्वत राजीमुळे जेवढे सौंदर्य ह्या देशाला प्राप्त झाले आहे तेवढीच भिती पण निर्माण झालेली आहे अनेकदा जोराच्या वाऱ्याने बर्फ वितळून मोठाले बर्फाचे खडे मोकळे होतात व खाली घसरत येऊन वाटेत येणारी घरे झाडे व शेतेच्या शेते गडप करतात त्याला 'अॅव्हालंच' म्हणतात पण अनेक वेळा हेच पर्वत देशाच संरक्षण पण करतात

ह्या बर्फाच्छादित पर्वतांवर स्केटिंग व स्कीइंग हे सर्वांत आवडते पण तेवढेच धोक्याचे खेळ इथले लोक सऱ्हास खेळतात प्रत्येक मुलाला लहानपणीच ह्या खेळाचे शिक्षण मिळते

इथल्या सृष्टी सौंदर्यामुळे अनेक चित्रपटाचे शूटिंग इथे होते, तसेच प्रवाशांची पण इथे सतत वर्दळ असते प्रवासी हे इथलं मोठं उत्पन्न आहे प्रवाशांकरता तशाच उत्तम सोई पण इथे आहेत

रस्ते सतत दुरुस्त करून सुंदर राखले आहेत काही ठिकाणी डोंगरावर जायला रेल्वेची सोय दिसली पायथ्यापासून माथ्यापर्यंत सरळरेषेत रेल्वे जाते त्यामुळे अंतर वाचते. त्याना कॉग रेल्वे म्हणतात अनेक ठिकाणाहून केबल कारची व्यवस्था आहे केबल कार ने खूप उंचीवर जाऊन तेथे स्कीइंग किंवा हायकिंग करतात शिवाय येथे माऊंटेनिअरिंगकरता पण लोक येतात

उन्हाळयात ह्या देशाची लोकसंख्या तीन ते चारपट होते इथून ऑस्ट्रिया इटली, फ्रान्स व जर्मनीत जायला मोठ मोठे आतरराष्ट्रीय रस्ते पर्वतातून बोगदे काढून किंवा दोन पर्वत पुलाने जोडून काढलेले आहेत पूर्वी पर्वतात काढलेल्या सेंट बर्नार्ड ह्या खिंडित म्हणे वाट चुकलेल्या लोकांच्या मदती करता शिकवलेले कुत्रे सोडत असत त्यांच्या गळयात एक टोपली अडकवलेली असे व त्यात ब्रॅंडीची बाटली ठेवलेली असे. हरवलेला प्रवासी बर्फाने गारठला असेल तर त्याने ब्रॅंडी घेऊन त्या कुत्र्याच्या मागे जायचे. केवढी ही कल्पकता ! त्यावेळी चागले रस्ते व सोई नव्हत्या आता कुत्री सोडायची जरुरी नाही सर्व सुख सोयी व राजरस्ते लोकांच्या मदतीला तय्यार आहेत

'युनिटी थ्रू डायव्हर्सिटी' हे इथल्या लोकाचं ब्रीद वाक्य आहे. हे लोक खूपच देशप्रेमी आहेत घरा इतकच देशाला महत्व देतात. डायव्हर्सिटी म्हणजे चारभाषीक लोक व त्यांच्यांत युनिटी आहे

इथे शभर टक्के साक्षरता आहे शिक्षणाची उत्तम सोय, पब्लिक स्कूलस् द्वारा आहे स्विस माणूस कुटुंबप्रिय आहे तो आपल्या घरात व माणसात रमतो. हे लोक थोडे कॉन्झर्व्हेटिव्ह आहेत. आपल्या फॅमिलीचा ( खानदान ) अभिमान बाळगणारे, वाटायला शिष्ठ कोणाच्या भानगडींत पडायला त्याना आवडत नाही. शात व सरळ आयुष्य त्याना आवडते त्यांची घरे ते स्वच्छ व सुदर ठेवतात घरचे काम बहुधा बायकाच करतात प्रत्येकाच्या घरापुढे बगीचा बरोबरच स्केटिंग करता एक छोटासा का होईना भाग ठेवलेला असतो आपल्या कडे आपण बॅटमिंटनकरता किंवा लॉन करता ठेवतो तसा, इतर खेळापेक्षा स्कीईंग, स्केटिंग, माऊटेनिअरिंग, रोईंग ह्या खेळातच जास्त रमतात दोन वेळा इथे विंटर ऑलिंपिक्स झालेली आहेत

चीज हे ह्या लोकाच मुख्य खाण उत्तरेकडील जर्मन भाषिक लोक सॉसेज हा गायीच्या मासाचा प्रकार व कोंबडीचे मास पिठात घोळवून भज्या प्रमाणे तळून खातात व बरोबर चीज फ्रेंच भाषीक

स्टेक हा मांसाचा प्रकार व ऑम्लेट जास्त पसत करतात इटालियन लोक त्याचा पास्टा व पिझ्झा हे मैद्याचे पदार्थ जास्त खातात

हे लोक खनय्ये आहेत खास खाण्याचे समारभ असतात ह्या समारभांत फडू म्हणून एक पदार्थ करतात एका मातीच्या भाड्यात दोन प्रकारचे चीज उकळतात. उकळत असताना त्यात लसूण, वाईन व चेरी-ब्रँडी घालतात (Kirsch) हे सर्व जेवणाच्या टेबलवरच स्पिरिटच्या दिव्यावर करतात कारण ते गरम असतानाच खायचे असते जेवणारे लोक काटे घेऊन तयार रहातात ब्रेडचा तुकडा काट्यांवर घेऊन तो ह्या फडू मध्ये बुडवून खातात. ब्रेडचा तुकडा फडूत न पाडता खाता आला पाहिजे. ज्याची ब्रेड फडूत पडेल त्याला पेनल्टी द्यावी लागते एखादी वाईनची बाटली किंवा सर्व बायकाना चुबन बायका जर सुदर असतील तर तरुण मुल ब्रेड मुद्दामच फडूत पाडत असतील, तेवढाच चान्स

बटाटा हे पण ह्या लोकाचे मुख्य अन्न आहे. रॅग्लेस नावाचे चीज टेबलावरील स्पिरिटच्या दिव्यावर धरून वितळवले जाते, वितळत असतानाच ते प्लेटवर धरतात त्यात मीठ मिरपूड व इतर मसाले घालून ते छोट्या उकडलेल्या बटाट्या बरोबर खातात हे चीज गरम असतानाच खायचे असते त्यामुळे एका वेळेस थोडे थोडेच घ्यावे लागते व सारख्या प्लेट्स बदलाव्या लागतात. आपण जसे एक एक पाणी पुरी पाणीपुरीवाल्याकडून घेऊन खातो तसेच ह्या प्रकाराला 'रॅक्लेट' म्हणतात ह्या शिवाय तळलेल्या कुरकुरीत बटाट्याची केक हे लोक खातात त्याला 'रोस्टी' म्हणतात तसेच बीफ चे पातळकाप उन्हात वाळवून ते पापड्याप्रमाणे तळून खातात

लहान लहान बोळातून निकी सफाईने बस काढत होता निकी मात्र गाडी छान चालवत होता. कधीही तक्रारीला त्याने वाव दिला नाही दोनच दिवसात त्याच्या बद्दल विश्वास निर्माण झाला तो फारच अबोल होता बहुधा त्याला इंग्लिश चागले बोलता येत नव्हते

बाजार जवळ आल्याने कॉमेंट्री थांबलेली होती आता आमच्या लक्षात आलें की अजूनही शेजारी नवराते बाई बसलेली होती व आज मागे बसला होता लो च्या वडिलांनी सुनावल असाव बहुधा कारण काल ते खुश्शाल दिसत होते चिनी लोक आपल्या सारखेच असतात ह्या बाबतीत

लुगर्न मधून रियूज नावाची नदी वाहते लोकवस्ती दोन लाख गाव लहान असलें तरी अनेक लायब्ररीज इथे आहेत गाण्याच्या जलश्याकरता हे गाव प्रसिद्ध आहे नदीवरील बंद पुलाच्या भिंतींवर ऐतिहासिक प्रसंग पेंट करुन ठेवलले आहेत

आम्हाला एका बोळात उतरवले येथे दोन्ही बाजूंना अनेक गिफ्ट शॉप्स होती त्यातल्या एकाची लिडाने शिफारस केली बहुधा प्रत्येक गाईडचे दुकान ठरलेले असावे व गाईडला कमिशन मिळत असावे

दुकानात हजारो प्रकारची घड्याळे होती. स्विस घड्याळे प्रसिद्धच आहेत दुकान म्हणजे म्यूझियमच वाटत होते किंमती पण तशाच आठवण म्हणून एक २० फ्रँक्सचे घड्याळ घेतले. किल्लीने स्प्रिंग गुंडाळायची व त्याला लावलेल्या दुसऱ्या स्प्रिंगला झटका द्यायचा ह्या स्प्रिंगच्या टोकाला एक स्विसमिस झोके घेत बसलेली आहे तिच्या वजनाने स्प्रिंग खाली वर होत रहाते पहिली स्प्रिंग उलगडत जाते व घड्याळ चालू रहाते सोपी रचना पण छान सुबक आहे. फ्रँक म्हणजे जवळ जवळ साडे चार रुपये.

बाथरूम शोधावी लागली इथे पण पैसे द्यावे लागले. दुकानाकडे परत निघालो तो पाऊस सुरू झाला दुसऱ्या दुकानात डोकवत डोकवत परत आलो निकी बस घेऊन आला. पावसामुळे आमची केबल कार राईड रद्द होते की काय अशी काळजी वाटू लागली

सर्व आले पण नवराते बाईचा पत्ता नव्हता. दोघे सर्व दुकानांत हिंडून आले पंधरा मिनिटे झाली लिंडा आता रडवेली

झाली होती. तरी बर आम्ही राईड आटोपून ४–५ तासानी इथे परत येणार होतो चार म्हतारी जोडपी इथेच थाबणार होती

लिडानी दुकानात सागून ठेवले व बहुधा पोलिसातपण देऊन ठेवले व ती केबलकार चालू आहे की नाही ह्या विषयी चौकशी करायला गेली आमच्या नशीबानी तेथे पाऊस नव्हता

त्या चार जोडप्याना एका चौकात सोडून आम्ही पुढे निघालो.

पूर्वी ह्या लोकात पण अनेक अन्धश्रद्धा होत्या ह्या पर्वतावर आगीचे फव्वारे सोडणारा भुजग रहातो व त्याच्या फुत्कारामुळे अव्हालच होते मोठ मोठे बर्फाचे खडक खाली कोसळतात असा समज होता त्यामुळे ह्या पर्वताच्या जवळही कोणी फिरकायचे नाही पण नतर एका श्रीमन्त माणसाने पर्वत चढणाऱ्याकरता मोठे बक्षिस लावले, तेव्हा अनेकानी पर्वत चढण्याचा प्रयत्न केला छोटी छोटी पोरे पण घरात 'द असेंड ऑफ माऊटब्लेक' नावाचा खेळ खेळू लागली मायकेल पॅकार्ड व जॅक्वेस बालमट ह्या दोघानी माऊटब्लेक हे सर्वात उच शिखर पादाक्रांत केले. तेव्हा पासून शिखरे चढून जाणे, दऱ्यांमधून स्कीईंग करणे, पठारावर स्केटिंग करणे ह्याचा ह्या लोकाना छदच लागला

इथले सौंदर्य पण त्याना आकर्षू लागले आता तर मुद्दाम मशीनने कापून सपाट मैदान व रस्ते बनवले जातात थडीत मोठ्या प्रमाणावर स्पर्धा होतात ह्या पर्वतामधून आतरदेशीय रस्ते काढलेले आहेत रस्त्याच्या बाजूचे डोंगर भैवक्रम लोखडी जाळीने आच्छादले आहेत म्हणजे एखादा खडक किंबा कडा कोसळला तरी एकदम रस्त्यावर येत नाही आम्ही आता एंगलबर्गला आलो इथून एगलमाऊटन मधील तितलीस ह्या हिमनदी पर्यंत आम्हाला जायचे होते आमची तिकिटे आधीच काढलेली होती आम्ही एका छोट्याशा इमारतीशी आलो तेथे लिडानी आम्हाला एक एक प्लास्टिकचे पातळ कार्ड दिले दीड इंच रुद व २" लाब दाडयाच्या चक्री दारावर एक फट होती त्या फटीत हे कार्ड सरकवून परत

काढायचे व मग दाडा सरकवायचा ते कार्ड म्हणजे मॅग्नेटिक दार उघडण्याची किल्लीच जणू कार्ड घातल्याशिवाय दार उघडणारच नाही आत एक ८० लोक मावतील एवढी मोठी केबलकार होती चारी बाजूनी काचेच्या खिडक्या होत्या तिला दोन बाक पण आत होते जरुर वाटली तर बसायला सर्व जण खिडकीशी जागा मिळवण्याच्या खटपटीत, आमची उंची बघून त्याना दया येई व ते आम्हाला पुढची जागा देत हो नाहीतर आम्हाला फक्त त्यांची पाठच बघायला मिळाली असती इतकी गर्दी असली तरी भांडण, मारामारी, धक्का बुक्की, शिव्यागाळी कोठेही होत नव्हती इथे एक गिफ्ट शॉप व कॅफिटेरिया होता, ह्या दोन गोष्टी इथे आवश्यकच असतात लोकाना खूष करायला व त्यांचा पैसा लुबाडायला अगदी दहा हजार फुटावर पण

ह्या केबलकारनी आम्ही ३३०० फुटावरील एंगलबर्ग इथे गेलो. इथे आम्हाला दुसरा केबलकार घ्यायची होती इथली इमारत पूर्ण बर्फाच्छादित होती आत हीटिंग होते म्हणून थंडी जाणवत नव्हती इथे एक व्ह्यू पॉईंट होता इथून खालची हिरवळ, निळीशार तळी व बाजूचा पांढराशुभ्र बर्फ अवर्णनीय दिसत होते दर दहा मिनिटांनी एक केबलकार यायची व एक जायची त्यामुळे खूपच गर्दी होती. एका वेळी हजारतरी लोक इथे असतील कॅफेटेरिया व गिफ्ट शॉप्समधे लोक दाटीवाटीने उभे होते

इथून दुसऱ्या केबलकारनी आम्ही निघालो ही चाळीस लोकांची होती आता आम्ही ४२०० फुटावरच्या 'गरशिनाल्पस' ह्या ठिकाणी निघालो होतो स्वच्छ उन पडल होत बर्फावर सूर्य किरण पडून ते परावर्तीत होत होते, त्यामुळे त्या थंडगार पांढऱ्या शुभ्र बर्फाला पण तज प्राप्त झाले होते बर्फ असा काही झळाळी आल्यासारखा चमकत होता की डोळे दिपत होते. खाली खोल दरींत हिरवी कुरण मधून मधून दिसत होती, इथल भयाण सौंदर्य बघताना मन हरपून जात होत मधूनच केबलकार तुटली तर ! असा विचार मनाला सतवत होता पण म्हणून डोळे मिटून काही

हस वस वाटत नव्हत हृया केबलकार्सना धरून ठेवणारे अवाढव्य लोखंडी खांब त्या वायर्स हे सर्व इथे कस उभारल असेल ह्याचा अचंबा वाटत होता लिंडा सांगत होती की इथे अजून पर्यंत एकही अपघात झालेला नाहीये, सतत ह्या बर्फाची, खांबांची तपासणी होत असते अनेक जण डोळे मिटून बाकावर बसले होते

गरजिनाल्प्स पर्वतावरुन पुढे ट्रुब्सी ह्या सहा हजार फुटा-वरील स्टेशनवर आम्ही निघालो आता आमची केबलकार चार डब्याची आगगाडीसारखी होती एकेका डब्यात ८–१० लोक मावत होते जस जस उंच जात होतो तस तशी स्टेशन्स आकाराने लहान होत जात होती ट्रुब्सीहून पुढे आठ हजार फुटावरच्या स्टँड ह्या स्टेशनवर व तिथून १० हजार फुटाच्या तितलीसवर आम्ही येऊन पोहोचलो इथेच कॅफेटेरियात आम्हाला लंच घ्यायचे होते इथे पण मला मोठा क्यू व वेळ थोडा, टेबल खुर्च्या भरलेल्या, खाऊन झाल्यावर डिशेस टेबलवरच पडलेल्या होत्या रिकाम्या खुर्च्या मिळाल्या पण टेबल रिकामे करुन घ्यावे लागले हे दोघे क्यू मधे उभे राहिले बरोबर सर्व असल तरी गरम चहा तरी मिळतो का ते बघायच होत ह्यानी स्पघेटी घेतली व आम्ही आमची शिदोरी सोडली इतर लोक ट्रे भरभरुन आणून खात होते

खाणे आटोपून आम्ही बाहेरच्या उघडया गच्चीवर आलो इथे बर्फ गोळा करुन त्याचा बॉल करून लोक एकमेकांच्या अंगावर फेकण्याचा खेळ खेळत होते. आम्ही पण बर्फाचे बॉल करुन खेळलो लहान मुलांसारखे बालपण आल्यासारखे वाटले पण थोड्यावेळातच हात गारठायला लागले. तसे आंत आलो

सतत उन्ह व आभाळ असा खेळ चालला होता. जणू सूर्य लपाछपी खेळत होता आभाळा नंतर एकदम उन्ह आल्यावर बर्फाच्या तेजानी डोळे दिपत होते असंख्य हिरे चमकल्याचा भास होत होता सूर्याकडे बघतोय अस वाटत होत. डोळ्याच पारण फिटल अस का म्हणतात ते इथे आल्यावर कळल.

दोन वाजता लिंडा घाई करायला लागली तेंव्हा निघावच लागल लिंडा अगदी घड्याळाच्या ठोक्यावर चालली होती त्यामुळे कोठेही गडबड गोंधळ झाला नाही खाली उतरताना चढलो तसेच टप्प्या टप्प्याने केवळ कार बदलत खाली आलो कारने खाली येताना मात्र आकाशपाळण्यात बसल्या सारख वाटत होत खाली उतरताना ट्रुब्सी ह्या स्टेशन जवळ एक सुंदर तळ दिसल

वाटेत बर्फात रस्ते तयार करण्याच काम एक मशीन चालक करत होता ह्या गोष्टी आपण फक्त सिनेमात व टी व्ही वर बघतो सहा हजार फुटावर येऊन स्कीईंग करणाऱ्याच्या उत्साहाची तारीफ वाटते हे बर्फाचे डोंगर म्हणजे तरुण मुलामध्ये धाडस निर्माण करणारे, निसर्गाचे सौंदर्य उलगडून दाखवणारे व त्याना अनेक गोष्टी शिकवणारे गुरुच आहेत अस हे लोक मानतात. हे डोंगर त्याना आव्हान देतात त्याना टणक व धीट बनवतात.

इथल्या ग्लेशिअर्स मधून मोठ मोठ्या खिंडी व बोगदे खणलेले आहेत इथले इंजिनिअर्स सतत प्रवाशांकरता सोईचे व सुलभ नवीन नवीन मार्ग शोधत असतात, व तयार करत असतात शिवाय आहेत ते सतत चांगले राखले जातात. लाखो रुपये ह्यावर खर्च केले जातात सिम्प्लॉन नावाचा बोगदा १२ मैल लांब आहे. त्यातून रेल्वे पण जाते इथून पुढे इटली व फ्रान्स मधे ३ ते ४ हजार फुटावरुन जाणारे मोट-वेज आहेत माऊंटब्लँक ह्या सर्वात उंच शिखरातून एक बोगदा ऑस्ट्रियात जातो

पण आम्ही बोगद्यातून न जाता सपाटीवरुन जाणार होतो कारण सरळ ऑस्ट्रियात न जाता आम्हाला वाटेत लिचस्टेंस्टाईन ह्या छोट्याशा राष्ट्रातून जायचे होते

मजल दर मजल करत आम्ही लुझर्नला परत आलो इथे पाऊस पडतच होता इतक्या वेळ सर्व गोष्टीचा विसर पडला होता इथे आल्याबरोबर श्रीमती नवरातेंची आठवण झाली सापडली असेल का ती ? काय झाल असेल म्हणून काळजी व उत्सुकता वाटू लागली तेवढ्यात चार वृद्धा सोबत चौकातील बाकावर नवराते

दिसली, लिंडाचा जीव भाड्यात पडला असणार, लिंडाचा चेहरा एकदम फुललेला दिसला

बस थाबताच ते सर्व बसशी आले पण परत एक जोडप त्यांत नव्हत परत त्याच्या करता थाबण भाग होत. नवरातेवर सर्वांनी प्रश्नाचा भडीमार केला पण ती कसली, धड उत्तर देईना. नुसती हसतच सुटली झाल्या प्रकारचे कसलेच सोयर–सुतक तिला वाटत नव्हते तेव्हढ्यात ते दोघे पण छत्रीतून येताना दिसले ट्रीपच्या इस्ट्रक्शन्स मधे छत्री घेण्याविषयी लिहिलेले होते त्याप्रमाणे त्यानी छत्री जवळ बाळगली होती त्याचा त्याना फायदा झाला. लुझर्न बरोबरच स्वित्झर्लंडला ही टाटा करत आम्ही निघालो

वाटेत लिचस्टेंस्टाईन मधून जाऊन ऑस्ट्रियातील इन्सब्रुक इथ आम्हाला मुक्काम करायचा होता हे २३० मैलाच अतर कापायचे होते

बस बरोबरच लिंडाच्या कॉमेंट्रीने वेग घेतला ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात ज्यूलियस सीझरने स्वित्झर्लंड काबीज केले चारशे वर्षे रोमन साम्राज्य येथे होते मूळचे लोक सेल्टिक, अलमनी व जर्मानिक

पुढे अनेक राजे आले व गेले १०३२ नतर ऑस्ट्रियाच्या ताब्यात हे राष्ट्र गेले ऑस्ट्रियन गव्हर्नरनी अनेक जुलुम केले बाजारात आपली हॅट ठेऊन तिला येता जाता सलाम करायचा हुकुम सोडला विल्यम टेलने सलाम करायला नकार दिला तेव्हा शिक्षा म्हणून त्याना बोन बाणात आपल्या मुलाच्या डोक्यावरचे सफरचद उडवायला सागितले

विल्यमटेल चागला निशाणेबाज होता त्याने एकाच बाणांत मुलाला इजा न होता सफरचंद उडवले व गव्हर्नरला म्हणाला ह्या बाणाने माझ्या मुलाचा बळी घेतला असता तर दुसऱ्या बाणाने मी तुझा बळी घेतला असता. ह्या त्याच्या शिरजोरीने त्याच्या हातात हातकड्या पडल्या ह्या प्रकाराने जनता खूप चिडली त्याना

विल्यमटेलच खूपच कौतुक वाटल विल्यमटेलनी तुरुगांतून पण सुटका करुन घेतली व त्या गव्हर्नरला यमसदनाला पाठवले त्यामुळे विल्यमटेल त्याचा हीरो बनला त्यांच्या नेतृत्वाखाली स्विसलोक एक झाले व त्यानी ऑस्ट्रियाचा पराभव केला रोमन साम्राज्याशी सगनमत केले, व त्यांना स्वातंत्र्य मिळाले ज्या दिवशी स्वातंत्र्य लढ्याकरता सर्व एक झाले तो दिवस १ ऑगस्ट १२९१ म्हणून १ ऑगस्टलाच स्वातंत्र्यदिन साजरा करतात

स्विस लोकाचे शौर्य बघून रोमन थक्क झाले म्हणूनच वॅटिकन ह्या पोपच्या राज्याचे सरक्षण स्विस सैनिकच करतात

इ स. १५१५ मधे फ्रान्सने हल्ला करून अनेक स्विस सैनिक मारले तेव्हा पासून ह्या राष्ट्राने तटस्थ रहाण्याचे धोरण स्वीकारले पुढे इतर युरोपियन देशाप्रमाणेच इथेही धर्मयुद्ध झाले पण ह्या लोकानी एकत्र येऊन प्रत्येक चर्चला त्याला हवा तो पथ स्वीकारण्याची मुभा दिली हे लोक अतिशय शांतता प्रिय व समजुतदार आहेत त्याच्या समजुतदार पणा वर एक विनोद सांगितला जातो

दोन पक्षात युद्ध चालू असताना जर जेवायच्या वेळी एकाकडे पोळ्या भरपूर पण भाजी कमी व दुसऱ्या कडे त्या उलट असेल तर हे लोक तात्पुरता समझोता करून सर्व एकत्र करून जेवतील, असे हे लोक

ह्यांची राज्यपद्धती अगदीच वेगळी आहे प्रेसिडेंटला फारस महत्व नसत एखाद्या मोठ्या कपनीच्या कारभारा प्रमाणे कारभार चालतो सात लोकाचे बोर्ड असते जनतेचे राष्ट्राशी सबंध कंपनीच्या शेअर होल्डर्स प्रमाणे असतात ह्या सात मेंबर्स पैकीच एक प्रेसिडेंट होतो. दरवर्षी प्रेसिडेंट बदलतो

ह्या खालोखाल पार्लमेंट असते. त्यात दोन गट. एक फेडरल असेंब्लि–लोकसभा व दुसरी नॅशनल कौंसील राज्यसभा, शिवाय एक समातर जनता सरकार पण असते त्याला कम्यून म्हणतात.

सरकारनी एखादा ठराव पास केला व तो जनतेला अयोग्य वाटला तर ९० दिवसाच्या आत तीस हजार लोकाच्या सहयाचे पत्रक जनतेला सादर करावे लागते व नतर पन्नास हजारांवर लोकांनी त्याला विरोध केला तर तो ठराव रत्तबातल होतो

प्रत्येक रहिवाशी जनता सरकारचा मेंबर असतोच राजकारणांत स्त्रियांना मात्र भाग घेता येत नाही आत्ता आत्ता इ सन १९७१ मधे स्त्रियाना मतदानाचा अधिकार मिळाला आहे त्यामानानी आपण भारतीय स्त्रिया खरोखर नशीबवान

कॉमेंट्री ऐकता ऐकता लिचटेंस्टाईनच्या सीमेवर कधी येऊन पोहोचलो ते समजलेच नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६२२०
१९२१८
मुंबई शाखा

# लिचटेंस्टाईन

ऱ्हाईन नदीच्या एका किनाऱ्यावर स्वित्झर्लंड तर दुसऱ्यावर लिचटेंस्टाईन हे पिटुकले स्वतंत्र संस्थान ह्याला प्रिन्सिपालिटी म्हणतात. क्षेत्रफळ १५८ चौ किलोमिटर व लोकसंख्या फक्त २८ हजार मुख्य भाषा जर्मन

ह्या राष्ट्राला पण स्वित्झर्लंड सारखेच निसर्गसौंदर्य लाभलेले आहे ऱ्हाईन, सीमॉन व लॅवना ह्या मोठ्या तीन नद्या ह्या चिमुकल्या राष्ट्रात आहेत ह्या नद्यांच्या खोऱ्यातील जमीन अतिशय सुपिक आहे

ह्या राष्ट्राची राजधानी वाडूझ ही ऱ्हाईनच्या किनाऱ्यावर आहे लोकवस्ती कमी असली तरी एका ठिकाणी एकवटलेली नाही सगळीकडे तुरळक पसरलेली आहे रस्त्याने जातांना थोड्या थोड्या अंतरावर एखाद तरी घर दिसतच शेतामधून, डोंगराच्या खोबणीतून, शिखरावर, झाडाच्या आडून घरे दिसतात.. झाडीमुळे रस्ते दिसत नाहीत तेव्हा इतक्या उंचावर किंवा जंगलात लोक कसे राहातात असा प्रश्न पडतो

गांव आल्यावर मात्र सुबकपणे घरे दिसतात घरे छोटीशी, सुबक व नेटकी. स्वित्झर्लंडमधील घरापेक्षा निराळी वाटली. ह्या घराना बाल्कनीज होत्या व बाल्कनीत कुंड्या ठेवलेल्या होत्या प्रत्येक घरासमोर बगीचा. फुलांचे ताटवे छोटे छोटेच. पण स्वच्छ रस्ते जुन्या पद्धतींची छोटी हॉटेल्स, बाहेर अंगणात खुर्च्या टेबल्स मांडलेली, लोक गप्पा मारत खात बसले होते. एखाद्या चित्रपटाच्या शूटिंग करता तयार केलेला सेटच वाटत होता

बॉटनिस्ट्ना हा भाग म्हणजे स्वर्गच. इथल्या इतकी तऱ्हे-तऱ्हेची झाडे जगात कोठेही आढळत नाहीत सप्टेंबरमधे जेन्टिल ह्या पर्दे निळ्या रंगाच्या फुलांनी सर्व डोंगर व्यापतात. आत्ता सगळीकडे गुलाब फुललेले दिसत होते.

ख्रिस्त पूर्व १५ मधे हा रोमन साम्राज्याचा एक भाग होता इ. सन् १६९९ मधे जॉन ॲडॅम व्हॉन लिचटेंस्टाईन ह्या ऑस्ट्रियन राजाने ह्या भागाची सरदारकी विकत घेतली (बॅरनी) तरी इ. सन् १८०६ पर्यंत हे रोमन वर्चस्वाखाली होते इ. सन् १८१५ मधे त्याला स्वतंत्र म्हणून घोषित करण्यात आले

इ सन १९३८ पासून फ्रान्स जोसेफ--२ हा राजा राज्य करत आहे. राजा राणी व त्याची पाच मुले जनतेची लाडकी आहेत. कारण ती सर्व जनतेत मिळून मिसळून रहातात राजवाड्यातील पार्टीला झाडून सर्वांना आमंत्रण असते इथे उच्च नीच हा भेद नाही.

इथले लोक खूप अगत्यशील आहेत ह्याचे मुख्य उत्पादन शेती व कारखाने लोक कष्टाळू, जुन्या गोष्टींमधे रमणारे, रुढींची जपणूक करणारे, रोमन कॅथॉलिक आहेत दूध दुभत्याचा धंदा जोरात चालतो द्राक्षा पासून येथे वाडूझर नांवाची वाईन बनवली जाते.

आम्ही आता वाडूझ जवळ आलो होतो एका शिखरावर एक सुंदर रंगीबेरंगी किल्लेवजा राजवाडा दिसला हाच राजाचा राजवाडा त्याच्या भिंती व छत रंगीत टाईल्सचे होते. व्ह्यूमास्टर मधून एखादा परिकथेतील राजवाडा बघावा तसाच वाटत होता. शहरातून जाताना पार्लमेंटची बिल्डिंग दिसली ती पण रंगीबेरंगी लाल निळ्या रंगाचे छप्पर, भिंतीवर रंगीत पेंटिंग्ज सगळीकडे रंगांची नुसती उधळण होती. बर्फाच्या पांढऱ्या शुभ्र पार्श्वभूमिवर ही रंगीबेरंगी घरे म्हणजे जणू इंद्रधनुष्येच.

राजघराणे असले तरी राज्यपद्धती लोकसत्ताक आहे. पंधरा लोकांचे पार्लमेंट असते दर चार वर्षांनी निवडणुका होतात.

त्यातलाच एक पतप्रधान म्हणून निवडला जातो

१६ ऑगस्टला राजाचा वाढदिवस स्वातन्त्र्योत्सवा सारखाच साजरा होतो त्यादिवशी सर्वांना सुट्टी असते गावातून सध्याकाळी मिरवणूक निघते मशालींच्या उजेडात ती राजवाड्यावर जाते तेथे मोठ्या प्रमाणांत आतशबाजी होते हीच राजाला शुभेच्छा.

इथली रगीबेरगी सुदर तिकिटे हे ह्या देशाचे मिळकतीचे साधन आहे. जगातील तिकिटे जमवणारे लोक इथल्या तिकिटांवरच बक्षिसे पटकावतात वाडूझ मध्ये तिकिटाचे म्यूझियम आहे ह्या खालोखाल टूरीझम हे पण इथले मिळकतीचे साधन

ह्या राज्याच स्वातंत्र सैन्य नाही स्विस सैनिकच त्यांचे रक्षण करतात तसेच परदेशचे राजकारण पण स्वित्झर्लंडच बघते ह्या दोन्ही बाबतीत त्याच्यात तसा करारच आहे

ऑस्ट्रियाची सीमा जवळ आली तशी जंगल वाढायला लागले. नाक्यावरच रेस्टपोस्ट वर बस थांबली

# ऑस्ट्रिया

रेस्टपोस्टवर गरम गरम दाट दूध प्यायला मिळाले. ह्या १२ दिवसात बारावर्षांत प्यायलो नसू इतके दूध प्यायलो आता आम्ही ऑस्ट्रियातून चाललो होतो

इथेही आल्पसच्या रांगा आहेत इथला निसर्ग स्वित्झर्लंड सारखाच, फक्त हिरवे पणात जरा उजवा म्हणावा लागेल

ऑस्ट्रिया हे हिटलरचे जन्मस्थान पण त्याची कर्मभूमी जर्मनीच पण जेंव्हा जेव्हा त्याला शक्य झाले, तेंव्हा तेंव्हा त्याने प्रथम ऑस्ट्रिया ताब्यात घेतले ह्याच्या पूर्वेला सर्व कम्युनिस्ट देश आहेत झेकोस्लोव्हाकीया, हंगेरी व युगोस्लाव्हिया उत्तर पश्चिमेला पश्चिमजर्मनी, पश्चिमेला स्वित्झर्लंड, व लिचटेस्टाईन व दक्षिणेला इटली, अशा सात राष्ट्रांनी वेढलेला हा देश म्हणून युरोपच्या राजकारणात महत्वाचे स्थान राखून आहे. ह्या सर्व भाषा बोलणारे लोक इथे आहेत तरी जर्मन ही मुख्य भाषा ९५ % लोक जर्मन बोलतात ९० % लोक रोमन कॅथॉलिक आहेत.

पूर्वी इथे राजघराणे असले तरी आता फेडरल रिपब्लिक सरकार आहे. इथे प्रेसिडेंटला चॅन्सलर म्हणतात

क्षेत्रफळ ८४ हजार चौ किलोमिटर आहे म्हणजे जवळ जवळ महाराष्ट्रा एवढे पण लोकसंख्या मात्र फक्त ७५ हजार म्हणजे नागपूर पेक्षा कितीतरी कमी.

व्हिएन्ना ही राजधानी पूर्वसीमेवर आहे आम्हाला आज इन्सब्रुक इथे मुक्काम करायचा होता.

ऑस्ट्रियाच्या पश्चिमेला तीनचतुर्थांश भाग आल्प्सने व्यापलेला पूर्वेकडे हळू हळू सपाट होत गेलेला डॅन्यूब ही जगप्रसिद्ध मोठी नदी इथे आहे.

इन्सब्रुक हे इन नदीवरचे शहर. ह्याचा अर्थच 'ब्रिज ऑन रिव्हर इन' हे आल्प्सच्या कुशींत आहे

आम्ही आता समुद्रसपाटी पासून तीन हजार फुटावरून चाललो होतो आल्प्सच सर्वांत उंच शिखर माऊटब्लेक इथेच आहे

रोमन लोकानी ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात डॅन्यूबच्या कांठा काठाने वस्ती करायला सुरवात केली असावी ८ व्या शतकात फ्रॅंकिश राजाने हा भाग आपल्या राज्याला जोडून ह्याला पूर्व सरहद्द म्हणून ओस्टमार्क असे नाव दिले पुढे एका रोमन सम्राटाने हा भाग जिंकून त्याला 'ओस्टारिची, पूर्वेकडील राज्य असे नाव देऊन संस्थान म्हणून मान्यता मिळवली अजूनही जर्मन भाषेत ह्या राष्ट्राला ओस्टारिचीच म्हणतात ह्याचे पुढे 'ऑस्ट्रिया' झाले.

ह्या पुढील अनेक राजानी इथे सुदर सुदर राजवाडे बांधले रस्ते व पूल बांधून राज्याची भरभराट केली अनेक रोमन काळातील रस्ते व पूल भग्नावस्थेंत अजूनही आहेत तर कांही अजूनही वापरांत आहेत

१३ व्या शतकात राज्याला वारस उरला नसल्याने जर्मन सेनापती रुडोल्फ हाप्सबर्ग ह्याने ऑस्ट्रिया जिंकलें ह्याच्या वशजानी सात शतके राज्य केले स्वातंत्र्या नतरही राजघराण चालूच आहे इथेही राजसत्ताक लोकशाही आहे

ह्याच काळांत कला, संगीत व स्थापत्य शास्त्रात ऑस्ट्रिया खूपच पुढारलें होते ह्या राजानी आसपासच्या देशाशी रोटी-बेटी व्यवहार वाढवले व युद्धे टाळली सर्वांशी सलोख्याचे संबध ठेवून स्वातंत्र्य टिकवले पाचव्या चार्ल्सने म्हटलेच आहे, 'इथे सूर्य कधीच मावळत नाही व पुढेही मावळणार नाही युद्ध करुन देश जिंकण्या पेक्षा प्रेमाने देश जिंका,

पण पुढे सतराव्या शतकात जर्मनानी व तुर्कांनी हल्ले करून त्याना सळोकापळो करून सोडले शंभर वर्षे ह्या राष्ट्राने अतोनात हाल भोगले जर्मनाना गुलामा सारखे वागवले पण पुढे एका पोलिश राजाने मदतीला येऊन जर्मन व तूर्कांची पीछेहाट केली.

सहाव्या चार्लसची मुलगी मारिया थेरेसा ही अतिशय बुद्धीमान व असामान्य राणी जनतेची खूप आवडती होती अजूनही लोक तिची आठवण काढतात रोटी बेटी व्यवहार मात्र तिच्या अगलट आला तिची एक मुलगी नेपोलियनाला दिलेली होती पण तरीही नेपोलियने ऑस्ट्रियावर हल्ला केला लोक युद्धाला कटाळले ऑस्ट्रियाचा राजा फ्रान्स जोसेफ ह्याने युरोपातील सर्व राजांना व्हिएन्ना इथे पाचारण केले व युरोपात एकता निर्माण करण्या करता बोलणी सुरु केली. पण त्याच वेळी सगळीकडे लोकशाहीची लाट आली व राजालाच पदच्युत व्हावे लागले त्यातूनच पहिले महायुद्ध सुरु झाले ऑस्ट्रिया जर्मनीच्या बाजूने होते त्याचा पराभव झाला

पुढे सर्वच राज्ये स्वतंत्र झाली तेव्हाच ऑस्ट्रिया पण स्वतंत्र रिपब्लिक झाले

पण पुढे हिटलर व मुसोलिनी ह्याच्या महत्वाकांक्षी चळवळीचे हादरे ह्या चिमुकल्या राष्ट्राला बसू लागले इ सन १९३७ मधे हिटलरने ऑस्ट्रिया ताब्यात घेतला व दुसरे महायुद्ध सुरु झाले हिटलरचा पराभव झाला इ सन् १९४५ मधे परत त्याचे स्वातंत्र्य जाहिर करण्यात आले तसेच तटस्थ राष्ट्र म्हणून पण मान्यता मिळाली

इन्स ब्रुक जवळ येत होते थोड्या थोड्या अंतरावर १५-२० घराचे छोटे गाव लागे तुरळक पण सतत वस्ती होती डोंगर शिखरे व उतारावर पण घरे होती. प्रत्येक गांवात एक चर्च दिसेच इथली घरे व इमारती वेगळ्याच प्रकारच्या आहेत घुमटाकार छप्पर, घुमटावर छोटा घुमट व त्यावर शिखर प्रत्येक घराला एक

बाजूला घुमट असतोच मशीद व देऊळ ह्यांचा समन्वय साधल्या सारखे वाटलं.

शिक्षणाच्या बाबतीत हा देश खूपच पुढारलेला आहे मरिया थेरेसानीच शिक्षण आवश्यक केले होते आता शंभर टक्के साक्षरता आहे

आता आभाळ भरुन आले होते धुके पण पसरले होते त्यामुळे १५ फुटा पुढचं काही दिसेना केव्हाही पाऊस पडेल असे वाटत होते इन नदीवर दोन डोंगराना जोडणारा ट्रिझाम्ना हा १० मैल लांबीचा पूल इथे आहे आज धुक्यामुळे दिसला नाही तसेच स्की जंप स्पॉट पण दिसू शकला नाही.

आम्ही हॉटेल बॉन अल्पिनाच्या आवारात आलो व पाऊस सुरू झाला आम्हाला ४ थ्या मजल्यावरची खोली मिळाली खिडकीतुन आल्प्स दिसतो पण आज धुक्यामुळे काही दिसत नव्हत

ताजेतवाने होऊन आठ वाजता आम्ही जेवायला खाली आलो आज अंडी चालतील म्हणून मागितल्याने जेवणांत सूप नतर ऑम्लेट मिळाले

त्या आधी केकच्या स्लाईडस् सारखी गुलाबी पांढरी व लाल रंगाची स्लाईस असलेली डिश समोर आली ऑस्ट्रियाची केक सुप्रसिद्ध आहे असे लिडाने सांगितले होते पण स्वीट डिश आधीच कसे देतील ? अशोकना मोह टाळता आला नाही, त्यानी तुकडा तोंडात टाकला व कारलं खाल्यासारखं तोंड करुन थुकून टाकलं

शेजारच्या ब्रिटिश जोडप्याने आवडीने खाल्लेले दिसले आमच्याही डिशा त्यांच्या पुढे सरकवल्यावर तर ते खूषच झाले ते म्हणे ब्रेड हॅम कटलेट होते हॅम म्हणजे डुकराचे मास

आमच्या बरोबरीचे मलेशियन हॅम किंवा मीट खात नव्हते त्याना मासे लागतात त्यामुळे त्याची पण पंचाईत व्हायची मिसेस सारंगन् व तिचा मुलगा सुंदर तर काहींच खात नसत ब्रेड बिस्किट दूध हे बाहेर विकत घेतलेलेच खात

शेवटी स्वीट डिश म्हणून खरोखरच लेमन केक आली ती मात्र छान होती सगळी कडे तीन कोर्सच जेवण मिळत होते

दिवसभर परिकथेतल्या सारखे राजवाडे बघून व युद्धाची वर्णन ऐकून रात्री मजेदार स्वप्न पडली 'ॲलिस इन वंडरलँड' सारखे वाटत होते.

निसर्गाच्या सौंदर्याबाबत तर सतत चढती कमानच होती क्लायमॅक्स कोठे होतो ते बघायचे होते

आज ९ मे

ब्रेकफास्ट आटोपून साडे मानला असशी जमलो आज लख्ख उन पडले होते बसने वेग घेतला काल धुक्यामुळे न दिसलेला स्की जप पॉईंट आज स्पष्ट व छान दिसत होता

एका डोंगर माथ्यावर चबुतरा तयार करून वर एक स्प्रिंगची फळी लावलली आहे. बर्फ जमा झाला की ह्या फळीवरुन दीडशे-फुट खाली बर्फावर उडी घेऊन स्कीईंग करायचे हे धाडसी लोकांचेच काम इथे ह्याच्या स्पर्धा होतात ह्या लोकांना स्कीईंग ची भारीच आवड स्कीईंगचे बाळकडूच त्याना असते वयाच्या तिसऱ्या वर्षापासून स्कोईंग शिकायला सुरवात करतात एका लांकडी पट्टीत पाय अडकवून बर्फावरुन हातातल्या अणकुचीदार काठ्याच्या सहाय्याने घसरत जाणे म्हणजे स्कीईंग. वेग थाववायला किंवा मार्ग बदलायला ह्या काठ्याचा उपयोग होतो स्कीईंग डोंगर, दऱ्यांत, चढ उतारावर करतात तर स्केटिंग सपाट भागातच करता येते ह्यात चाकाचे बूट पायांत घालतात किंवा चाके लावलेली फळी वापरतात

जसे हाडाच्या सैनिकाला लढताना आलेले मरण आवडते तसे इथल्या लोकांना पायात स्कीईंगची पट्टी असताना आलेले मरण आवडते अथरेस सूफा हा इथला प्रसिद्ध स्कीअर.

आर्थिक दृष्टया देश खूपच पुढारला असला तरी जुन्या रुढी कायम आहेत जुन्या पद्धतीचे ड्रेस करुन फोकडान्स करणे हा आवडता छंद आहे

इन नदीवर इटलीला जोडणारा 'युरोपाब्रिज' हा सर्वात मोठा व भव्य पूल सहाहजार फूट उंचीवर आहे आम्ही लांबूनच बघितला आम्हाला ब्रनर खिंडीतून इटली गाठायचे होते

इन्सब्रुक प्रमाणेच साल्सबर्ग हे प्रसिद्ध शहर. हे संगीताचे माहेर घर आहे मोझार्ट ह्या संगीत तज्ञाचे जन्मस्थान प्रसिद्ध साऊंड ऑफ म्युझिकचे बरेचसे चित्रण साल्सबर्ग मध्ये झाले आहे

आमचा पूर्ण रस्ता डोंगरातूनच होता तीन चार हजार फुटा-वरून आम्ही जात होतो खालचे रस्ते सुंदर दिसत होते तेवढ्यात लांब अगदी खालच्या पातळीवर यूरेल जाताना दिसली एखादी खेळण्यातील आगगाडी असावी असे वाटत होते हिने पूर्ण युरोपभर प्रवास करता येतो

इथे घराच्या भिंतींवर सुंदर पेंटिंग्ज काढलेली दिसली त्यांना 'क्रफीतो' म्हणतात ह्याना खूप खर्च येतो त्यामुळे श्रीमंत लोकांनाच ते परवडते

अधून मधून सतत राखीव जंगले लागत होती ह्या जंगलामुळे अॅव्हलंच पासून गावाचे रक्षण होते

स्विस लोकांच्या मानानी हे लोक सुस्थ आहेत कोणतीही गोष्ट आरामांत करायला त्यांना आवडते लग्न झाल्यावर वधू-वर घरी येतात व घरातल्या जुन्या कपबशा खिडकीतून फेकतात ही पद्धत अजूनही चालू आहे नवी विट्टी नवे राज्य ह्या धरतीवर

आता आम्ही बोगद्यातून चालला होतो लिंडाची कॉमेंट्री बंद झाली बोगदा बराच रुंद होता दोन बसेस जातील एवढा मधोमध टी. व्ही कॅमेरे लावलेले होते अंतरा अंतरावर फोनची सोय होती वेळ प्रसंगी थांबावे लागल्यास कडेला जागा होती बोगदा खूपच मोठा होता.

बोगदा ओलांडून ब्रनर पास मधून आम्ही थोड्याच वेळात ऑस्ट्रियाच्या बाहेर आलो. डोंगर उतरल्यावर इटलीची सीमा होती. मधला हा भाग 'नो मॅन्स लॅंड' होता.

# इटली

तीन चार हजार फुटावरून आम्ही खाली आलो आणि काय आश्चर्य ! हलका स्नो फॉल व्हायला लागला पदार्थावर खोबरे भुरभुरावे तसेच दिसत होते त्याबरोबरच निसर्गपण इतका बदलला की दुसऱ्या देशात आल्याचे जाणवले

झाडाची उंची कमी होत गेली आपल्याकडल्या सारखी झाडे दिसायला लागली वर्फाच्छादित पर्वत मागे पडले हिरवेगार पण मधूनच गुलाबी, काळ खडकाळ डोंगर दिसू लागले

मधूनच उन पडले की त्यावरचे वर्फाचे कण पाचू सारखे चमकत होते, ते दृश्य फारच विलोभनीय होते प्रत्येक ठिकाणच्या निसर्गाचे सौंदर्य निराळे

इटलीच्या सीमेवर तपासणीहून निकीन बस रेस्टपोस्टवर आणली सीमेवर नाणी बदलून मिळत होती आत्ता पर्यंत प्रत्येक देशात शहरातील बँक मध्ये नाणी बदलून घ्यावी लागली होती किंवा हॉटेलमधे पण बदलून देत असत प्रत्येक वेळा जरुरी पुरती नाणी बदलून घेत होतो तरी सुद्धा काही नाणी उरतच, मग उरलेल्या नाण्यात चॉकलेट गोळ्या घ्यायच्या नाही तर कॉईन कलेक्शन म्हणून ठेऊन घ्यायचे

इटलीचे नाणे लिरा फारच छोटे नाणे आहे १ डॉलर म्हणजे २००० लिरा. इटलींत तुम्ही सर्व लक्षाधीश व्हाल असं लिडा म्हणाली होती ५० डॉलर चे १ लक्ष लिरा मिळाले इटलीत चार दिवस मुक्काम होता

इथल्या टॉयलेट्स मधे आपल्या कडल्या सारखे पायखाने दिसले व आत आपल्याकडल्या सारखी घाण नव्हती पण वर्तमान-पत्राचे कागद वगैरे कचरा पडलेला होता आपल्याला ह्याही पेक्षा जास्त घाण बघायची सवय असल्याने कांहीच वाटले नाही पण अमेरिकन लोक मात्र नाक मुरडू लागले

इटालियन माणसाच आपल्याशी खूपच बाबतीत साम्य आहे. उचीला हे लोक युरोपियनाच्या तुलनेत ठेंगणेच असतात डोळ्याचा निळा रंग जाऊन डोळे घारे व ब्राऊन दिसू लागले.

इटलात सर्वांनाच होमलो वाटते म्हणतात रस्त्यावरुन खूप गर्दी. गाड्या बरोबरच मधून मधून स्कूटर्स मोपेड्स पण दिसत होत्या पण ऑटोरिक्षा काही कुठेही दिसल्या नाहीत

इटालियन लोक आगत्यशील, अघळपघळ मोकळे बोलणारे आहेत हातवारे करून मोठ मोठ्यानी बोलणे त्याना आवडते. जुने रितीरिवाज पाळत असले तरी तसे प्रगत आहेत इतर युरोपियन देशाच्या मानानी हा देश गरीब आहे तरी आपल्या पेक्षा अनेक पटींनी श्रीमंत आहे

युरोपच्या दक्षिणेला समुद्रात घुसलेला बुटा सारखा हा देश ह्याला खूप मोठा समुद्रकिनारा लाभलेला आहे पूर्वेला ॲड्रिॲटिक समुद्र, पश्चिम व दक्षिणेला मेडिटरेनियन, उत्तरेला आल्प्स आल्प्सगुळे युरोप पासून हा वेगळा झाला आहे

ह्या देशाला पण खूप जुना इतिहास आहे ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात इटालो नांवाचा राज राज्य करत होता त्यावरून देशाच नाव इटली पडलेल आहे. १८ व्या शतका पर्यंत इथे अनेक छोटी छोटी राज्ये होती १९ व्या शतकात सर्वांचे एकत्रीकरण झाले

इटलीतच दोन छोटी स्वतंत्र राष्ट्रे आहेत. सॅन मॅरिनो व्हेनिस जवळ आहे तर व्हॅटिकन हे रोम शहरातच आहे. हे पोपचे राज्य आहे

इटलीचे क्षेत्रफळ ५४००० चौ मैल, व लोकवस्ती साडे पाच कोटी

आम्ही जात होतो तो रस्ता छान होता दुतर्फा द्राक्षाचे मळेच मळे दिसत होते डोंगर उतार पण मळ्यानी व्यापलेले होते प्रत्येक मळ्यात एक घर दिसे इथली घर आपल्याकडल्या सारखीच आहेत निरनिराळ्या आर्किटेक्चरची, उतरती, कौलारू छपरे, बगले दोन मजली, त्याना एका बाजूला गच्ची बालकनी, बाहेरून जिना, बगल्या भोवतीचा परिसर आपल्याकडल्या सारखाच कोणाच्या बगल्या भोवती छान बगिचा तर कोणाच्या नाही मात्र आपल्या कडल्या सारखी झोपडपट्टी व केर कचरा दिसला नाही झोपडपट्टी इथे आहे, अस लिंडा सागत होती व मोठ्या शहराच्या बऱ्याच भागात अशा झोपडपट्टचा व गलिच्छ वस्त्या आहेत पण आम्हाला मात्र कोठेही गलिच्छपण दिसला नाही एक दोन रुक्ष ठिकाण व एक दोन ठिकाणी कचऱ्याचे ढीग गावा बाहेर दिसले तेवढेच, पण गुरेढोरे उघडी ड्रेनेजेस वगैरे दिसले नाही.

आम्हाला व्हेनिसला जायचे होते अजून लचची वेळ व्हायची होती लिंडाची कॉमेंट्री चालूच होती

इटलीत थोड्या थोड्या अतरावर रिती रिवाज बदलतात. उत्तरेकडील व दक्षिणेकडील इटालियनांत खूपच फरक असतो, आपल्याकडे जसा मद्रासी व पजाब्यात फरक आहे

इटलीच्या मध्यातून ॲपेनाईन पर्वत पसरला आहे त्याला इटलीचा कणाच म्हणतात उत्तरेचा बराच भाग आल्प्सने व्यापलेला त्यामुळे, इटलीचा दोन तृतियाश भाग डोंगराळ. ॲपेनाईन पर्वत दाट जगलानी व्यापलेला आहे त्यामुळे येथे जगल सपत्ती खूप आहे बर्च, ओक व पाईन वृक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड होते

ह्या पर्वतांत अनेक जागृत ज्वालामुखी आहेत व्हेसुव्हिअस हा जगप्रसिद्ध ज्वालामुखी नेपल्स जवळ आहे. अगदी दक्षिणेला सिसिलीत माऊट एटना हा पण जागृत आहे.

ज्वालामुखी जागृत होण्याचा संबंध जुने लोक वाईनशी जोडतात हे लोक स्वत पुरती वाईन घरीच बनवतात वाईन बनवताना चूक होऊन वाईन बिघडली तर ज्वालामुखीचा स्फोट होतो अशी ह्याची अंधश्रद्धा आहे त्यामुळे वाईन बनवताना खूपच काटेकोर पणे बनवली जाते

इथे प्रत्येकाच्या बगीच्यात द्राक्षाचा मळा असतो, व त्या पासून घरापुरती वाईन बनवतात वाईन हे पाण्यासारखेच आवश्यक पेय आहे, पण दररोज माफक प्रमाणातच घेतात. नशेत काम करणारे किंवा झिंगून पडलेले लोक आढळत नाहीत. जन्मापासून मुलाना थेंब थेंब वाईन पाजायला सुरवात करतात.

पो व अडीजे ह्या दोन मोठ्या नद्या इटलीत आहेत. उत्तरेला अनेक मोठी सरोवरे आहेत आर्नो व टायबर ह्या नद्या पण प्रसिद्ध आहेत

इटलीचे हवामान वर्षभर छान असते थोडा स्नो फॉल होत असला तरी थंडी फार नसते इथले आकाश स्वच्छ व निळेभोर असल्याने अनेक चित्रकार येथे निसर्गचित्र काढायला येतात

दक्षिण इटलीत मात्र हवा खूप गरम असते अनेक वेळा धुळीची वादळे होतात पाऊस वर्षभर थोडा थोडा पडतो

आमची बस रेस्टपोस्ट वर थांबली होती आम्ही पडोव्हा ह्या गावाजवळ होतो. स्नॅकबार मधे पिझ्झाच्या आशेने गेलो पण पिझ्झा नव्हताच त्याऐवजी सँडविचेस होती. चटणी घातल्यासारखी हिरवीकंड दिसत होती म्हणून ह्यानी घेतली पण ती सॅलडची पानच निघाली व आत मीट होते आम्ही गरम गरम कॉफी घेतली.

अर्ध्यातासाने प्रवास परत सुरु झाला ह्या देशाला आपल्या प्रमाणेच तीन हजार वर्षांपूर्वीचा इतिहास आहे आशियातून आलेल्या इट्रस्कन् लोकानी आधीच्या अुम्ब्रीयन लिगुरियन वगैरे जमातींची पीछेहाट केली हे लोक सुधारलेले होते द्राक्षा पासून वाईन करण्याची कला त्यानीच शोधून काढली ते रथातून प्रवास करत

इटलीचे क्षेत्रफळ ५४००० चौ मैल, व लोकवस्ती साडे पाच कोटी

आम्ही जात होतो तो रस्ता छान होता दुतर्फा द्राक्षाचे मळेच मळे दिसत होते डोंगर उतार पण मळ्यानी व्यापलेले होते प्रत्येक मळ्यात एक घर दिसे इथली घर आपल्याकडल्या सारखीच आहेत निराळ्या आर्किटेक्चरची, उतरती, कौलारू छपरे, बगले दोन मजली, त्याना एका बाजूला गच्ची बालकनी, बाहेरून जिना, बगल्या भोवतीचा परिसर आपल्याकडल्या सारखाच कोणाच्या बगल्या भोवती छान बगिचा तर कोणाच्या नाही मात्र आपल्या कडल्या सारखी झोपडपट्टी व केर कचरा दिसला नाही झोपडपट्टी इथे आहे, अस लिडा सांगत होती व मोठ्या शहराच्या बऱ्याच भागात अशा झोपडपट्ट्या व गलिच्छ वस्त्या आहेत पण आम्हाला मात्र कोठेही गलिच्छपण दिसला नाही एक दोन रुक्ष ठिकाण व एक दोन ठिकाणी कचऱ्याचे ढीग गावा बाहेर दिसले तेवढेच, पण गुरेढोरे उघडी ड्रेनेजेस वगैरे दिसले नाही.

आम्हाला व्हेनिसला जायचे होते अजून लचची वेळ व्हायची होती लिडाची कॉमेंट्री चालूच होती

इटलीत थोड्या थोड्या अतरावर रिती रिवाज बदलतात उत्तरेकडील व दक्षिणेकडील इटालियनात खूपच फरक असतो, आपल्याकडे जसा मद्रासी व पजाब्यात फरक आहे

इटलीच्या मध्यातून ॲपेनाईन पर्वत पसरला आहे. त्याला इटलीचा कणाच म्हणतात उत्तरेचा बराच भाग आल्प्सने व्यापलेला त्यामुळे, इटलीचा दोन तृतियाश भाग डोंगराळ. ॲपेनाईन पर्वत दाट जगलानी व्यापलेला आहे त्यामुळे येथे जगल सपत्ती खूप आहे बर्च, ओक व पाईन वृक्षाची मोठ्या प्रमाणावर लागवड होते

ह्या पर्वतांत अनेक जागृत ज्वालामुखी आहेत व्हेसुव्हिअस हा जगप्रसिद्ध ज्वालामुखी नेपल्स जवळ आहे. अगदी दक्षिणेला सिसिलीत माऊट एटना हा पण जागृत आहे.

ज्वालामुखी जागृत होण्याचा संबध जुने लोक वाईनशी जोडतात हे लोक स्वत पुरती वाईन घरीच बनवतात वाईन बनवताना चूक होऊन वाईन बिघडली तर ज्वालामुखीचा स्फोट होतो अशी ह्याची अंधश्रद्धा आहे त्यामुळे वाईन बनवताना खूपच काटेकोर पणे बनवली जाते

इथे प्रत्येकाच्या बगीच्यात द्राक्षाचा मळा असतो, व त्या पासून घरापुरती वाईन बनवतात वाईन हे पाण्यासारखेच आवश्यक पेय आहे, पण दररोज माफक प्रमाणातच घेतात. नशेत काम करणारे किंवा झिंगून पडलेलें लोक आढळत नाहीत जन्मापासून मुलाना थेंब थेंब वाईन पाजायला सुरवात करतात.

पो व अडीजे ह्या दोन मोठ्या नद्या इटलीत आहेत. उत्तरेला अनेक मोठी सरोवरे आहेत आर्नो व टायबर ह्या नद्या पण प्रसिद्ध आहेत

इटलीचे हवामान वर्षभर छान असते थोडा स्नो फॉल होत असला तरी थंडी फार नसते इथले आकाश स्वच्छ व निळेभोर असल्याने अनेक चित्रकार येथे निसर्गचित्र काढायला येतात.

दक्षिण इटलीत मात्र हवा खूप गरम असते अनेक वेळा धुळीची वादळ होतात पाऊस वर्षभर थोडा थोडा पडतो

आमची बस रेस्टपोस्ट वर थांबली होती. आम्ही पडोव्हा ह्या गावाजवळ होतो स्नॅकबार मध्ये पिझ्झाच्या आशेनी गेलो पण पिझ्झा नव्हताच त्याऐवजी सँडविचेस होती चटणी घातल्यासारखी हिरवीकड दिसत होती म्हणून ह्यानी घेतली पण ती सॅलडची पानच निघाली व आत मीट होते आम्ही गरम गरम कॉफी घेतली.

अध्यीलासाने प्रवास परत सुरु झाला ह्या देशाला आपल्या प्रमाणेच तीन हजार वर्षापूर्वीचा इतिहास आहे आशियातून आलेल्या इट्रस्कन् लोकानी आधीच्या अुम्ब्रीयन लिगुरियन वगैरे जमातींची पीछेहाट केली हे लोक सुधारलेले होते द्राक्षा पासून वाईन करण्याची कला त्यानीच शोधून काढली. ते रथातून प्रवास करत

पुढे रोमन लोकानी इटलीचा ताबा घेतला व लॅटीन भाषेचा प्रचार सुरु केला त्यावेळी लोकशाही होती पण पुढे सैन्याचा सेनापती ऑगस्टस हा सम्राट बनला. ऑगस्टस ह्याचा अर्थ परमेश्वर तो स्वत ला परमेश्वरच समजू लागला

अनेक सम्राट आले व गेले रोमन साम्राज्य अफ्रिकेपर्यंत पसरले इग्लडपण त्यानी ताब्यात घेतले चवथ्या शतकात सम्राट कॉन्स्टटाईनने खिस्त धर्म स्वीकारला व साम्राज्याची राजधानी कॉन्स्टटिनोपलला नेली ह्याने राज्यकारभारांत पोपची मदत घ्यायला सुरवात केली

त्याच्या पश्चात रोम ही रोमन साम्राज्याची राजधानी झाली, व पोप राज्यकारभार बघू लागला

पुढे अनेक जमातींनी हल्ले करुन ह्या साम्राज्याची शकले झाली रोम मधला काही भाग पोपच्याच ताब्यात राहिला

अनेकानी पूर्ण इटलीवर राज्य करण्याचा प्रयत्न केला पण ता साध्य झाला नाही त्यावेळी आत्ताची मोठी शहरे म्हणजे स्वतंत्र राज्ये होती सर्वांना जोडणारे चागले रस्ते नव्हते किंवा एकही चागला राज्यकर्ता नव्हता . त्यामुळे इटलीची व्हावी तशी प्रगती झाली नाही.

पुढे नेपोलियनने पूर्ण इटली ताब्यात घेऊन एका झेंडया खाली आणली. व हे राज्य आपल्या मुलाला—युजीनला देण्याचा प्रयत्न केला पण इ सन् १८१५ च्या व्हिएन्ना कॉंग्रेस मध्ये त्याला मान्यता मिळाली नाही त्याच वेळी इतर युरोपियन देशा प्रमाणेच इटलीत पण स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले.

वाढती लोकसंख्या हा फार मोठा प्रश्न इटली समोर होता तेव्हां लोक देशाबाहेर जाऊ लागले त्याच्या अफ्रिकेत वसाहती झाल्या त्यांचवेळी मुसोलिनी सम्राट बनला. त्याने हुकुमशाही सुरु केली, फॅसिझमचा प्रचार सुरू केला

इटलीला वर आणण्याच्या उद्देशाने दुसऱ्या महायुद्धांत मुसोलिनी जर्मनांना मिळाला, पण पराभव झाल्याने इटलीचे अतोनात नुकसान झाले अफ्रिकेतील वसाहत गमवाली लागली

ह्यामुळे जनता अतिशय चिडली व त्यांनी मुसोलिनीला जीवे मारले अनेक इटालियन पुढारी भूमिगत होऊन दोस्त राष्ट्रांना मिळाले व त्यानी जर्मनीचा पराभव केला. इ. सन १९४६ च्या जून मध्ये इटालीला स्वातंत्र्य मिळाले पुढे अमेरिका व युनायटेड-नेशन्सच्या मदतीने इटलीने झपाट्याने प्रगती केली

ह्याच्या पार्लमेंट मधे दोन हाऊसेस असतात एक चेंबर ऑफ डेप्युटीज व दुसरे सिनेट दर पाच वर्षांनी निवडणुका होतात सिनेट मधे आधीचे प्रेसिडेंट्स असतातच शिवाय इतर थरातले कला, विज्ञान, इकॉनॉमिक्स वगैरे क्षेत्रातले जाणते लोक निवडून घेतले जातात पार्लमेंटचे सभासद प्रेसिडेंट निवडतात व प्रेसिडेंट प्राईम-मिनिस्टर नेमतो व नतर प्राईममिनिस्टर मत्रीमडळ तयार करतो आपल्या प्रमाणेच इथेही अनेक पक्ष आहेत

व्हेनिस जवळ आल्याने कॉमेंट्री थांबली

# व्हेनिस

व्हेनिस, जगातल्या बोटावर मोजण्या इतक्या सुंदर शहरात मोडते, हे त्याच्या वेगळेपणामुळे श्रीमंताची मुलं हनीमून करता इथे येतात

चवथ्या शतका पासून युद्धात पराभव झालेल्या किंवा पळून गेलेल्यानी ह्या बेटांवर आश्रय घेतला हे शहर म्हणजे शेकडो बेटं आहेत. एक बेट म्हणजे एक मोहोल्ला–ही बेटे एकमेकांपासून कमीत कमी १० फूट तर जास्तीत जास्त १०० फूट अंतरावर आहेत अनेक बेटे पुलांनी जोडलेली आहेत.

ख्रिस्तपूर्व काळा पासून इथे घरे बांधलेली आहेत ही बेटे ॲड्रिएटिक समुद्राच्या खाडीत तयार झालेली आहेत त्यामुळे व्हेनिस हे नैसर्गिक बंदर आहे व्हेनिसचे लोक व्हेनिसला समुद्राची वधू म्हणतात पूर्वी हे स्वतंत्र संस्थान होते व अनेक देशाशी इथून व्यापार चाले अनेक व्यापाऱ्यानी इथे घरे बांधली चवदाव्या शतकांत हे जगांतले एक श्रीमंत राज्य होते

आम्ही आता व्हेनिसला जोडणाऱ्या मेस्त्रे ह्या गावात आलो हा भाग इटलीच्या भूभागावर असून व्हेनिस शहरातच मोडतो त्याला मेन लँड म्हणतात

इथून बोटीने व्हेनिसमधल्या सेंट मार्कस् ह्या बेटावर आम्हाला जायचे होते इथे किनाऱ्यावर टॅक्स टॅक्सी होते टॅक्सीज म्हणजे बोटीच पण त्यात ठराविक लोकच बसू शकत. मोठ्या बोटींना बसेस म्हणतात. त्यात आपल्या बस इतकी माणसे मावतात व त्याचे दर पण कमी असतात शिवाय आपल्या ऑटोरिक्षा प्रमाणे

दोन किंवा तीन जणांना नेणाऱ्या बोटी पण असतात ह्या बसेसना व्हेपोरेट्टी म्हणतात कामगार व्हेपोरेट्टीनी कामावर जातात श्रीमंत टॅक्सीनी तर काहींच्या स्वतंत्र बोटी असतात आपल्याकडे जशा कार्स असतात कोणाच्या मोठ्या कोणाच्या छोट्या. ऐपती प्रमाणे जशा आपल्याकडे स्कूटर, लूना असते तशी

आपल्या लूनाशी तुलना होईल अशा बोटींना गंडोले म्हणतात ह्यात पण प्रकार असतात ह्या बोटी निरनिराळ्या आकाराच्या व रंगाच्या असतात कोणी हंसाचा आकार देतो तर कोणी रथाचा

पूर्वी इथे मोठ्या प्रमाणावर मसाल्याचे पदार्थ, सिल्क व सोने वगैरेंचा व्यापार चालायचा. सुएझ कालव्यामुळे ह्या शहराचे महत्व कमी झाले. पण ह्याचा वेगळेपणा आवडल्याने प्रवाशानी इथे गर्दी करायला सुरुवात केली

इथली लोक संख्या साडेतीन लाख आहे बेटावर घरे व इमारती दाटीवाटीने बांधलेली आहेत प्रत्येकाला बोट ठेवायला गॅरेज आहे घरा समोरचा रस्ता म्हणजे कॅनॉलच ह्या मोहोल्यातून त्या माहोल्यात जायचे तर बोटीने मग मोहोल्यांत पायीच हिंडायचे इथले रस्ते अगदीचे छोटे आहेत जेमतेम पाच फूटी प्रवाशाकरता अनेक गिफ्ट शॉप्स इथे आहेत

आम्ही व्हेपोरेट्टोने सेंट मार्कस वर आलो रस्त्याच्या दुतर्फा ठेलेवाले तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू विकत होते.

आम्ही सेंट मार्कसच्या चौकात आलो चौकांना इटलीत पिआझ्झा म्हणतात इथेच सुप्रसिद्ध सेंट मार्कचे चर्च आहे. पूर्वी पूर्ण चर्चला सोन्याचा मुलामा दिलेला होता आता फक्त घुमटच सोनेरी दिसतो घुमटावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे

चर्च समोर मोठा चौक आहे तिन्ही बाजूनी दुकाने व हॉटेल्स आहेत इथे सदोदित जत्राच भरलेली असते हॉटेलवाले खुर्च्या टेबले चौकात मांडून ठेवतात काही प्रवाशाना आकृष्ट करण्याकरता बॅंड ठेवतात

मधोमध एका स्तभावर इटलीचे मानचिन्ह पख असलेला सिह आहे त्या स्तभाला कपानीले म्हणतात मध्यतरी एक 'पीजट प्रोजेक्ट' नावाची इग्लीश कादबरी वाचनात आली तिचा पूर्ण प्लॉट व्हेनिस मधलाच आहे त्यात वर्णन केल्याप्रमाणे खरोखरच हृया कपानीले जवळ अनेक कबुतरे आढळली प्रवासी त्याना दाणे खाऊ घालत होते ही कबुतरी चागली गुबगुबीत व धीट आहेत

कपानीले प्रमाणेच अनेक खाब इथे आहेत चर्चच्या बाजूला भितीवर जगातले पहिले डिजिटल घड्याळ आहे आकडे रोमन लिपित आहेत घड्याळाच्या टॉवर वर ठोके देणारा माणूस दर अर्ध्या तासाने एक व प्रत्येक तासाचे तेवढे ठोके देतो घड्याळाच्या वर १० फूट व्यासाचा एक गोल आहे त्यावर कडेनी सर्व राशी काढल्या आहेत. सूर्याबरोबर सरकणारा एक काटा तेथे लावलेला आहे. सूर्य ज्या राशींत असेल ती रास तो कांटा दाखवतो

इथे आम्हाला वेगळा गाईड मिळाला गळ्यात मायक्रोफोन, त्याचे कनेक्शन एका ट्रान्झिस्टरला व तो ट्रान्झिस्टर हातात धरून गाईड महाशय सतत वडबड करत होते बरीचशी माहिती फालतू होती लिडानी सर्व आम्हाला आधीच सागितल होत.

त्याने प्रथम आम्हाला चर्च मधे नेल चर्चचा गाभारा खूपच भव्य आहे त्याच्या भितींवर व छतावर बायबल मधले अनेक प्रसग पेंट केलेले आहेत ही सर्व रगीत पेंटिग्ज आहेत बाजूनी सोनेरी नक्षी काम आहे इथली कारागिरी वर्णनातीत आहे.

नंतर बेटावरच त्याने हिंडवले सर्वात जुना व छोटा पूल दाखवला. एक ब्रिज ऑफ साईज त्याने दाखवला म्हणजे निश्वासाच पूल हृया पुला जवळ पूर्वी तुरुग होता हृया तुरुगाला बारीक जाळी लावलेल्या खिडक्या होत्या. कैदी त्याना भेटायला आलेल्या नातेवाईकाना बघू शकत असत पण नातेवाईकाना कैदी दिसत नसत ते निश्वास सोडण्या पलिकडे काही करु शकत नसत.

गाईड सांगत होता की, समुद्राच्या सतत येणाऱ्या लाटा, भरती, ओहोटी व कालव्यांतून सतत हिंडणाऱ्या बोटींचे हादरे ह्यामुळे इथल्या बिल्डिंग्जना धोका पोहोचतो आहे व ह्या बिल्डिंग्जच्या वजनाने व हादरण्याने बेटे हळू हळू खचत आहेत सध्यातरी १०० वर्षाला १ फूट असे प्रमाण आहे त्यामुळे अनेक जुन्या इमारतींचे तळमजले अर्धे पाण्या खाली गेले आहेत खचणे असेच चालू राहिले तर काही वर्षांनी व्हेनिस समुद्राचा एक भाग होऊन जाईल ह्या धोक्या पासून व्हेनिसला वाचवण्याकरता हे 'सेव्ह व्हेनिस' ही सशोधन सस्था स्थापलेली आहे हिच्या बद्दलची माहिती पण मी 'पीजट प्रोजेक्ट' मधेच वाचली

इथल्या इमारतींवर देवदेवतांचे पुतळे, चेहरे, काढलेले दिसतात कांही इमारतींवर पऱ्या बसलेल्या किंवा उभ्या असतात

गडोलेवाले गडोल्यांत बसाव म्हणून मागे लागतात त्याच्याशी खूप भाव करावा लागतो गडोला राईड ऐच्छिक होती इथल पाणी वाहतुकी मुळे व सर्व साडपाणी ह्यातच सोडत असल्याने घाणेरडे आहे असे ऐकले होते भाजी बाजार पण गडोल्यावरच असतो म्हणे म्हणून आम्ही ही राईड घेतली नाही आम्ही बेटावरच वेळ काढला

शॉपिंग करता, हिंडली नाणे लहान असल्याने प्रत्येक वस्तूची किंमत खूप वाटते ३५०० लिराचा गडोला आम्ही विकत घेतला त्याला नाईट लॅम्पची सोय आहे. इथे पण भाव करावा लागतो अस ऐकल होत पण आम्हाला मात्र कोणी भाव कमी करेना

गडोला राईड घेऊन लोक परत आल्यावर आम्ही एक काच कारखाना बघायला गेलो ह्या बेटावर दोन तीन काच कारखाने आहेत तऱ्हेतऱ्हेच्या काचेच्या रगीबेरगी वस्तूनी अनेक दुकाने गच्च भरलेली दिसली एका कामगाराने पाच मिनिटात सुदर फ्लॉवर पॉट बनवून दाखवला व नतर त्याही पेक्षा कमी वेळांत एक धावणारा घोडा इतका सुबक बनवला की डोळ्यावर विश्वासच

पसेना एकीकडे एक जण कांच कशाची तयार करतात, रंग कसे घालतात वगैरे सांगत होता

तेथून त्याच्याच दुकानांत गेलो वाईन सेट्स पासून ते मोठ मोठी झुंबरे व अनेक शोभेच्या वस्तू तेथे होत्या मुक्त हस्ताने इंद्र-धनुष्याच्या रंगाची उधळण केल्या सारखे वाटत होते शिवाय दिव्याच्या झगमगाटाने डोळे दिपून जात होते. पैसे नसल्यास व्ही पी. ने कोठेही वस्तू सुंदर पॅक करून पाठवायची त्याची तयारी होती अमेरिकेची क्रेडिटकार्डस पण त्यांना चालत होती अमेरिकन प्रवासी हेच त्याचे मोठे गिऱ्हाईक ते भराभर वस्तू खरेदी करत होते दुकानात वेळ कसा गेला ते समजलेही नाही साडेपाच वाजता कपानीले जवळ जमायचे होते

सर्व जमल्यावर सहा वाजता आम्ही व्हेपोरेट्टीने परत मेस्त्रेला आलो बसने इथून १५ मैलावर असलेल्या हॉटेल मार्घेरात मुक्कामाला आलो

रूमचे नंबर मिळाल्यावर रूमवर आलो इटलीत वीज महाग असल्याने वीज काटकसरीने वापरतात. त्यामुळे गरम पाणी फक्त सकाळी मिळणार होते त्यामुळे अंघोळ सकाळीच करावी लागणार होती

ह्या हॉटेलात जेवायची सोय नव्हती. जेवायकरता आम्ही हॉटेल आजिप मधे गेलो तेथे सेल्फसर्व्हिस होती काऊंटवर कांचेच्या कपाटातून पदार्थ ठेवलेले होते. ट्रे घेऊन आपण हव ते घेत पुढे सरकायच गरम पदार्थ तेवढे वेटर्स देत होते शेवटी एक वेटरेस बील करत होती ठराविक किंमतीच्या वर झाल तर आम्हाला त्याचे वेगळे पैसे द्यावे लागणार होते. पण व्हेजिटेरियन खाणाऱ्यांना तो प्रश्न कधीच येत नाही अगदी अंडी केक्स दूध हे पण खूप स्वस्त असते मीटच खूप महाग असते ह्या पद्धतीने बऱ्या पैकी जेवण झाले अंडे, दूध, सॅलड, सफरचंद पुडिंग वगैरे इथेही कूलरचे थंड पाणी प्यायला मिळाले.

व्हेनिसमधे बरेच चालणे झाले होते रूम वर टी व्हीच काय पण रेडिओपण नव्हता आज लवकरच झोपी गेलो

आज १० तारीख.

इथे ब्रेकफास्टला जरा मऊ ब्रेड मिळाली लच बांधून घेतले. बरोबरची पुरणपोळी, चिवडा, चकली व शकरपाळे थोडे राहिले होते

आज बसमधे आम्हाला टेबलशी जागा मिळाली होती आमच्या समोर डॉ कड़ व त्यांचा मुलगा बसले होते ते भारतीय मुस्लिम असून सध्या दुबईला आहेत.

आश्चर्य म्हणजे चिनी रोमिओ ज्युलिएट आज परत शेजारी शेजारी बसले होते हा काय लपडाव चालला होता ? एकदम कोणाच्या डोळ्यात येऊ नये असे चूला वाटत असेल पण आम्ही त्यांच्यावर चांगलीच नजर ठेऊन होतो

काल व्हेरोना ह्या गावावरून जाताना लिंडानी सांगितल होत की ह्या गावात ज्युलिएटा नावाच्या मुलीची समाधी आहे तिने प्रेमभंगाचे दुःख सहन न होऊन आत्महत्या केली होती आपले लांब केस गॅलरीतून सोडून ती आपल्या प्रियकराची वाट बघत असे तिच्या केसांना धरून तिचा प्रियकर वर यायचा अशी आख्यायिका लोक सांगतात. ह्या सत्यकथेच्या आधारावरच शेक्सपिअरने 'रोमिओ-ज्युलिएट' हे नाटक लिहिले असे म्हणतात म्हणून आम्ही पण चू व ली ला रोमिओ ज्युलिएट' म्हणायला सुरुवात केली

आज आम्हाला एकदम रोम पर्यंतचा ३४० मैलाचा प्रवास करायचा होता. बसने वेग घेतला आणि आम्ही एका रस्त्याला लागलो तो रस्ता फारच ओळखीचा वाटू लागला आपल्या भारतात-ल्या सारखा, खाच खळग्याचा तेवढयात लिंडाने सांगितलेच की हा रस्ता रोमन काळात बांधलेला आहे दरवर्षी त्याची फक्त डागडुजी केली जाते

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
६८८
अ.क्र. २४२२०
२३/९/२०८६

लिंडा सांगत होती की इथे एकत्र कुटुंब पद्धती बऱ्याच घरातून आहे लोक कुटुंब वत्सल आहेत वेगळे राहिले तरी सणावारांना एकत्र जमतात इकडच्या पुरुषांना आईच्या हातचा सैपाक जास्त आवडतो बायकोला आई सारख जमत नाही म्हणून तो रागावतो सासूवासुनाची भांडणे पण इथे होतात लिंडा हे सर्व जगावेगळे म्हणून कुतुहलानी सागत होती, पण मनात म्हटल आम्हाला हे काही नवीन नाही

रस्त्याने दुतर्फा अम्रेला पाईनची झाडे आहेत सरळ सोट उंच खोडाच्या शेंड्याना छत्रीच्या काड्याप्रमाणे गोलाकारात अनेक फांद्या होत्या

आम्हाला आता ॲपेनाईन पर्वत ओलाडून पश्चिमेकडे जायचे होते ह्या पर्वतामधे मधून मधून सगमरवराच्या टेकड्या आहेत वर स्वच्छ निळेभोर आकाश व खाली गर्द हिरव्या डोंगरांच्या मधून मधून पिंक व पांढऱ्या रंगाचे सगमरवराचे चमकते दगड, मधून मधून पाण्याचे ओहळ इथल्या निसर्ग शब्दानी सागण्या पलिकडचा आहे. म्हणूनच की काय चित्रकार त्याना कागदावर साकार करतात. कवी कवीतेत बद्ध करतात इथे चित्रकार व कवी कॅंपिंग करता येतात

आम्ही नुसते मंत्रमुग्ध होऊन सर्व डोळ्यात साठवून ठेवले

पापोसा ह्या गावाजवळ निसर्ग लांब गेला व अनेक मठ दृष्टीस पडले हे रोमन–ख्रिश्चन साधुसंताचे मठ वेद काळापासून आहेत म्हणे त्याना मॉंक्स म्हणतात

ॲपेनाईन पर्वतातून अनेक बोगदे ओलाडून आम्ही रोमच्या जवळ आलो लंच करता डोंगरमाथ्यावर बसलेल्या असिसी ह्या गावातील सेंट फ्रान्सिसच्या बॅसिलिकाच्या प्रागणात आलो आमच्या सारख्याच शंभरतरी बसेस इथे उभ्या होत्या

बॅसिलिका म्हणजे रोमनकाळात बाधलेले चर्च व बाजूने सन्याशांचे मठ उंचावर असल्याने येथून बाजूचा परिसर सुंदर

दिसत होता एका शाळेची ट्रीप पण त्याचवेळी तेथे आली होती ८ ते १५ वयोगटातील मुले व मुली व त्याचा किलबिलाट ऐकून बर वाटल मुलांच्या एकमेकाच्या खोड्या काढण धावण, एक ग्रुप नाच करत होत 'उली उली अन्ना' अस काही सस गाण गात होते ते बघून वाटल मोठी माणस शिस्तप्रिय असली तरी मुलें इथून तिथून सारखीच

एका मॉंकने आम्हाला आत नेले आत प्रत्येक सन्याशाला स्वतंत्र खोली व अंगण. अंगणात आपल्या पुरता भाजीपाला व फुले ते काढतात सेंट फ्रांसिस हा ख्रिस्ताच्या पहिल्या बारा अनुयायातला पण नंतर त्याने वेगळा पंथ स्थापन केला इथे त्याची समाधी आहे ओमन्याच्या खांबावर प्रसिद्ध शिष्याचे मुखवटे लावलेले आहेत इथून बाहेर येऊन आम्ही लंच घेतले व रोमकडे कूच केली

आता रस्त्याच्या दुतर्फा ऑलिव्हची झाडे होती त्यामागे द्राक्षाचे मळेच मळे

पूर्ण इटलीत इटालियन हीच भाषा बोलली जाते. फार थोडे लोक जर्मन बोलतात इटालियन पण लॅटिन पासूनच बनलेली आहे. रोमन काळात लॅटिनचे दोन प्रकार होते सुशिक्षित लोक क्लासिक लॅटीन बोलत तर अशिक्षित लोकांची रागडी लॅटीन आपल्या संस्कृत व प्राकृत प्रमाणे सध्याची इटालियन ही क्लासिक लॅटीन सारखी आहे अस ते म्हणतात

तरी उत्तरेची भाषा दक्षिणपेक्षा खूपच वेगळी झाली आहे इथे १४ व्या वर्षा पर्यंत शिक्षण जबरदस्ती आहे आपल्याकडे जशी १० + २ वर्षे आहेत तशी इथे ५ + ३ + ५ अशी आहेत मेडिकल, इंजिनिअरिंग करता सेंट्रल बोर्डाची परिक्षा द्यावी लागते

फुटबॉल व बुद्धिबळ हे इटालियनाचे आवडते खेळ फुटबॉल पूर्वी फक्त राजे राण्या खेळत आता सर्व खेळतात एका राजाने पूर्वी आपल्या मुलीच्या दोन प्रियकरात बुद्धीबळाची स्पर्धा लावली होती तेव्हां पासून हा खेळ प्रसिद्ध झाला मोठ्या संगमरवरी

फरशांचा पट करून माणसांची प्यादी बनवून हा खेळ खेळला जाई अजूनही व्हेनेटो ह्या शहरांत हा पट दाखवतात व वर्षातून एकदा तेथे स्पर्धा होतात स्पर्धक पंधराव्या शतकांतला ड्रेस घालतात.

गाण्या बजावण्याचा ह्यांना भारी षौक ऑपेराची सुरवात इथेच झाली म्हणे प्रत्येक इटालियन गाणे म्हणतो इटालियन लोक जितके हसतमुख तितकेच तापट, वळल तर सूत नाहीतर भूत असा प्रकार दोस्ती असेल तर जिवाला जीव देतील वैर असेल तर एकमेकाचा जीव घेतील

माफियाचे सभासद इटालियनच गॉड फादर पण इथलाच इटलीने अनेक गुणी व सुंदर नटया हॉलिवुडला दिल्या, सोफिया लॉरेन, जीना लोलो ब्रिजिडा ह्या प्रसिद्धच आहेत

आता आम्ही रोम मध्ये आलो आज प्रथम हॉटेलात जाऊन ताजे तवाने होऊन रोम बाय नाईट बघून, बाहेर साग्रसंगीत जेवायला जायचे होते.

रोम हे गजबजलेले शहर असल्याने इथे हिंडताना काही गोष्टी ध्यानांत ठेवायला लिंडाने सांगितल्या, 'पुश' हा इथल्या तरुणाचा की वर्ड आहे मवाली मुले रस्त्याने जाता येता बायका मुलींना धक्के देण्याचा चान्स सोडत नाहीत ह्याही पुढे जाऊन पार्श्वभागाला चिमटा काढणे हा त्याचा आवडता छंद आहे त्याला 'बम्‌पिंच' किंवा 'पिंचिंग–द–बम्‌स' म्हणतात इथे अनेक पॉकेट मार डल्ला मारायला टपलेलेच असतात आपल्याला ह्याची सवयच आहे रस्त्यांच्या कडेला आपल्या कडल्या प्रमाणेच टोळभैरव पोरीबाळींना सतवायला उभे असतात

रोम हे प्राचीन शहर असले तरी नवीन भाग मॉडर्न आहे इथे जुन्या नव्याचा सुंदर संगम झाला आहे.

रोम हे सात टेकड्यावर वसलेले आहे. त्यामुळे रस्त्याना सारखे चढ उतार आहेत. रस्ते लहान असले तरी दुतर्फा दाट झाडी असल्याने अल्हाददायक वाटत होते प्रत्येक टेकडीच्या माथ्यावर

रेलिंग घालून व्ह्यू पॉईंट्स तयार केले आहेत सध्याकाळी मोकळी हवा खायला लोक तेथे गर्दी करतात

रोम कस वसल, हेच नांव का पडल ह्या विषयी अनेक आख्यायिका आहेत ख्रिस्त पूर्व आठशे मधे एका धर्मगुरुच्या सन्यासि मुलीने जुळ्या मुलाना जन्म दिला ह्या मुलाचे वडील म्हणजे सगळावरचा देव ह्या पापाची शिक्षा म्हणून धर्मगुरुने ह्या मुलाना टायबर नदीकाठी सोडून दिले. पुढे लाडगिणीने त्यांना दूध पाजून वाढवले त्याची नावे रोम्यलस व रेमस पडली एका मेंढपाळाने त्याना घरी नेले

मोठी झाल्यावर त्यानी टायबर काठी शहर वसवले तेच रोम रोम मधे प्रवेश करताच दोन बाळ लाडगिणीचे दूध पीत आहेत असा पूतळा बघितला हे रोमच मानचिन्ह आहे

रोम आता आणिक ३–४ टेकड्यावर पसरले आहे

हॉटेल लिट्टोरीच्या आवारात बस थाबली चार मजली, चार बिल्डिग्ज आहेत हॉटेल नवीनच वाटत होते बिल्डिग्ज गोलाकार असून गोलाकार बाल्कनीज आहेत खाली गार्डन व बाजूला डायनिंग हॉल मोटवेवरच आहे

थोडा आराम करून आम्ही आज चांगल्या साड्या नेसलो कारण आज डीनरला जायचे होते ह्याचे आम्ही वेगळे पैसे भरले होते प्रत्येकी २० डॉलर्स

सर्वच जण चागल्या पोशाखात होते. फक्त निकीच यायचा राहिला होता. त्यामुळे ग्रुपनी फोटो घेणे गप्पा मारणे असे वातावरण होते

आठ वाजता निकी आला. प्रथम आम्ही इथले सुप्रसिद्ध ट्रेव्ही फाऊटन बघायला गेलो. रोम हे कारज्यांचे शहर, त्यातलेच हे एक. रात्री इथे फ्लडलाईट्स सोडतात आम्ही तेथे पोहोचलो तर आमच्या दुर्दैवानी तेथे एका पक्षाची सभा भरली होती. त्यामुळे बिचारे कारजे अधारातच उपेक्षिता सारखे उभे होते. सर्व फ्लडलाईट्स

रंगमंचाकडे वळवले होते व अफाट जनसमुदाय जमलेला होता रोमचे रस्ते छोटे छोटेच आहेत मधून मधून मोठाले चौक आहेत

कारंजे न बघताच परत फिरला तर एक बाई गायब एवढ्या गर्दीत चुकणे अगदी सहाजिक होते म्हणूनच आम्ही एकमेकाना धरुन चेनच केली होती व जास्त आत गेलो नाही दहा मिनीटे तिचा शोध घेतला पण जास्त वेळ देणे शक्यनव्हते तिला न घेताच निघालो

काल श्रीमती नवरातेला लिंडानी पकडून ठेवले होते म्हणून ती सुखरुप होती तरी ही आफत आलीच लिंडा तरी कोणा कोणाला धरून ठेवणार !

ह्या कारंजाला थ्री कॉईन फाऊंटन असे पण म्हणतात ह्यात लोक नाणी टाकतात व आम्हाला येथे परत यायला मिळो अशी प्रार्थना करतात व हे कारंजे त्याना पावते असा समज आहे आम्हाला नाणी टाकता आली नाहीत तेव्हा आता आम्हाला काही रोमला जायचा योग परत येणार नाही नाही तरी परत परत कोण जातय ? ह्या कारंजावर आधारित इंग्लिशमधे कॉईन फाऊंटन हा चित्रपट निघालेला आहेत, तशीच त्यावर इंग्रजीत लिहिलेली एक कादंबरी पण वाचायला मिळाली त्यात रोमचं वर्णन आहे

असा आमचा विरस झाला तरी आम्ही नतर आणिक एका सुंदर कारंज्याशी गेलो. तेथेच सर्वानी नाणी टाकून प्रार्थना केली. हे कारंजे कोणा कोणाला पावते ते आता बघायचे हे कारंजे म्हणण्यापेक्षा पुतळ्याच्या अंगा खांद्यावरून खाली येणारे धबधबेच होते. हे पंख लावलेल्या देवदूताचे पुतळे एका भिंती लगत होते. त्याच्या दोन बाजूनी पण दोन पुतळे होते. खाली अर्ध वर्तुळाकार तळे होते त्यावर फ्लडलाईट्स सोडलेले असल्याने त्या जुन्या पुतळ्याना नव्याची निलाई लाभली होती. ह्या कारंज्याच्या पायऱ्यावर अनेक टोळ भैरव बसलेले होते लिंडानी इशारा करताच आम्ही आमच्या पर्सेस पोटाशी धरल्या.

आता एका गजबजलेल्या भागात बस शिरली मुबईच्या गिरगावात आल्या सारख वाटू लागल जवळ जवळ घरे, खाली दुकाने एका छोट्याशा हॉटेलशी आम्ही उतरलो आत पण कलकलाट चालू होता ग ण्याचे आवाज बोलण्याचे आवाज त्यातच बशाचे आवाज लहान लहान खोल्यांत लोक कोंबल्या सारखी बसली होती इथे इटालियन लोक आठवड्या तून दोन तीन दा तरी बाहेर जेवतात

आम्हाला एक खोली दिली होती आम्ही कसेबसे तेथे मावलो वाईनच्या बाटल्या टेबलावर ठेवलेल्याच होत्या, सॉफ्ट ड्रिंक पण देत होते

सूप ने सुरवात करुन पाच कोर्सच डीनर घेतल मधल्या मीटच्या डिशेस आम्ही घेतल्या नाहीत. त्याएवजी एक सॅलडची डीश व एक पास्टाची डीश घेतली पास्टा मैद्याचा असतो मैद्याच्या पोळ्या सॉस मधे बुडवलेल्या व शेवटी डेझर्ट

दोघे तिघ व्हायोलिन वादक व्हायोलिन वाजवत फिरत होते एक गायकही त्याना सामिल झाला खोड्या काढून अमेरिकन पोरींना ते मनवत होते. डिशेस उचलून दुसऱ्या आणून देण ह्यात वेटर्सची धावपळ चालू होती सर्वच जण मोठ मोठ्याने बोलत होते त्यामुळे एकूण गोंधळच होता पण बदल म्हणून मजा वाटली रात्री १२ वाजता हॉटेलात परतलो उद्या ९ वाजता निघायचे होते

११ मे –

उशीर उठायच ठरवल तरी लवकर उजाडत असल्याने लवकरच जाग आली आज ब्रेक फास्टला अर्धातास उशीरा जायचे होते आठ वाजता आम्हा खाली आलो बाजूच्या कॅंटिनमधे ब्रेकफास्टला जायचे होते आज कडक ब्रेड एवजी क्रोसाँ होते नेहमी प्रमाणे बाधून घेतले ९ वाजता बस निघाली

मुख्य वस्ती ह्या टेकड्याच्या पायथ्याशी आहे. टेकड्यावर श्रीमत लोकाचे बगले आहेत. जितक्या जास्त उचावर बगला तेवढा

तो बगलेवाला जास्त श्रीमत असे समजले जाते श्रीमतामध्ये बगले बाधायची स्पर्धाच चालू असते म्हणे त्यामुळे इथे एकापेक्षा एक सुदर बगले दिसतात

पॅलाटाईन हिलवर ऑगस्टस राजाचा राजवाडा आहे पॅलाटाईन ह्या शब्दावरूनच पॅलेस हा शब्द आला असे म्हणतात ह्या टेकडीच्या पायथ्याशी रोमन फोरम होते म्हणजे पब्लिकप्लेस-जनता चौक आता त्याचे अवशेष तेवढे दिसतात ह्याच ठिकाणी रोम्युलसला त्याच्या मृत्यूनतर पुरल असा समज आहे हे फोरम म्हणजे राजाच्या राजवटीतील स्वतत्र शहरच असे जनतेनी चालवलेले इथे त्याकाळी बाधलेल्या मदीरांचे पण अवशेष सापडतात रोमनलोक त्यावेळी मदीरे बाधत आपल्या सारखेच त्याचे अनेक देव होते ह्या फोरम पासूनच इथे रस्ते बाधायला सुरवात झाली इथला एक दगड पहिला मैलाचा दगड म्हणून दाखवतात. इथेच पुढे ज्यूलियस सीझरची हत्या झाली

हे सर्व बघत बघत आम्ही कोलाझियम मध्ये गेलो रोमन-काळचे हे सुप्रसिद्ध स्टेडियम हे अवाढव्या स्टेडियम त्यावेळी कसे बांधले असेल ह्याची कल्पनापण करवत नाही

हे स्टेडियम चार मजली गोलाकार आहे त्याचा डायामिटर जवळ जवळ ५०० फूट आहे. वर राजे–रजवाडे सरदार व श्रीमत लोकाना बसायची व्यवस्था व खाली जनतेला

हे राजे लोक त्यावेळी सतत कसल्यान् कसल्या स्पर्धा घडवून आणत व अशा तऱ्हेनी लोकाची करमणूक करून त्याना इतर काही विचार करायला फुरसतच देत नसत. ह्या स्पर्धा पण अघोरी असत. भाडणे वैमनस्य ह्यातून मल्लयुद्धे, होत आपल्याकडे जशी महाभारतात गदायुद्धे भल्लयुद्धे होत तशीच

ह्या शिवाय हिंस्त्र जनावराकरता मैदानाच्या मध्यावर पण तळघरात दगडी भिंती घालून पिंजरे तयार केले होते. ह्या जनावराच्या लढती, करमणुकी करता हे लोक लावत. शिवाय ह्या

जनावराचा उपयोग कैद्याना शिक्षा करायला होई कैद्याला मैदानात सोडले जाई त्याच्या वासानी भुकेलेली हिंस्त्र जनावरे पिंजऱ्यातून वर येत त्याच्याशी लढत कैद्याला प्राण गमवावा लागे खालून श्वापदाना वर यायला व कैद्यांना मैदानात पाठवायला वेगळी वेगळी सोय होती मैदानाच्या बाजूने भक्कम भिंत होती. आता सर्व पडझड झाली आहे त्याच्या गॅलऱ्याचा भाग सतत दुरुस्त करावा लागतोय पहिले बांधकाम पूर्ण दगडी होते खाली फरशाच्या जागी विटा वापरलेल्या दिसतात जिन्याना पण विटाच वापरलेल्या आहेत

बसने जाताना जिथे तिथे रोमन काळातील अवशेष दिसतात. रोमची पुनर्रचना करतात ह्याचा फारच त्रास होत आहे सब–वे काढण्याकरता खोदाव तर तीन चार फुटावर अवशेष लागतात मग खोदकाम अर्धवट ठेवून उत्खनन सुरू करावे लागते. त्यामुळे इथे भुयारी मार्ग तयार करणे अजूनतरी शक्य झाले नाहि. नवीन रस्ते तयार करतानाही हीच अडचण रस्ता थांबवून उलट आणिक आजूबाजूची जागा उत्खननाकरता बंद ठेवावी लागते .

कॉन्स्टंटाईनची कमान बघून आम्ही व्हेनेझिया ह्या चौकात आलो यथे दुसरा इमॅन्युएल ह्या राजाचे स्मारक आहे पूर्ण इमारत पांढरीशुभ्र संगमरवरी आहे बिल्डिंग समोर इमॅन्युएलच घोड्यावर बसलेला पुतळा आहे पायाशी अनेक पुतळे आहेत इमारतीवर चारी बाजूनी सुंदर नक्षीकाम कोरलेले आहे अनेक चबुतरे व त्यावर पुतळे आहेत पुतळ्याच्या दोन्ही बाजूने सुंदर कारंजी आहेत आता तेथे ऑफिसेस आहेत

एक वाजता ऑफिसेस व दुकाने बंद करून लोक जेवायला घरी चालले होते त्यामुळे रस्त्याने खूपच गर्दी होती तरी तीन लेनचे रस्ते आहेत म्हणजे जाणाऱ्या तीन व येणाऱ्या तीन गाड्या

इथली दुकाने व ऑफिसेस सकाळी ९ ते दुपारी १, व नंतर ४ ते ७ अशी उघडी असतात दुपारी जेवून झोपणे हा आवडीचा कार्यक्रम

इथले राष्ट्रपतीभवन मात्र फारसे आकर्षक नाही आता आम्ही टायबर नदीवरील पुलावरून चाललो होतो हा पूल भव्य व सुंदर आहे पूलाच्या सुरवातीला व शेवटी दोन्ही बाजूना देवदूताचे पुतळे आहेत हे सर्व पुतळे संगमरवरी आहेत. इटलीत अनेक ठिकाणी संगमरवराच्या खाणी आहेत इमारतींना योग्य असा करारा दगड इथे मुबलक मिळतो

रोम मधील सुंदर बिल्डिंग्ज व कारंजी मुख्यत लिओनार्डो –द–व्हिन्सी व मायकेल अँजेलो ह्या प्रतिभावंत कलाकारांनी डिझाईन करुन बांधली आहेत दोघेही विविध क्षेत्रात पारंगत होते सर्व चर्चेस मधून त्यांचीच पेंटिंग्ज आहेत लिओनार्डो–द–व्हिन्सीची 'मोनालिसा' तर जगप्रसिद्ध आहे

मायकेल अँजेलो स्थापत्यशास्त्रज्ञ व चित्रकार पेंटर तर होताच शिवाय तो डॉक्टर पण होता डॉक्टरी विद्या त्याने स्वत च मिळवली प्रेते मिळवून त्यांचे डिसेक्शन करुन त्याने शरीरशास्त्राचे ज्ञान मिळवले एकही कलेचे किंवा ज्ञानाचे क्षेत्र काबीज करायचे त्याने सोडले नाही

ह्या दोघांची सर्वांत उत्तम कलाकृती म्हणजे सेंट पिटर्स बॅसिलिका तीच बघायला आम्ही चाललो होतो ह्या राजरस्त्यावर थोड्या थोड्या अंतरानी तीन सुंदर कारंजी आहेत जणू काही सेंट पिटर्सला मानवंदना देत आहेत हाच रस्ता सेंट चर्चच्या आवारात जातो

सेंट पिटर्स ख्रिस्ताच्या पहिल्या बारा अनुयायांचा प्रमुख ह्यालाच पहिला पोप म्हणून मानतात इ सन् ६७ मध्ये त्याचा मृत्यू रोम मधील वॅटिकन टेकडीवर झाला असावा. असे लक्षात आल्यावर इ सन् १५०० मध्ये त्याचे स्मारक म्हणून हे चर्च बांधले मायकेल अँजेलोने ह्याचा गाभा व डोमचे डिझाईन केले तर बाकी भाग जिओवानी लोरेन्झो बरनीनी ह्यांनी केले.

बाजूलाच वॅटिकन हे पोपचे स्वतंत्र राष्ट्र आहे

सेंट पिटर्सचे आवार खूपच भव्य आहे. एका वेळी दोन लाख लोक तेथे मावतात. बाजूनी मोठाल्या ओसऱ्या आहेत अनेक खांबाचा आधार ह्याला दिलेला आहे

सणाना इथे सभा व व्याख्याने किंवा प्रवचने होतात

आंत शिरल्यावर तर त्याची भव्यता जास्तीच जाणवायला लागली भिंतीशी पवित्र पाण्याचा ( तीर्थ ) कुंभ घेऊन दोन पंख असलेली बाळे आहेत, ती इतकी सुबक व रेखीव आहेत की जाऊन गालगुच्चा घेण्याचा मोह व्हावा

सेंट पिटर्सचा सेंट मेरिचा व इतर अनेक संगमरवरी पुतळे आहेत भिंतीवर व छतांवर सुंदर पेंटींग्ज आहेत पुतळ्याचे हावभाव व डोळे अतिशय बोलके वाटतात दगडाची वस्त्रे असून ती अतिशय तलम वाटतात

सेंट पिटर्सच्या समाधीवर सोनेरी नक्षीकाम आहे भाविक लोक एक मेणबत्ती पेटवून तेथे ठेवतात. आंत दोन तीन ठिकाणी फोन व त्या समोर एक बॉक्स होता. फोन उचलून बटन दाबले की बॉक्सवर चित्र येऊन त्याची माहिती फोन मधून ऐकू येते चर्चची पूर्ण माहिती सांगतात तसेच वॅटिकनची पण माहिती सांगितली

# वॅटिकन

हे जगातले सर्वांत छोटे राष्ट्र आहे फक्त १०८ एकर क्षेत्रफळ असून लोकसंख्या फक्त १३०० आहे येथे पोपचा राजवाडा आहे आवारांतच सिस्टिन चॅपल हे चर्च आहे इथली पेंटिंग्ज पूर्ण करायला मायकेल अँजेलोला बावीस वर्षं लागली हयाच पोस्ट, बँक, वीज मंडळ सर्व काही स्वतंत्र आहे, फक्त अन्नधान्यावर हे रोमवर अवलंबून आहे

सध्याचा पोप पोलंडचा धर्मगुरू दुसरा जॉन पॉल हा आहे. जगातील पन्नास कोटी लोकांचा धर्मगुरु जगातील सर्व चर्चेस व त्याची ऑफिसे हयाच्या अधिपत्याखाली आहेत. हयाच्या संरक्षणा-करिता स्विस सैनिक आहेत.

लिरा हेच नाणे चालते पण त्याची स्वत:ची टाकसाळ आहे इथली लायब्ररी खूप मोठी आहे जगातील सर्व भाषातील धार्मिक ग्रंथ इथे आहेत त्याचे स्वतंत्र रेडिओ स्टेशन आहे

इ सन् १८७७ पर्यंत इटली पोपच्याच अधिपत्याखाली होती पुढे इटली एका राजवटींत आणण्याच्या प्रयत्नात पोपला कैद करुन वॅटिकनच्या राजवाड्यामधेच नजरकैदेत ठेवले गेले. इ सन् १९२९ पर्यंतचे सर्व पोप इथे नजर कैदेतच होते पुढे जनतेच्या आग्रहाखातर व इतर राष्ट्रातील रोमन कॅथोलिक्सच्या मदतीने राजा व पोप हयाच्यात तह होऊन वॅटिकनचा पूर्ण भाग पोपला बहाल केला गेला. व स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता मिळाली. भोवती भक्कम भिंत बांधली गेली सेंट पिटर्सच्या चर्च जवळ प्रवेशद्वार ठेवले व रोमला जोडणारा राज रस्ता तयार झाला. हयाला 'द अॅव्हेन्यू ऑफ रीकॉन्सीलेशन' असे नाव दिले

जगांतील पन्नास राष्ट्राशी त्यांचे राजकीय संबंध असून त्यांचे राजदूत पण त्या त्या राष्ट्रात आहेत– रशिया व अमेरिकेशी मात्र त्याचे राजकीय संबध नाहींत

पोपने निवडलेला गव्हर्नर हा राष्ट्रप्रमुख असतो. त्याच्या मदतीला कॉन्सूलर जनरल व त्याच्या हाताखाली एक समिती असते एवढेच लोक पूर्ण राष्ट्राचा कारभार बघतात

आम्ही चर्चच्या बाहेर आलो 'वॅटिकन' बघायला गेलेली मंडळी यायचीच होती चर्चच्या बाहेरच्या चौकांत अनेक ठेलेवाले खाद्य-पदार्थ विकत होते ठेला म्हणजे गाड्याच होत्या एका ठिकाणी ब्रेडचा पिझा मिळाला पण गरम नसल्याने वातड लागला.

वेळ काढायला गिफ्ट शॉप्स मधून हिंडलो रोमन योध्याचा रथातला ब्राँझचा पुतळा खरेदी केला व ब्रेडच्या शोधात फिरलो. भाषा कळत नसल्याने कसे विचारावे समजेना एका दुकानांत समोरच क्रोसाडचें पॅकेट दिसले तेच घेतले व दुधाची बाटली

बोळातून आपल्या कडल्या रामभरोसे किंवा अमृततुल्य हॉटेल सारखीच हॉटेल्स इथे होती आपल्या कडल्या सारखी स्लाईडस् ब्रेड कोठेही मिळाली नाही

मीटिंग पॉईंटशी परत आलो बस उभीच होती. लिंडा व कांही लोक समोरच्या हॉटेल बाहेर खुर्च्या टाकून बसले होते आम्ही पण तेथे चहा घेतला

आता बस परत हॉटेलकडे वळली रूमवर जाऊन आराम करून आम्ही परत हॉटेलच्या आवारातच हिंडलो आज रात्री जेवायला शहरात जाणाऱ्याकरता बस परत जाणार होती अमेरिकन लोक डान्स बघायला व जेवायला जाणार होते आम्ही जाणार नव्हतो

खालच्या जेवण हॉलमधे आज अंध लोक जमलेले दिसत होते त्याची कॉनफरन्स चालू होती म्हणे

आम्ही आमच्या जवळचेच खाऊन झोपून गेलो.

आज १२ मे

आमच्या लग्नाचा वाढदिवस अशोक व जयूने आठवणीने विश केले व प्रेझेंट पण दिले खूपच मजा वाटली. हजारो मैल दूर असलेल्या परक्या देशात वाढदिवस साजरा करणार होतो आम्ही पुरणपोळया खाऊन

ठराविक ब्रेकफास्ट घेऊन बसशी आलो छान उन पडल होत म्हणून फोटो काढलें तेवढ्यात सर्वच मडळी जमली बस फ्लोरन्सच्या दिशेने धावू लागली

शहराबाहेर पडल्यावर एका टेकडीवर खाली आलेली एक पन्हळ पाईप सारखी दिसत होती ते रोमन काळातील ॲक्वी डक्ट्स आहेत असे लिडाने सांगितले, त्यावेळी पाणी पुरवठ्या करता ह्यांचा वापर करत

रोम ते फ्लोरेन्स हे १७६ मैल अतर आम्ही चार तासात पार केल व एकच्या सुमारास आम्ही फ्लोरेन्स जवळ आलो

## फ्लोरेन्स

फ्लोरेन्सला इटलीत फिरेंद्र म्हणतात फ्लोरेन्स म्हटल की फ्लोरेन्स नाइटिंगेलची आठवण होते हे नावच किती नाद मधुर आहे

फ्लोरन्स म्हणजे महाराष्ट्रातील पुणे. आर्नोनदीच्या खोऱ्यात वसलेले लहान लहान गल्ल्या बोळ, दाटी वाटीने उभारलेली घर, गल्ल्या गल्ल्यात अनेक सतांची चर्चेस, सस्कृती जतन करणारे लोक इथली इटालियन सर्वांत शुद्ध मानणारे, शिक्षण व कलेचे माहेर घर.

मोठ मोठे प्रसिद्ध लेखक, कवी, कलावत इथलेच इथल्या युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळणे मानाचे समजले जाते

रस्त्याच्या दुतर्फा द्राक्षाचे मळे पसरलेले आहेत हा भाग 'कियाटी क्लासिकल' नावाच्या लाल वाईन करता प्रसिद्ध आहे

ह्या भागात श्रीमंत लोक रहातात डोंगर शिखरावर घरे बांधण ही चैनीची बाब समजली जाते जितके घर उंच तितका त्याच्या मालक श्रीमंत त्यामुळे डोंगरांवर सुंदर सुंदर राजवाडेच दिसतात

आर्नोनदीच्या काठी आमची बस थांबली गावात नदीला बांध घालून तिचा मार्गही बदललेला आहे इ सन १९६६ मधे ह्या नदीला पूर येऊन येथे "पानशेत झाले होते"

म्यूझियम मधील अनेक अनमोल पेंटिंग्ज खराब झाली लायब्ररीतील दुर्मिळ पुस्तकं चिखलात भरली पण पूर ओसरल्यावर इथल्या लोकांनी एकजुटीने मेहनत करुन चिखलातून सर्व पेंटिंग्ज व पुस्तके वाचवली, गरीब श्रीमंत सर्व जातीने खपत होते म्हणे कारण त्यांना ह्या राष्ट्रीय ठेवीचा फार अभिमान आहे. ह्या वस्तूंना आता तेथे Angles of the mud' चिखल्यांतल्या पऱ्या असं म्हणतात.

बस मधून उतरलो तर पाऊस पडत होता. थोड्यावेळ बस मधेच थांबाव लागल इथली लेदर फॅक्टरी प्रसिद्ध आहे म्हणून ती बघायला गेलो छोट्या छोट्या वस्तूपासून तर मोठमोठ्या सुटकेसेस पर्यंत तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू बनवल्या जातात वस्तूच्या किंमती बघून जीव दडपला पण आठवण म्हणून छोटीशी सेंटची बाटली ठेवलेली डबी घेतली

बाकीचे लोक चर्चेस बघायला गेले. आम्ही बसशी परतलो. इथे पण पन्नास तरी बसेस उभ्या होत्या प्रवासी येत होते जात होते. एक निग्रो मुलगा खड्या-मोत्याच्या माळा विकत होता. एक बाई त्याच्याशी हुज्जत घालत होती अमेरिकन वृद्धा होती तिच्या पांढऱ्या ड्रेसवर मॅच होणारी पांढरी मण्याची माळ तिला घ्यायची होती पण सौदा पटलेला दिसला नाही ती बस मधे जाऊन बसली. पण नतर तिच्या नवऱ्याने ती विकत घेतली व तिच्या गळ्यात ती

विराजमान झाली आता तिचा चेहरा फुलला आम्ही गमत बघत होतो जयूला म्हटल बघ, जिथून तिथून बायका सारख्याच दागिने व मॅचिंगचा सोस परत नवऱ्याने हौस पुरवायची हा अलिखित नियम तऱ्हा वेगळी पण भावना एकच.

श्रावणातल्या सारखा 'क्षणांत येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे.' असं चालू होत

बस येताच बस मधे जाऊन बसलो लहान लहान गल्लचातून निकी सफाईने बस नेत होता

नवीन भागात मात्र रस्ते मोठे व प्रशस्त आहेत रस्त्याने एका बाजूला गुलाबाचा बगीचा लागला सुंदर गुलाब फुललेले होते

पुढे स्मशानभूमी पण ह्यांची स्मशान भूमी म्हणजे एक आर्ट गॅलरीच असते थडग्यावर सुंदर सुंदर समाध्या व पुतळे बांधलेले असतात ह्यावर हे लोक खूप खर्च करतात गेल्यानंतर कशी समाधी बांधायची, ते मृत्यूपत्रात लिहून ठेवतात जन्मभराची शिल्लक ह्या पायी खर्च करतात नंतर त्याचे नातेवाईक वरचे वर थडग्याशी येऊन ताजी फुल ठेवून त्याना सुशोभित करत रहातात कोणी कोणी तेथे छोटासा बगीचा पण करतात त्यामुळे स्मशाने भयाण वाटत नाहीत. येथे सायप्रसचे झाड लावण्याची पद्धत आहे मृताचा आत्मा ह्या झाडाच्या आधाराने स्वर्गाला जातो अशी श्रद्धा आहे

हॉटेल आजिप पाशी बस आली आपल्या आपल्या खोल्यावर येऊन थोडा आराम करून आम्ही जेवायला खाली आलो येथे पण सेल्फ सर्व्हिस असल्याने जेवण चांगले झाले पाणी पण मिळाले

# पीसाचा मनोरा

आज १३ मे

फ्लोरन्सहून निघून एका तासातच आम्ही पीसा मधे आलो. पीसा हे इटलीचे महत्वाचे बंदर आहे

१२ व्या शतकातील राजाने येथून सागरावर साम्राज्य प्रस्थापित केल होत. तेव्हां विजयाचे स्मारक म्हणून एक कॅथेड्रल बांधले ह्या कॅथेड्रलचे बेल टॉवर म्हणजेच पीसाचा झुकता मनोरा जगातील सात आश्चर्यांपैकी एक इ सन ११७३ मधे बांधला १६५ फूट उंच असून तो साडेपाच अंशांनी कललेला आहे

ह्याबद्दल अनेक तर्क कुतर्क आहेत कोणी म्हणतात पाया चुकीचा घेतल्याने तो नकळत झुकत झाला आहे पण तस असत तर इतकी वर्ष तो टिकला नसता

कांहीच्या मते प्रयोग म्हणून तो बांधला व यशस्वी झाला. ह्याचा स्थापत्यशास्त्रज्ञ कोण आहे ह्या विषयी कोणालाच माहिती नाही मनोऱ्याचा घेर बराच व त्यामानाने उंची कमी त्यामुळे कल्पना केली होती तेवढा झुकता वाटत नाहीं

नेमका पाऊस पडत होता उत्साही लोक मनोऱ्यावर चढले आम्ही त्याचा फोटो घेण्याच्या नादात बराच वेळ गमावला पूर्ण फोटो घ्यायला बरच लांब जाव लागल नंतर वर जायला वेळच राहिला नाही मनोऱ्याची प्रतीकृती विकत घेतली व आडोशा आडोशाने बसशी आलो

दहा वाजता पीसा सोडले आता आम्हाला आल्प्स मधून प्रवास करायचा होता समुद्राच्या काठा काठाने आल्प्स पसरला आहे.

किनारपट्टी खूपच अरुद आहे ह्या भागाला इटालियन रिव्हिएरा म्हणतात

थोड्याच वेळात आम्ही बरीच उंची गाठली घाट असल्याने खालचे रस्ते सुंदर दिसत होते थोड्या थोड्या अंतरावर बोगदे लागत होते, कांही छोटे तर कांही मैलभर लांब दोन बोगद्यामधे जेमतेम दोन तीन मिनिटांचा रस्ता पण त्या तेवढ्या वेळातही इतके सुंदर दृष्य दिसे की परत बोगदा आला की राग येई बोगदा केंव्हा संपतो ह्याची आम्ही वाट बघत असू इतक्या उंचावरुनही मधून मधून समुद्रकिनारा दिसायचा किनाऱ्यावर तरंगणाऱ्या असंख्य रंगीबेरंगी बोटी डोंगर उतारावर व दरींत वसलेली गावे त्यातील रस्ते लुटुपुटीचे वाटत होते बऱ्याच ठिकाणी आम्ही धुक्यातून जात होतो, तर अजून उंच गेल्यावर धुके खाली दिसत होत.

धुक्यातून तरंगत चालल्या सारखे वाटत होते खालची रंगी-बेरंगी छप्पराची घरे, अनेक ग्लास हाऊसेस, अंतरा अंतरावर आहेत स्वप्न सृष्टींत वावरत असल्या सारखे वाटत होते ह्या वाताव-रणाला योग्य पार्श्वसंगीत लिंडाने लावले होते कॉमेंट्री केंव्हाचीच बंद होती, सर्व भारावल्यासारखे वसुंधरेचे हे वेगळेच सौंदर्य लुटत होते

टेपवर मंद स्वरात 'आय व्हिल क्रॉस द स्ट्रीम, आय हॅव व ड्रीम, आय बिलिव्ह इन एंजल' हे गाणे लागले होते स्वित्झर्लंड मधील तीव्र मंदार नंतर इथे एकदम षड्जावर गेल्या सारखे वाटले

-इटली ओलांडून फ्रेंच रिव्हिएरा सुरु झाला. नीस येइ पर्यंत षड्जावरच. समाधी लागलेली होती

एखाद्या कसलेल्या गवयाने परीपूर्ण षड्ज लावावा व श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट करे पर्यंत खाली येऊ नये तसे वाटले.

एके ठिकाणी तर पर्वत किनाऱ्याच्या अगदी जवळ असल्याने उंचावरुन जाताना धुक्यामुळे खालचे काहीच दिसत नव्हते खाली

धुक्यातून दूर निळा समुद्र व वर आकाश त्यामुळे समुद्रावरच मोठा पूल बांधल्या सारखे वाटत होते

इटलींत असंख्य ग्लास हाऊसेस मधून तऱ्हेतऱ्हेची फुल वाढवतात व ही सर्व फ्रान्स मधील परफ्यूम फॅक्टरींत पाठवली जातात फुले वाढवणे हा इथला प्रमुख धंदा नीस येई पर्यंत एकूण १८० बोगदे लागले पीसा ते नीस २०० मैल अंतर आहे.

मधे डोंगरातून जाताना दूरवर ओरिएंट एक्सप्रेस जाताना दिसली अनेक वळण असल्याने एखादी नागीणच सरसर जात आहे असे वाटले

इटालियन इंजिनिअर्स रस्ते बांधण्यात फारच कुशल आहेत

मागे बसलेल्या एका मलेशिअन माणसाला सिगरेटच्या धुराचा खूपच त्रास व्हायला लागून तो धापा टाकतच समोर आला त्याला एकदम अस्थमाचा अॅटॅक आला

बसमधे बाकी सर्व सुरळीत चालू होत पण सिगरेटच्या धुराचा त्रास होतच होता, लिंडाने अनेक वेळा सांगूनही चेन स्मोकर्स ऐकत नव्हते, बस थांबेल तेव्हाच त्यांनी ओढावी खर तर पण लिंडा म्हणे तसा नियम नसल्याने मी जास्त काही म्हणू शकत नाही अनेक जोडप्यापैकी बायकाच जास्त ओढत होत्या. ह्या प्रश्नावर तोडगा नव्हता

आता आम्ही खाली उतरत होतो इटलीची सीमा मागे पडत चालली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६८८
२५२२०
३०/२/८९

# मॉंटे कार्लो-मोनॅको

ग्रिमाल्डी हा सर्वांत मोठा व शेवटचा बोगदा ओलांडून आम्ही मोनॅको ह्या चिमुकल्या राष्ट्रात प्रवेश केला ही प्रिन्सीपालिटी आहे

येथे परफ्यूम फॅक्टरी बघून आम्ही फ्रान्स मधील नीसला मुक्कामाला जाणार होतो व परत मोनॅकोच्या माँटेकार्लो ह्या भागात कसीनो बघायला येणार होतो

डोंगर दऱ्यामध्ये बसलेले व अनेक तळी व धबधबे असलेले हे सुंदर राज्य परिकथेतील राज्याप्रमाणेच वाटले एका बाजूला समुद्र तर तीन्ही बाजूनी फ्रान्सने वेढलेले

राज्यात टॅक्स नसल्याने अनेक व्यापारी, नट, नटचा, टेनीसपटू गायक वादक आपला पैसा इथे बॅंकेत ठेवतात एवढच नाही तर इथले रहिवाशी होतात सुंदर बंगले विकत घेऊन आराम करायला इथे येतात.

हे राज्य प्रवासी व जुगारी अड्यावरच चालते टॅक्स घेत नसले तरी हा टॅक्स जुगारी अड्यांवर वसूल होतो. परफ्यूम बरोबरच सौंदर्य प्रसाधनाचा पण इथे कारखाना आहे

आम्ही अत्तराच्या कारखान्यात येऊन पोहोचलो त्याच्याच गाईडने आम्हाला कारखाना दाखवला. एक हजार पौंड फुलातून फक्त १ पौंड इसेन्स मिळतो ही फूले इटलीतून येतात एका मोठ्या भाड्यात ही फूल ठेवतात व त्यावर वाफ सोडली जाते सर्व सुवास वाफेत सामावला जातो ही सुवासयुक्त वाफ दुसरीकडे नेऊन तिचे परत पाण्यात रूपांतर केले जाते हे द्रवरुप इसेन्स. ह्यांत ठराविक

प्रमाणात अल्कोहोल मिसळून निरनिराळ्या दर्जांची अत्तरे तयार होतात कोलन मधे फक्त दोन टक्के इसेन्स असतो तर टॉयलेट वॉटर म्हणजे अंघोळी नंतर अंगावर उडवायचे म्हणजेच आपला नेहमीचा सेंट स्प्रे त्यात सहा टक्के, तर परफ्यूम मधे वीस टक्के इसेन्स असतो

नोडालू नावाच्या माणसाने ह्याचा शोध लावला इथे त्याची स्वतंत्र प्रयोग शाळा आहे एक नवीन परफ्यूम तयार करायला काही वेळ तीन ते चार वर्षे पण लागतात

इथे ही परफ्यूम्स कोड नावानी निरनिराळ्या कंपनीजना पाठवते व त्या कंपनीज आपली नाव देऊन बॉटलींग व लेबलींग करुन विकतात

ह्या बरोबरच सेंटेड साबण, फेस पावडर टाल्कम पावडर पण तयार होते. सेंटेड मे. बत्त्या पण

इथेही आम्हाला विशेष स्वस्त वाटल नाही स्वतंत्र पणे प्रत्येकाचा सुगंध सुंदर येत असला तरी सर्वांचा मिश्र वास फारच उग्र येत होता सुगंध झाला म्हणून काय झाले, अति तिथे माती शिंका यायला लागून कसें तरी व्हायला लागले.

मोकळी व शुद्ध हवा मिळवण्याकरता बाहेर आलो तर धो धो पाऊस. तसेच भिजत कॅफेटेरीयात गेलो गरम गरम चहा घेतल्यावर बरे वाटले

पावसातच सर्व बस मधे बसले सध्याकाळी पांच वाजता नीस मधे आलो. आज आमचे हॉटेल न्यूयॉर्क डाऊन टाऊन मधेच होते, बाजारातच, मुख्य रस्त्यापासून थोडे आत बोळात.

इथून समुद्र चालण्याच्या अंतरावर आहे. दोन तास आम्हाला बाजारांत हिंडायला मिळाले होते पण मधून मधून पाऊस पडतच होता.

आडोशा आडोशाने आम्ही एका डिपार्टमेंटल स्टोअर मधे शिरलो सर्वच वस्तू खूप महाग होत्या. पाऊस थाबलेला बघून

आम्ही दुसऱ्या दारातून बाहेर पडलो तर समोरच भाजीचं दुकान लालबुद रसरशीत टोमॅटो बघून सँडविचेसची आठवण झाली तावडतोब दुकानात जाऊन, महाग असले तरी टोमॅटो काकडी व हिरव्या मिरच्या खरेदी केल्या बरेच दिवसांत चमचमीत खाल्ल नव्हत

थोड हिंडल्यावर ब्रेड पण मिळाली बाकी खरेदींत रस नव्हता खोलीवर येऊन सँडविचेस बनवून जेवण केल दुसऱ्या दिवशीकरता पण तयार करून ठेवली

चांगले पोशाख करून मोनॅकोचा राजवाडा बघायला निघालो सध्या राजा तिसरा रेनिअर राज्य करतो आहे. ह्या घराण्याला जेव्हा वारस उरणार नाहीं तेव्हाच हे राज्य फ्रान्स मधे विलीन केले जाईल.

दुसऱ्या रेनिअरने बरीच वर्षे लग्न केले नाही पण पुढे फ्रान्सच्या चित्रपट महोत्सवात ग्रेसकेली ही सुप्रसिद्ध अभिनेत्री अॅकेडेमी अॅवॉर्ड घ्यायला आली असता राजाला ती आवडली व राजाने तिला मागणी घालून तिच्याशी लग्न केलें

योगायोगाने अमेरिकेत गेल्यावर ग्रेसकेली वरचा एक चित्रपट बघायला मिळाला पुढे ती कार अॅक्सिडेंट मधे गेली

मोनॅकोचे क्षेत्रफळ फक्त १ ५ चौ किलोमिटर आहे म्हणजे आपल्या एका पेठे एवढ लोक सख्या फक्त चोवीस हजार. आता इथली लोकसख्या सारखी वाढते आहे. म्हणून समुद्रात भर टाकून राज्याचे क्षेत्रफळ वाढवावयाचे प्लॅन आहेत, तसेच डोंगरांचा इंच न इंच भाग वापरात आणायचा आहे.

इथली पोस्टाची तिकिटे प्रसिद्ध आहेत. ती फार सुंदर असतात इथे सुंदर बोटॅनिकल गार्डन आहे. तसेच 'मॉडर्न ओशनोग्राफिक रिसर्च सेंटर' आहे.

राजवाड्याच्या भोवती हिंडताना खालचा समुद्र खूपच विलोभनीय दिसत होता. राजवाडा डोंगर माथ्यावर आहे. आता

सूर्यास्त जवळ आला होता सधी प्रकाशात पाण्यातील निरनिराळ्या रंगाच्या बदलत्या छटा मनोवेधक होत्या तेवढ्यात सूर्यास्त होऊन क्षणभरात सर्व रंग लुप्त झाले व काळा रग पसरला पण बघता बघता बोटींवरचे किनाऱ्यावरचे फ्लड लाईट्स लागले. ह्यात पण किती तऱ्हा ? सोडियमचे पिवळे, निऑनचे निळे, कांही पाढरे काही लाल ह्या सर्व दिव्याचे पाण्यात प्रतिबिंब पडून समुद्रात चादणे शिपल्या सारखे वाटले.

म्हणूनच ह्या सौंदर्यावर मोहित होऊन एका लेखकाने लिहिले आहे की हे छोटेसे राज्य म्हणजे जणू एक मोठे अँफिथिएटरच आहे

इथून आम्ही प्रथम एका बार मधे गेलो तेथे वाईन घेऊन कसिनोंत जायच होत जुगार खेळायची पूर्वतयारी नको का ?

सगळे अनुभव घ्यायचे अस ट्रिपच्या सुरवातीलाच ठरवल होत नाटकात जसे नटनट्या तीन तास अभिनय करतात तसेच आज आम्ही मॉंटेकार्लोच्या कसीनो मधे जुगाऱ्याचा रोल करणार होतो. फक्त तीन तास.

नेहेमी प्रमाणे वाईन घेऊन आम्ही कसीनोकडे वळलो कसीनोचे प्रवेशद्वार झगमगत होते आत जुगार खेळायच्या तऱ्हा तऱ्हा होत्या. आम्ही त्यांच्या वाटेला गेलोच नाही कमी पैशात खेळता येणाऱ्या मशीन्स रिकाम्या नव्हत्या एका मशीनला नबर लावून गमत बघत उभे राहिलो., तेथे हवी ती व हवी तेवढी सुटी नाणी देणारे बथ होते मिनी स्कर्टमधल्या पोरी पेय सर्व्ह करत फिरत होत्या दारु पाजून हे अड्डे श्रीमत लोकाना अक्षरश लुबाडतात

आम्हाला मशीन मिळाले १० सेंटिमची तीन नाणी टाकून दाडा ओढायचा त्यावरचा ड्रम गरगर फिरतो. त्यावर तीन रागा-मधे चित्र असतात ड्रम थाबल्यावर एका रागेंत जरी सारखी चित्रे आली तरी वीस १० सेंटिमची नाणी म्हणजे २ फँक मिळतात, ही खळ खळ आवाज करत समोरच्या पॅन मधे पडतात तो आवाज

कानाला खूपच गोड लागतो १० सेंटिम म्हणजे फ्रँकचा दहावा भाग तिन्ही रांगात सारखी चित्रे आली तर जॅक पॉट लागतो जॅक पॉट म्हणून रेसिंग कार ठेवलेली असते. ती मिळवण्याकरता लोक कफल्लक होतात. पैसे मिळाल्यावर बंद करणारे महाभाग विरळाच उलट ते सर्व लावून आपल्याही जवळचे जातात आमचे तेच झाले.

तीन तास कसे गेले ते समजलेही नाही.

# नीस

आज १४ मे नीस मधे हिडून आम्हाला १२ वाजताच पुढे जायच होत हॉटेल सकाळीच सोडायच होत सर्व खाली लाऊंज मधे आणून ठेऊन आम्ही ९ वाजता चालतच बाहेर पडलो काल बसने येतानाच समुद्राकडे जाण्याचा रस्ता बघून ठेवला होता. एका इंडियन हॉटेलची ताज इंटरनॅशनल अशी पाटी पण वाचलेली आठवली

दुकानांचा रस्ता संपल्यावर डावीकडे वळलो हा रस्ता फारच सुंदर आहे चौकातच लांब लचक तळे आहे व त्यात अनेक कारंजी थुईथूई नाचत होती तळ्या भोवती बगीचा दोन रस्त्याच्या मधे लांब पर्यंत हा बगीचा होता, बगीच्यात बाजूनी कमानींवर गुलाबाचे वेल होते बगीचात रस्ता की रस्त्यांत बगीचा असा संभ्रम पडावा. रस्त्याच्या बाजूनी उंच झाडे सावली देत होते शिवाय फुलांचे ताटवे असलेले मोठे मोठे कुंड जिथे तिथे ठेवलेले होते. ह्या सुंदर राजरस्त्याने समुद्राच्या काठी कधी पोहोचलो ते कळलेच नाही.

किनाऱ्या समोर मोठ मोठी हॉटेल्स आहेत समुद्रावरचे बीचचे भाग त्यांनी राखून ठेवले आहेत तेथे खुर्च्या घालून ठेवलेल्या होत्या अनेक बायका पुरुष बिकिनीमधे अंगाला लोशन लावून सूर्यस्नान करता पहुडले होते

बरेच पुढे गेल्यावर ताज सापडले पण दुर्दैवाने ते बारा वाजता उघडत होते. आम्हाला तर बाराच्या आधीच निघायचे होते आम्ही बरेच लांब आलो होतो तेव्हा परतणे भागच होते

येताना वेगळ्या रस्त्याने यायचे ठरवले व ते बरेच झाले हया रस्त्यावर आम्हाला फुलाच मार्केट लागल शेकडो जातीची व रगाची रसरशीत फुल बघून जीव वेडावला

त्याच्याच पलिकडे भाजी बाजार होता छोटीशी मडईच. तेथे मात्र आम्ही परत काकडी, टोमॅटो व मिरच्या वगैरे खरेदी केले व हॉटेलवर परतलो

सर्व जण आज बसची वाट बघत होते मग कळल की निकी दुसऱ्या बसच्या मदतीकरता कान्सला गेला आहे त्यामुळे तेथ पर्यंत आम्हाला दुसऱ्या बसने जायच होत आमच्या बरोबरच्या एका मलेशिअन बाईने ५० फ्रॅक्स खर्च करुन सुदर विग विकत घेतला तिचे केस कुरळे तर हे सरळ व लहान ती घालूनच आली तर तिचेच केस तिने सरळ करून घेतलेत अस वाटल. इतका तो विग छान होता. कारण इथे काहीच अशक्य नाहीं

केसाचाच काय डोळ्याचा पण रग बदलून मिळतो

कान्सला निकी तयारच होता कान्स हे चित्रपट महोत्सवाच गाव हे पण नीस सारखच सुदर आहे किनाऱ्यावर नारळाची झाड दिसली मोंटेकार्लो जवळ असल्याने तेथे नटनटयाची वर्दळ असते

आता आम्हाला पॅरिसच्या वाटेवर लिऑन हया गावात मुक्काम करायचा होता

फ्रान्सचे क्षेत्रफळ ५४७ हजार चौरस किलोमिटर व लोकसख्या अदाजे सहा कोटींच्या आसपास दक्षिणेला स्पेन व भूमध्य समुद्र, पश्चिमेला अॅटलाटिक, व इग्लीश खाडी उत्तरेला बेल्जियम, लक्झेंबर्ग. पुर्वेला जर्मनी, स्वित्झर्लंड व इटली स्वित्झर्लंडच्या सीमेवर जुरा पर्वत तर इटलीच्या आल्प्स स्पेन जवळ पायरनीज.

हया पर्वतातून उगम पावणाऱ्या अनेक नद्या त्याच्या उपनद्या व हया नद्याना जोडणारे कॅनॉल्स हयानी सपूर्ण फ्रान्सभर जाळे विणले आहे हया नद्यामधून दळणवळण पण चालते

ख्रिस्तपूर्व ५१ पासून इथे रोमनांची वस्ती ज्यूलिअससीझरच्या काळांत ह्याला गॉल म्हणत रोमन काळातील अवशेष इथेही सापडतात अनेक राजे आले व गेले सतत युद्धे चालत

१४ व्या शतकात इंग्लडच्या एडवर्ड राजाने फ्रान्सवर राज्य केले फ्रान्सच्या राजाच्या मुलीचाच हा मुलगा पण पुढे फ्रेंचांनी त्याचा पराभव केला पुढे परत इंग्लडच्या पाचव्या हेन्रीने ताबा मिळवला त्याने फ्रान्सच्या राजाला जबरदस्ती जावई करून घेतला व नातवाला गादी देण्याच्या अटीवर फ्रान्सचा ताबा सोडला त्यालाच Treaty of Troyes म्हणतात त्याच्या मृत्यूनंतर सहावा हेन्री, फ्रान्स व इंग्लडचा राजा झाला इंग्रज सैन्यच त्याच्या दिमतीला होते

त्याचा सावत्र भाऊ डॉफीन हा पण गादीवर हक्क दाखवू लागला त्याच वेळी एका शेतकऱ्याची मुलगी जोन ऑफ आर्क त्याच्या मदतीला आली देवाने आपल्याला फ्रान्सच्या मदतीकरता पाठवले आहे असं ती सर्वांना सांगू लागली मोठ्या धडाडीची होती, झाशीची राणीच जणू तिने फ्रेंच सैन्य आपल्या ताब्यात घेतले, व ती सेनापती बनली इंग्लिश सैन्याचा पराभव करून तिने डॉफिनला राज्यावर बसवले, पण ह्या धुमश्चक्रीत जोन ऑफ आर्क इंग्रजांच्या तावडीत सापडली ते तिला हडळ म्हणत व म्हणून तिला काडीला बांधून त्यांनी जिवंत जाळली. त्यामुळे फ्रेंच लोक चेकाळले व त्यांनी इंग्रजांना पळवून लावले तिच्यामुळे जनता प्रथमच युद्धांत पडली ती हुतात्मा ठरली अजूनही लोक तिची आठवण काढतात

सोळाव्या शतकात येथे धर्मयुद्ध झाले कॅथॉलिक्स व प्रोटेस्टंट ह्यात त्यांतच त्यावेळचा राजा चौथा हेन्री मारला गेला धर्मगुरू रिचेली ह्यांनी वीस वर्षं राणी मारी–डी–मेडिची हिच्या सहाय्याने राज्यकारभार हाकला ह्याच काळात फ्रान्स बलाढ्य बनले लोकांना धर्मस्वातंत्र्य मिळाले

पुढे अनेक वर्षं कार्डिनाल मझारिन राज्य चालवत होता. छोटा १४वा लुई नाममात्र राजा होता तो मोठा झाल्यावर त्याने

येताना वेगळ्या रस्त्याने यायचे ठरवले व ते बरेच झाले ह्या रस्त्यावर आम्हाला फुलाच मार्केट लागल शेकडो जातीची व रंगाची रसरशीत फुल बघून जीव वेडावला

त्याच्याच पलिकडे भाजी बाजार होता छोटीशी मंडईच तेथे मात्र आम्ही परत काकडी, टोमॅटो व मिरच्या वगैरे खरेदी केले व हॉटेलवर परतलो.

सर्व जण आज बसची वाट बघत होते मग कळल की निकी दुसऱ्या बसच्या मदतीकरता कान्सला गेला आहे त्यामुळे तेथ पर्यंत आम्हाला दुसऱ्या बसने जायच होत आमच्या बरोबरच्या एका मलेशिअन बाईने ५० फ्रॅक्स खर्च करुन सुंदर विग विकत घेतला तिचे केस कुरळे तर हे सरळ व लहान ती घालूनच आली तर तिचेच केस तिने सरळ करून घेतलेत अस वाटल इतका तो विग छान होता. कारण इथे काहीच अशक्य नाही

केसांचाच काय डोळ्याचा पण रंग बदलून मिळतो

कान्सला निकी तयारच होता कान्स हे चित्रपट महोत्सवाच गाव हे पण नीस सारखच सुंदर आहे किनाऱ्यावर नारळाची झाड दिसली मोंटेकार्लो जवळ असल्याने तेथे नटनट्यांची वर्दळ असते

आता आम्हाला पॅरिसच्या वाटेवर लिऑन ह्या गावात मुक्काम करायचा होता

फ्रान्सचे क्षेत्रफळ ५४७ हजार चौरस किलोमिटर व लोकसंख्या अंदाजे सहा कोटींच्या आसपास दक्षिणेला स्पेन व भूमध्य समुद्र, पश्चिमेला अॅटलांटिक, व इंग्लीश खाडी उत्तरेला बेल्जियम, लक्झेंबर्ग. पुर्वेला जर्मनी, स्वित्झर्लंड व इटली स्वित्झर्लंडच्या सीमेवर जुरा पर्वत तर इटलीच्या आल्प्स. स्पेन जवळ पायरनीज

ह्या पर्वतातून उगम पावणाऱ्या अनेक नद्या त्याच्या उपनद्या व ह्या नद्याना जोडणारे कॅनॉल्स ह्यानी संपूर्ण फ्रान्सभर जाळे विणले आहे ह्या नद्यामधून दळणवळण पण चालते

ख्रिस्तपूर्व ५१ पासून इथे रोमनांची वस्ती. ज्यूलिअससीझरच्या काळात ह्याला गॉल म्हणत रोमन काळातील अवशेष इथेही सापडतात अनेक राजे आले व गेले सतत युद्धे चालत

१४ व्या शतकांत इंग्लंडच्या एडवर्ड राजाने फ्रान्सवर राज्य केले फ्रान्सच्या राजाच्या मुलीचाच हा मुलगा पण पुढे फ्रेंचांनी त्याचा पराभव केला पुढे परत इंग्लंडच्या पाचव्या हेन्रीने ताबा मिळवला त्याने फ्रान्सच्या राजाला जबरदस्ती जावई करून घेतला व नातवाला गादी देण्याच्या अटीवर फ्रान्सचा ताबा सोडला त्यालाच Treaty of Troyes म्हणतात त्याच्या मृत्यूनंतर सहावा हेन्री, फ्रान्स व इंग्लंडचा राजा झाला इंग्रज सैन्यच त्याच्या दिमतीला होते

त्याचा सावत्र भाऊ डॉफीन हा पण गादीवर हक्क दाखवू लागला त्याच वेळी एका शेतकऱ्याची मुलगी जोन ऑफ आर्क त्याच्या मदतीला आली देवाने आपल्याला फ्रान्सच्या मदतीकरता पाठवले आहे असं ती सर्वांना सांगू लागली मोठ्या धडाडीची होती, झाशीची राणीच जणू तिने फ्रेंच सैन्य आपल्या ताब्यात घेतले, व ती सेनापती बनली इंग्लिश सैन्याचा पराभव करून तिने डॉफिनला राज्यावर बसवले, पण ह्या धुमश्चक्रीत जोन ऑफ आर्क इंग्रजांच्या तावडीत सापडली ते तिला हडळ म्हणत व म्हणून तिला खांबाला बांधून त्यांनी जिवंत जाळली त्यामुळे फ्रेंच लोक चेकाळले. व त्यांनी इंग्रजांना पळवून लावले तिच्यामुळे जनता प्रथमच युद्धात पडली ती हुतात्मा ठरली अजूनही लोक तिची आठवण काढतात

सोळाव्या शतकात येथे धर्मयुद्ध झाले कॅथॉलिक्स व प्रोटेस्टंट ह्यात त्यातच त्यावेळचा राजा चौथा हेन्री मारला गेला धर्मगुरू रिचेली ह्यांनी वीस वर्षं राणी मारी–डी–मेडिची हिच्या सहाय्याने राज्यकारभार हाकला ह्याच काळांत फ्रान्स बलाढ्य बनले लोकांना धर्मस्वातंत्र्य मिळाले

पुढे अनेक वर्षं कार्डिनाल मझारिन राज्य चालवत होता. छोटा १४वा लुई नाममात्र राजा होता तो मोठा झाल्यावर त्याने

कारभार आपल्या ताब्यांत घेतला. त्याने प्रोटेस्टंट्सना छळले अनेक युद्धामधे भाग घेऊन फ्रान्सने अतोनात नुकसान केले तो स्वत ला सन किंग म्हणवून घेई ह्यामुळेच जनता संघटित झाली व त्यांनी हक्काकरता बंड पुकारले १६वा लुई व त्याची राणी ह्याचा शिरच्छेद झाला

पाच लोकांचे डायरेक्टर बोर्ड बनवून राज्यकारभार सुरू झाला. त्यांना सैन्याची मदत घ्यावी लागे ह्याचा फायदा घेऊन फ्रेंच सेनापती नेपोलियन बोनापार्टने स्वत ला राज्याभिषेक करवून घेतला फ्रान्सने स्वातंत्र्य गमावले तरी स्थैर्य मिळवले नेपोलियनने कायदे तयार केले पोपशी सलोख्याचे संबंध ठेवले ऑस्ट्रिया प्रशिया व रशियाचा कांही भाग व इटलीवर कब्जा मिळवला. फ्रान्सला युरोपात मानाचे स्थान प्राप्त करून दिले

पण रशियाचा उरलेला भाग जिंकून परत येत असता रशियनांनी त्याच्या धान्याच्या साठ्याला आग लावली युद्धाकरता त्यान वेळ चुकीची निवडली बर्फ पडू लागला व उपाशी पोटी बर्फातून परताना अनेक सैनिक मृत्यूमुखी पडले फक्त एकषष्ठांश सैन्य परत आले त्यामुळे त्याची चीथू झाला जनतेने त्याला हकलून दिले १८वा लुई गादीवर आला

नेपोलियनने परत सैन्य जमवून फ्रान्सचा ताबा मिळवला पण त्याचे राज्य तीनच महिने टिकले. वॉटरलूच्या लढाईत त्याचा पराभव झाला

पुढे राजा असला तरी पार्लमेंट राज्यकारभार बघत असे पण बेकारी महागाई ह्याने संत्रस्त झालेल्या लोकांनी मोर्चे व आंदोलने सुरू करून राजाला पदच्यूत केले व १८४८ मधे स्वातंत्र्य घोषित केले. निवडणुका होऊन नेपोलियनचाच पुतण्या प्रेसिडेंट झाला, पण ह्याने परत स्वत.ला राज्याभिषेक करवून घेतला पण फ्रान्सला मॉडर्न बनवले. सुंदर इमारती बांधून घेतल्या, रेल्वे लाईनस् व मोठे रस्ते बांधले

इजिप्तशी सगनमत करुन फ्रेंच इजिनिअर्सनी सुएझ कालवा खोदला ह्या बरोबरच राज्य वाढवायला सुरवात केली नीस व सॅव्हॉय हा इटलीचा भाग फ्रान्सला जोडला जर्मनीतील स्ट्रासबर्ग राज्याला जोडले

प्रशियाच्या जर्मन राजाने त्याचा पराभव करुन त्याला कैद केले त्याला सुटका करून घ्यायला पाच अब्ज फ्रँक्स मोजावे लागले ह्याचा फायदा घेऊन परत लोकशाही सुरु झाली हे असेच चालू असतानाच फ्रान्सची प्रगती होत होती, राज्य वाढत होते आफ्रिकेतील मोरोक्को व ट्युनिशिया मधे राज्य प्रस्थापित केले तसेच इंडोचायना लाओस कंबोडिया व्हिएटनाम पण ताब्यात घेतले

दुसऱ्या महायुद्धात जर्मनानी फ्रान्स ताब्यात घेतला मार्शल पिटेन ह्याने तह करुन जर्मनाच्या मदतीने सरकार स्थापन केले पण जनता नाराजच होती आंदोलने सुरु झाली जनरल द गॉल गुपचुप इंग्लंडला पळाला त्याने इंग्लंड व अमेरिकेच्या मदतीने ६ जून १९४४ मधे नॉर्मंडी मधून शिरकाव करून जर्मनांवर हल्ला केला व एक एक करत सर्व फ्रान्स परत मिळवला हा इतिहास तर सर्वांना माहितच आहे इ सन् १९४५ मधे जनरल–द–गॉल प्रेसिडेंट झाला त्याच वेळी इतर फ्रान्सच्या वसाहतीपण स्वतंत्र झाल्या

असा फ्रान्सचा इतिहास फारच क्लिष्ट व रक्तरंजित आहे सतत युद्धे होत असूनही त्याची प्रगती वाखाणण्या सारखी आहे. फ्रेंच लोक कलासक्त सौंदर्याची आवड असणारे आहेत युद्धामुळे ते कणखर व चिवट बनले आहेत एक फ्रेंच लेखक म्हणतो फ्रान्स म्हणजे फक्त जमीन, माणसे व राज्य नसून फ्रान्स ही स्फूर्ती आहे स्फुलिंग आहे

दोन हजार तासात दोन हजार वर्षांतून हिंडून आलो आता प्रथम बस बाहेर लक्ष गेले कारण तसा फ्रान्सचा हा भाग रुक्ष आहे मध्य फ्रान्स सपाट व वैराण आहे. तुरळक वस्ती. घर पण जुनाट पद्धतीची फक्त लांबच लांब शेत आता हिरव्या शेता बरोबरच

पिवळा धमक गालिचा पसरलेला दिसला ही मोहरी सारखी फुले ह्याना पुशो म्हणतात ह्या पासून तेल काढतात

उन्हाळयात तर ह्या भागात वणवे पेटतात इथेही अधून मधून रोमन अवशेष दिसत होते आता पुढे द्राक्षाचे मळे सुरु झाले मैल न मैल मळ्यात एक ही घर दिसेना की जनावर दिसेना

आता वाळूच्या टेकड्या दिसू लागल्या गाव फारच लाब लाब आहेत. एका गांवाजवळ रेस्ट पोस्ट वर चहा करता थाबलो अमेरिकेत कोणत्याही कॅफेटेरियात फ्रेंच फ्राईज व टोस्ट मिळतो पण इथे फ्रेंच फ्राईज औरवाताही दिसले नाहीत शिवाय स्लाइस्ड ब्रेड पण

आता द्राक्षाच्या मळ्याबरोबर ऑलिव्हची झाडे पण दिसायला लागली हिरव्या द्राक्षाच्या मळ्या मधून पिवळी पुशोची फुल व मधून मधून लाल मातीचे पट्टे त्यामुळे हा वैराण भाग पण रगीन दिसत होता

दोन तासातच आम्ही हॉटेल अथेना टॉल्स्टॉय मधे पोहोचलो मालक ग्रीक असावा

रात्री सेल्फसर्व्हिसचे जेवण असल्याने सँडविचेस खायची वेळ आली नाही.

आज १५ मे

ब्रेकफास्टला क्रोसाड होते. ८ वाजता बस निघाली. आज परत बू महाराज दुसरीकडे बसलेले दिसले लीच्या वडिलाच्या आकडूपणाचे कारण पॅरिसला गेल्यावर कळले

पॅरिस पर्यंतचा प्रवास ३०० मैलाचा होता म्हणजे सहा–सात तास. आता आम्ही बर्गंडी मधून चाललो होतो इथे सर्वांत जास्त द्राक्षाचे मळे आहेत इथली वाईन बर्गंडी वाईन म्हणून प्रसिद्ध आहे.

आता आम्ही प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात होतो व आत्ता निवांत वेळ होता म्हणून लिंडानी एक प्रश्न पत्रिका काढली तिच्या कॉमेंट्रीवर आधारित सोळा प्रश्न तिने घातले नोट्स काढल्या

असल्या तरी आठवत नव्हते सर्वांच्या इतिहासाचो गल्लत होत होती. पण तरी त्यावरचे प्रश्नाची उत्तरे आली पण १८० बोगदे कोण मोजत बसणार ? बसच्या चाकाचा आकडा पण चुकला लिंडा व निकीच्या वयाची बेरीज फक्त एकाचीच बरोबर आली काही लोक स्पर्धांच्या बाबतीत नशिबवान असतात हेच खर आठ वर्षांच्या सुदरचा पहिला नंबर आला माझा दुसरा

कांहीनी ही स्पर्धा सिरिअसली न घेता मुद्दाम मजेदार उत्तरे लिहून जोक केले होते लिंडा व निकीच्या वयाची बेरीज फक्त ३० लिहिली होती

ह्या प्रश्नोत्तरांत दोन तास भरकन् गेले लिंडाने आम्हाला कधीहि बोअर होऊ दिले नाही

लंच ब्रेक घेऊन आम्ही डिजॉन ह्या गावावरुन चाललो होतो कॅनॉलच्या काठाने सुंदर सुंदर शॅटोज व डान्सक्वल .आहेत हॉटेलच्या बाहेर मोठाल्या छत्र्या लावून टेबले व खुर्च्या ठेवलेली होती

आता आम्ही शॅंपेन ह्या भागात आलो

ह्या भागांतील द्राक्षे उत्तम जातीची असतात ह्या पासून डॉन पॅव्हे नियॉन ह्याने प्रथम शॅंपेन तयार केली शॅंपेन म्हणजे गॅस असलेली वाईन हा गॅस नैसर्गिकरित्या तयार केला जातो. सॉफ्ट ड्रिंक्स सारखा कृत्रिम भरत नाहींत शॅंपेन बनवण्याचे तंत्र अवघड व महागडे आहे व जगांत दुसरीकडे कोठेच ती होत नाहीं म्हणून शॅंपेन महाग तर असतेच शिवाय ते एक शिष्ट संपत प्रतिष्ठेचे पेय बनले आहे कणाचेही सेलिब्रेशन म्हणजे शॅंपेनची बाटली फुटलीच पाहिजे शॅंपेनची पार्टी म्हणजे आनंदोत्सव असे समीकरणच झाले आहे.

एक लॉट तयार व्हायला पाच वर्षे लागतात. परत बाटल्या भरून ३ ते ५ वर्षे ठेवावे लागते. एकदा बाटली फोडली की संपवावीच लागते.

शँपेन वरून पुढे गेलो फ्रान्स मध्ये घोड्यांची पैदास मोठ्या प्रमाणावर. होते घोड्याचे मास हे त्यांचे पक्वान्न आहे तसेच ससाचे मास पण हे लोक आवडीने खातात

फ्रेंच लोक उत्तम स्वयपाकी असतात खाण्या पिण्याच्या बाबतीत फार काटेकोर कोणती वाईन कोणत्या मेन्यू बरोबर घ्यायची ते ठरलेले असते जेवताना वाईन घेतातच

मध्ये एकदा कॉफीब्रेक होऊन पुढे निघालो पॅरिस जवळ आल्याची खूण म्हणजे रस्त्याच्या लेनस् वाढत चालल्या. दोन च्या ४ करत १० लेन्सचा रस्ता झाला

आमचे हॉटेल तसे गावा बाहेरच होते. इथून रस्ता परत लहान व्हायला लागला शहरात रस्ता परत दोन लेन्सचा होतो.

हॉटेल इबिसच्या आवारात बस आली आजूबाजू भाग रूक्ष होता. पॅरिस मध्ये आहोत असं वाटेच ना इबिस अगदीच इब्लिस निघाले. खोल्या काही खास नव्हत्या पॅरिस सारख्या सुंदर शहरात अशा थर्डक्लास हॉटेलमध्ये रहायला लागावे, काय हे दुर्दैव

# पॅरिस

समजायला लागल्या पासून पॅरिसचे गुणवर्णन ऐकत आले आहे अनेक चित्रपटातून पॅरिसचे एफिल टॉवर बघितले आहे मायानगरी, मोहनगरी, फॅशनचे आगर, कलेचे माहेर घर अशी अनेक बिरूदे जिने मिळवली त्या नगरीच्या सानिध्यात आम्ही येऊन पोहोचलो होतो

आत्ता पर्यंतचे प्रत्येक शहर एका पेक्षा एक वरचढ निघाले. पॅरिस त्याचा शिरोमणी इथे १० वाजेपर्यंत दिवस होता 'आज इव्हिनिंग इन् पॅरिस अनुभवायचे होते व मग एफिल टॉवरच्या पार्श्वभूमिवर ग्रुप फोटो काढायचा होता.

आज कसली तरी सुट्टी असल्याने बाजार बंद होता त्यामुळे खरेदीचा प्रश्नच नव्हता आणि तेच बरे नाही तरी पॅरिस हे खरेदी करता नाहींच

आजच जेवण आपच आम्हालाच घ्यायच होत पण ज्यांना गांवात हॉटेलमधे जायच असेल त्याच्याकरता बस जाणार होती जेवणानतर आठ वाजता शहरात जायच होत

आम्ही आराम करुन सात वाजता खाली आलो डायनिंग रूम मधे दोन सुंदर गोऱ्या, निळ्या डोळ्याच्या वेटरेसेस उभ्या होत्या त्याना मेन्यू विचारला तर खांदे उडवून एकमेकींकडे बघत उई उई करत राहिल्या. त्याना इंग्लिश समजत नव्हत. तेवढ्यात एक वेटर आला त्याला समजल पण बोलता येईना. त्याने तेथले एक भाडे उघडून व्हेजिटेबल सूप आहे हे दाखवले आम्लेट बद्दल विचारले तर अंडी संपली म्हणाला बाकी व्हेजिटेरियन काहीच नव्हत

बाहेर कोठे ब्रेड मिळते का ते बघायचे ठरवले इकडे बरीच वस्ती दिसत होती, मोठ मोठी अपार्टमेंट हाऊसेस होती बसेस धावत होत्या बहुधा फॉरीन स्टूडंटस् जास्त दिसत होते

आम्ही चौघे व मलेशिअन चौघे आमच्याच मागोमाग होते तेवढ्यात एका तरूण मुलाच्या पिशवीतून फ्रेंच ब्रेडचे टोक वर आलेले दिसले तो चालतच चालला होता त्या बरोबर 'युरेका' म्हणून ओरडायचेच तेवढे बाकी ठेवले धावत जाऊन त्याच्या भोवती गराडा घातला व दुकान कोठे आहे म्हणून विचारले तो बिचारा घाबरुन गेला ठेंगणासा लहान चणीचा होता आमच्या सारखाच

घड्याळ बघून तो म्हणाला दुकान आता बंद झाल असेल, हव तर ही ब्रेड घेऊन जा बिचाऱ्याने ब्रेड काढली आम्ही नको म्हणताच घाई घाईने तो सटकला आम्हाला खूप मजा वाटली आम्ही मगीग करू अस त्याला वाटल असेल.

आम्हाला ब्रेड मिळालीच नाही पायपीट मात्र चांगलीच झाली हॉटेल मधे येऊन, वाढवलेले फुलकवणी सूप व कडक ब्रेड खाल्ली. मात्र त्याना फ्रेंच फ्राईज म्हटल्यावर त्याने गरम गरम तळून आणून दिलेत ह्या जेवणाला आम्हाला प्रत्येकी ४६ फँक्स मोजावे लागले. म्हणजे जवळ जवळ १८० रुपये

आज फोटोचा कार्यक्रम असल्याने चागले पोशाख घालून सर्व लाऊजमधे बरोबर आठ वाजता जमा झाले लाऊजमधे आला तर 'लि' वि 'तिच्या आई-वडिलाबरोबर एक चिनी तरुण स्मार्ट पोरगा बोलत बसला होता हाच मुलगा सध्याकाळी हॉटेल मधे बघितला होता म्हणजे तो ह्यानाच रिसीव्ह करायला आला असला पाहिजे कोणी नातेवाईक होता की वधू परिक्षा करायला आला होता ? ली चे वडील आला अगदी खूष दिसत होते पण ली मात्र रडवेली दिसत होती 'चू' चा पण चेहरा पडला होता अरे, ये क्या हो रहा है ? अस विचारण्याची पण सोय नव्हती

ते तिघेही बहुधा त्या मुला बरोबर गेले असावेत. त्याची ट्रिप इथेच सपली असावी कारण पुढे ते आम्हाला दिसलेच नाहीत

आमच्या रोमिओ ज्युलिएटची गोष्ट अर्धवटच राहिली नृ व ली ने एकमेकाचे पत्ते घेतले असतील का ?

गोष्टीचा शेवट वाचकानेच करावा.

आठ वाजता आमची बस शहराकडे निघाली. इ सन ९८७ पासून पॅरिस ही फ्रान्सची राजधानी आहे इतकी युद्धे व क्रांत्या होऊनही पॅरिसच्या सौंदर्यात भरच पडत राहिली सुंदर सुंदर भव्य इमारती १४ वा लूई व नेपोलियनच्या काळात बांधल्या गेल्या परन्तु त्यावेळचे आर्किटक्चर एका छापाचे वाटते परन्तु वेळो वेळी काळानुसार बदलत्या पद्धतीच्या इमारती पण इथे आहेत पॅरिस तर कलेचे माहेरघर नित्य नव्या फॅशन्स इथे निर्माण होत असतात पॅरिसमध्ये नव्या जुन्याचा सुंदर संगम दिसून येतो लहान रस्ते व नक्षीकाम केलेल्या इमारती प्रमाणेच भव्य रस्ते व स्टीलच्या इमारती पण इथे दिसतात

एका रस्त्याने जात असता दुतर्फा दुकानाच्या शोकेसेस मधे आकर्षकपणे मांडून ठेवलेल्या सुंदर सुंदर वस्तू दिसल्या, निरनिराळ्या फॅशन्सचे कपडे ल्यालेल्या दागिन्यानी मढलेल्या मॅनिकिन्स म्हणजे सौंदर्यवतींचे पुतळे निरनिराळ्या पोझ मधे ठेवलेले होते परंतु आज दुकाने बंद होती व हा बाजार खूपच महागडा आहे श्रीमंत लोकासाठी आहे असे गिडाने सांगितले असल्याने नुसते बघूनच समाधान मानावे लागले सगळ्याच मोठ्या शहरातून अशा बाजारपेठा किंवा दुकाने असतात व ह्या दुकानातून माल घेणे प्रतिष्ठितपणाचे समजले जाते

## पॉम्पीडू सेंटर

त्यानंतर एक अगदी मॉडर्न आर्किटेक्चरची बिल्डिंग बघितली ही सहा मजली इमारत लोखंडी व ओतीव लोखंडाच्या खांबानी बनवलेली आहे त्यामुळे एखाद्या कारखान्यातील इंजिनसारखे वाटते पाण्याचे पाईप, विजेच्या तारा व सांडपाण्याचे पाईप हे सर्व तीन मोठ्या पाईपस् मधून इमारतीच्या दर्शनी भागातूनच नेलेले आहेत.

ह्या तीन पाईप्सना निळा, लाल व हिरवा रंग दिलेला आहे व ह्या पाईप्सची जॉमेट्रिकल डिझाईन्स केलेली आहेत जिना पूर्ण काचेने बंदिस्त असून बाहेरुनच वर पर्यंत गेलेला आहे

ह्या इमारतींत धान्य बाजार व फळ बाजार आहे हे पॉम्पीडू सेंटर पॅरिसच्या कामगार वस्तीत, 'जिला पॅरिसचे पोट' म्हणतात तेथे आहे

पॅरिसमधे अनेक मोठाले चौक जुन्या काळच्या उंच इमारतींनी वेढलेले आहेत ह्या चौकांमधे उंच स्तंभ, नाहीतर स्मारक किंवा कारंजी आहेत बाजूनी हिरवळ व फुलझाडे लावलेली आहेत ह्यांचा उपयोग लोक फिरण्याकरता पार्क सारखा करतात

सर्व रस्त्यावर दुतर्फा झाडे असल्याने रस्ते शीतल व शांत वाटतात सीन नदीवर अनेक पूल आहेत पुलाच्या सुरवातीला शेवटी व मधे पुतळे उभारलेले आहेत ह्या पुतळ्यामधे पंख असलेले देवदूताचे पुतळे जास्त दिसतात अनेक इमारतीवर पण पुतळे व फुला पानाची नक्षी कोरलेली दिसली मोठ मोठ्या स्तंभानी आधार दिलेल्या व वर घुमट असलेल्या इमारती बऱ्याच दिसल्या लू ह ह्या प्रकारच्या म्हणजे उंच उंच खिडक्या कमानींचे दरवाजे असलेल्या व वरच्या बाजूला छता जवळ हवा खेळण्या करता झरोके असलेल्या इमारती पण खूप आहेत इथला राजवाडा पण त्याच पद्धतीने बांधलेला असल्याने त्याला लूव्हच म्हणतात (Louvre) आज बस मधून नुसतीच झलक बघितली

एवढ्यात एफिल टॉवर दिसायला लागले. आम्ही टॉवर समोरच्या पॅलेझ द चेलॉट ह्या म्यूझियमच्या आवारात आलो एफिल टॉवरच्या पार्श्वभूमिवर आमचा ग्रुप फोटो घ्यायचा होता पॅलेझ-द-चेलॉट उंचावर आहे. तेथून एफिल टॉवरच्या बाजूला खाली एक सुंदर लंबवर्तुळाकार जलाशय आहे जलाशयाच्या दोन्ही बाजूनी खालून वर चढत जाणारा बगीचा आहे जलाशयात अनेक कारंजी आहेत ह्या कारंज्याचा सामुहिक नाद एखाद्या ऑर्केस्ट्रा सारखा कानाला गोड वाटत होता

ह्या जलाशयानंतर सीन नदीवरचा पूल येतो व लगेच एफील टॉवरचा परिसर सुरु होतो ह्या ठिकाणी अनेक निग्रो मुले छोटया छोटया वस्तू विकत होते, त्यात उडणारे पोपट, चिमण्या, आवाज करणारे पक्षी व माळा पण होत्या उडणारे पोपट खरोखर छान दिसत होते दोरा ओढल्यावर ते एक मोठी गिरकी घेऊन येत होते परतु ह्या वस्तुचा अनुभव असा आहे की ह्या फक्त त्या विक्रेत्या-च्या आज्ञेत असतात आपण घेतल्या की रुसून बसतात.

आमचा फोटोग्राफर तेवढ्यात आलाच आत्ता ९॥ वाजताही चागला उजेड होता

फोटोचा कार्यक्रम झाल्यावर, आम्ही खाली कारज्यापाशी हिंडायला गेलो आता अधार पडू लागला खालच्या बगीच्याच्या पलिकडेच सीन नदी दिसते एकाएकी नदीचे पात्र असख्य रगीबेरगी दिव्यानी झगमगू लागले अनेक बोटी किनाऱ्यावर उभ्या होत्या व ह्या बोटींवरच दिव्याची रोशणाई केलेली होती

रात्री ह्या बोटीवर डीनर पार्टी असते सगीत जेवण घेत घेत नदीतून फेरफटका मारायचा रोम मधे एकदा सगीत जेवणाचा आस्वाद घेऊन झाला होता म्हणून ह्या बोटी आम्ही दूरूनच बघितल्या

## मोलीन रोग

इथून आम्ही पॅरिसचे आकर्षण असलेल्या नाईट क्लब मधे जायला निघालो पॅरिस म्हणजे जसे एफिल टॉवर तसेच नाईट क्लब असे समीकरणच आहे

प्रवाशाच्या मनोरजना करता व त्याना लुटण्याकरताच हे क्लबस् आहेत.

हा परिसरच वेगळा आहे येथे ओळींनी अनेक क्लबस् आहेत ह्याना इथे सेक्स शॉप्सच म्हणतात प्रत्येक क्लब दिव्यांनी मढवलेला असल्याने झगमगत होता इथल्या प्रसिद्ध मोलिन रोग

ह्या क्लब मधे आम्ही गेलो ह्या क्लबवर लाल रंगाची पवनचक्की बसवलेली आहे हे ह्याचे वैशिष्ठय

आत मधे एक छोटेसे स्टेज व समोर खुर्च्या मांडलेल्या मधून मधून टेबल्स पण ठेवलेली होती स्टेजची सजावट बघून सर्कशीचीच आठवण झाली. एका बाजूला वरच्या पातळीवर ऑर्केस्ट्रा होता पूर्ण शो म्हणजे एक प्रकारची सर्कसच वाटली

आधी वातावरण तयार करण्याकरता सर्वांना वाईन दिली गेली. वाईनचे घुटके घेत आम्ही मनाची तयारी केली जे समोर दिसेल ते बघण्याकरता

सुरवातील एका माणसाने अभिवादन करून काही जोक्स सांगायला सुरवात केली

त्यानंतर झगमगीत तंग पोशाखातली स्त्री स्टेजवर आली व तिने कार्यक्रमाचा ताबा घेतला ऑर्केस्ट्रा आता मंद आवाजात वाजू लागला तिने कार्यक्रमाविषयी सांगितले, तेवढ्यात १० ते १२ टॉपलेस सौंदर्यवती डोक्यावर पिसाचे मुगुट, कमरेला पिसाचे शेपूट व पऱ्यांसारखे पिसाचे पंख लावलेल्या धावत स्टेजवर आल्या ऑर्केस्ट्राचा आवाज चढला, लयपण वाढली. डोंबारी जसे हातावर कोलाट्या मारतात तशाच कसरती त्या मुलींनी केल्या व निघून गेल्या त्यानंतर बऱ्याच प्रकारची नृत्य नाट्ये किंवा बॅलेज त्यांनी केले सरकशीतल्या प्रमाणे ह्या सर्व गोष्टी द्रुतलयीत चालू होत्या

गोऱ्या गोऱ्या रेखीव बांध्याच्या उंच सडसडीत पोरी एखाद्या शिल्पासारख्याच वाटत होत्या त्यामुळे त्या टॉपलेस असल्याचे भानच रहात नव्हते त्यामुळे किळसवाणे किंवा बघवत नाही असे एकदाही झाले नाही ५-१ मिनीटांतच आपली दृष्टी सरावते व मग आपण त्यांचे फक्त सौंदर्य बघू लागतो. हा अनुभव आला कांही नृत्यात त्यांचे बरोबर अर्ध नग्न पुरुष पण होते जे काही थोडे कपडे कमरेला होते ते पण रंगीबेरंगी, झगमगते असल्याने सोनेरी रूपेरी व इतर रंगाचा सोहोळाच स्टेजवर दिसत होता

३–४ नृत्यानतर सर्व प्रेक्षक मत्रमुग्ध होऊन बसले असतानाच, आधीची स्त्री स्टेजवर आली तिने प्रथम प्रेक्षकाची स्तुती करुन चार प्रेक्षकाला स्टेजवर यायचे आव्हान दिले पण कोणीच समोर येईना तेव्हा तीच प्रेक्षकात शिरली तिला चार जण निवडायचे होते म्हणून कोणाची हनुवटी धरुन मान वर उचल, तर कोणाला डोक्यावर टप्पल मार असे करत तिने चार पुरुष निवडले.

तीन प्रौढ व एक तरुण होता प्रौढात आमच्या ग्रुपचे दोघे होते दोघेही जोकर सारखेच दिसत होते एकाची बायको बरोबर होती पण तो क्लब मधे मात्र बायको जवळ बसलेला नव्हता बहुधा मुद्दामच लाब बसला असावा

मग त्या स्त्रीने ह्या चौघांची नाचाची स्पर्धा जाहिर केली जो कोणी तिच्या मते जिंकेल त्याला ती बक्षिस देणार होती ऑर्केस्टा सुरु झाला एकेकाने त्याला जमेल तसा भागडा केला आमच्यातल्या त्या एकट्या बसलेल्या जोकर ने खूपच जोशात डिस्को केला व तो पहिला आला बाकीचे तिघे आपल्या आपल्या जागेवर गेले आता ती सुदरी ह्याला काय बक्षिस देते ह्याची सर्वांना उत्सुकता लागली तिने टाळी वाजवताच एक टॉपलेस सुदरी तोंडावर जाळीदार बुरखा घेऊन समोर आली व त्याला घेऊन आत निघून गेली

आता त्या स्त्रीची काहीकाही बडबड चालू झाली, कांही पांचट जोक्स पण तिने सागितले. तेवढ्यात तो जोकर एका बाळाला घेऊन रडवेल्या चेहेऱ्याने बाहेर आला त्याने तोंड पण असे केले होते की जणू म्हणत होता, आली का नसती पचाईत ? आता ह्याला कोण सभाळणार ? तेव्हा स्त्रीने 'चुकचुक' करत ते बाळ आपल्या ताब्यात घेतले व काळजी करू नकोस तुझ बाळ मी सभाळीन असे त्यास आश्वासन दिले आश्वासनाने खूष होऊन तो आपल्या जागी परतला ( ते बाळ अर्थात कचकड्याचे होते ) पण जागेवर आल्यावर परत त्याचा चेहरा रडवेला झाला कारण आता त्याची बायको त्याला दाटत होती. बिच्चारा !

ह्या नतर १–२ खेळ होऊन प्रोग्रॅम सपला १२ वाजून गेले होते आम्ही हॉटेलवर परत आलो

हा क्लब १८८९ मधे सूरु झाला त्यावेळी त्याचे स्वरुप वेगळे होते ॲमॅच्युअर्स क्लब होता तो हौशी कलाकाराना आपली कला येथे पेश करता येत असे किंवा कोठे चान्स मिळाला नाहीं तर कलाकार येथे येऊन आपली कला पेश करत असत पण पुढे ह्याचा दुरुपयोग सुरु होऊन त्याला सेक्स शॉपचे स्वरुप तर आलेच व आजूबाजूला आणिक पण दुकाने निघाली स्पर्धा वाढली तशी प्रोग्रॅमचे स्वरूप पण बदलले ह्या भागाला 'ब्लाश' म्हणतात

परमेश्वराने घडवलेल्या सुदर, सुबक, रेखीव स्त्रियाचे जिवत प्रदर्शन भरल्या सारखे वाटते अजठा, वेरूळ किंवा खजुराहोला सौंदर्यवतींचे पुतळे आहेत आर्ट गॅलरीज मधे सौंदर्यवतीना कॅनव्हास मधे बदिस्त केले आहे पण इथे त्याचे जिवत प्रदर्शन माडले जाते सौदर्यच बघितले तर किळस वाटत नाही, नाहीतर आपल्याकडले तमाशे, अगभर कपडे असूनहीं बिभत्स व अगविक्षेप व कुरुप चेहरे ह्यामुळे किळसवाणे वाटतात

ह्या सुदरीच्या हावभावात कोठेही बिभत्सपणा किंवा उत्तान पणा नव्हता सगळ कस खुल्लम खुल्ला खिलाडूवृत्तीने चाललेले

प्रतिष्ठित फ्रेंच नागरीक मात्र इकडे फिरकतही नाहीत प्रतिष्ठितपणा हा आपल्या गावा पुरताच असतो दुसरीकडे जाऊनच करायच्या ह्या गोष्टीं कारण दुसऱ्या देशांत तुम्हाला कोणी ओळखत नाही, त्यामुळे प्रतिष्ठेचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं

## नोटर डॅम

आज १६ तारीख सकाळी आठ वाजता पॅरिस बघायला बाहेर पडलो. येथील प्रसिद्ध चर्च नोटर–डॅम बघायला गेलो नोटर डॅम म्हटल्या वर व्हिक्टर ह्यूगोची प्रसिद्ध कादबरी जिच्या वर ह्च

बॅक ऑफ नोटर डॅम हा चित्रपट आहे त्याची आठवण झाली चित्रपटात इथलेच शूटिंग आहे

हे भव्य चर्च पॅरिसच्या जुन्या वस्तीत आहे लहान लहान बोळातूनच तेथे जावे लागले पण चर्चचे आवार मात्र वरेच मोठे आहे आवाराच्या सर्व बाजूंनी इमारती आहेत

ह्याचे बांधकाम ११६३ मधे सुरु झाले त्या आधी येथे रोमन काळातील देऊळ होते नंतर ख्रिश्चन धर्माचा प्रसार झाल्यावर त्याचे रुपांतर बॅसिलिकात झाले व नंतर हे चर्च बांधले गेले ह्याचे बांधकाम टप्या टप्याने झाले जवळ जवळ दोनशे वर्षांनी त्याला आजचे स्वरुप आले आहे. अनेक युद्धे व राज्यक्रांत्या ह्यामुळे अनेक वेळा ह्याची पतझड होऊन परत उभारणी झाली आहे हे चर्च १३० फूट उंच असून तीन मजली आहे आडव्यात पण त्याचे तीन भाग होतात

खालच्या मजल्याला तीन मोठी कमानीची दारे आहेत व त्यावर ओळीने त्याकाळातील इस्त्रायल व जुरा राजांचे अठ्ठावीस पुतळे उभारलेले आहेत पहिल्या मजल्यावर गॅलरी आहे दुसऱ्या मजल्याला मधोमध एक मोठी गोलाकार खिडकी असून त्या समोर गॅलरीच्या कठड्यावर मॅडोनाच्या मुलाला घेतलेला पुतळा व दोन्ही बाजूंना दोन देवदूतांचे पुतळे आहेत. त्याच्या पलिकडे अॅडम व इव्हचे पुतळे आहेत

खिडकी सोडून बाजूच्या दोन भागावर उंच उंच कमानीच्या दारांचे तिसरे मजले आहेत, त्यावर कमानीचे छप्पर असून ठिक-ठिकाणी राक्षस व विद्रुप चेहऱ्याच्या माणसाचे पुतळे खालच्या राजाच्या पुतळ्याकडे खाऊ की गिळू ह्या नजरेने बघत उभे आहेत

राजे व गरीब प्रजा ह्याच्यातील संघर्ष अशा तऱ्हेने व्यक्त केला आहे खालच्या दाराच्या कमानीवर माणसाचे व बायका मुलांचे प्रतिकात्मक पुतळे आहेत.

जवळ जवळ सात शतकापासून हे पुतळे उभे आहेत १७९३ मधे जनतेने राजाचे पुतळे काढण्याचा प्रयत्न केला पण तो असफल झाला

ह्या चर्चचा आतील भाग पण भव्य आहे बायबल मधील अनेक व्यक्तिचे पुतळे व प्रसग आत भिंतीवर कोरलेले आहेत मधला हॉल तीन मजले उंच असून बाजूनी गॅलरीज आहेत गॉथिक काळातील स्थापत्यशास्त्राचा हा एक नमूना आहे

## द कॉनसर्ज

इथून आम्ही १३ व्या शतकात फिलिप–द–फेअर ह्या राजाने बांधलेला सीन नदी काठचा राजवाडा बघायला गेलो ह्याला 'द कॉनसर्ज' हे त्यावेळच्या गव्हर्नरचे नाव दिले आहे

फ्रेंचराज्यक्रांतीच्या वेळी ह्या राजवाडयाचा उपयोग जनतेनी राजकैदी ठेवायला केला होता हा राजवाडा पण गॉथिक काळातीलच आहे ह्या राजवाडयाच्या चारी कोपऱ्यावर चौकोनी स्तंभ असून वर टॉवर आहे शिवाय मधे मधे गोल स्तभ आहेत व त्यावर नरसाळयाच्या आकाराचे घुमट आहेत अनेक खिडक्या असलेला हा लाबलचक राजवाडा दगडाचा आहे. आता ह्या ठिकाणी हायकोर्ट आहे. त्याला पॅलेज–द–जस्टिस म्हणतात.

## व्हिक्टरी चौक

रोम प्रमाणेच जुने पॅरिस हे पुतळयाचे शहर म्हणायला हरकत नाही चर्चसवर पुतळे आहेतच पण इमारतींवर व चौकांमधे पण पुतळेच पुतळे दिसतात.

व्हिक्टरी चौकात १४ व्या लूईचा घोडयावर बसलेला पुतळा आहे. त्याच्या चारी बाजूनी मधे एक रस्ता सोडून एक सारख्या इमारती बाधलेल्या आहेत व पूर्वी इथल्या प्रसिद्ध व्यक्ती येथे रहात असत.

## लूव्ह

लूव्ह ही लांबलचक बिल्डिंग १७ व्या शतकात बांधलेली आहे तिचे बांधकाम वेगळया धर्तीचे वाटते लूव्ह ह्याचा अर्थच उंच व वर व्हेंटिलेटर असलेली खिडकी

खालच्या मजल्याला अशा अनेक उंच खिडक्या आहेत दुसरा मजला अनेक दुहेरी खांबाचे आधार देऊन बांधलेला आहे म्हणून ह्या बिल्डिंगला कोलोनेड म्हणतात मध्यावर उतरत्या छप्पराचे प्रवेशद्वार आहे १६ व्या शतका नंतर बांधलेल्या सर्व बिल्डिंग्ज ह्याच प्रकारच्या दिसतात शिवाय ह्या खांबांवर खाली व वर नक्षीकाम केलेले असते वरच्या डोमवर फुला पानाची व हाराची नक्षी दिसते शिवाय अनेक पुतळे त्या इमारतींची शोभा वाढवतात

## करुझल आर्क

नेपोलियनने आपल्या विजयाच्या स्मरणार्थ एक कमान बांधून घेतली आहे तिला 'करुझल आर्क' म्हणतात ही १२० फूट उंच असून तिच्या मुख्यद्वारावर दोन देवदूत कोरलेले आहेत बाजूच्या दोन लहान दारांवर नेपोलियनच्या विजयाचे प्रसंग कोरलेले आहेत. कमानीच्या माथ्यावर ओतीव लोखंडाचे चार घोडे व मधोमध शांततेचा पुतळा आहे पूर्वी नेपोलियनने व्हेनिसच्या सेंट मार्कस्च्या बॅसिलिकावरुन हे चार घोडे काढून आणून इथे ठेवले होते परंतू नंतर इटलीशी तह झाल्यावर १८१५ मधे ते इटलीला परत केले व त्याच्या सारखेच घोडे बनवून तेथे ठेवले

पुढे एक अष्टकोनी चौक लागला ह्याच्या मध्यावर १४५ फूट उंच स्तंभ असून ह्या स्तंभाला लोखंडी जाड वायरचे विळखे घातलेले आहेत जणू एखाद्या प्रचंड लांबलचक भुजंगानेच विळखा घातलेला आहे ह्या स्तंभावर पूर्वी १४ व्या लूईचाच पुतळा होता पण पुढे तो काढून चवथ्या हेन्रीचा व नंतर नेपोलियनचा पुतळा

त्यावर उभारला गेला फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी ह्या पुतळ्याला पदच्युत व्हावे लागले होते परंतु नंतर परत त्याची स्थापना तेथेच झाली.

## ऑपेरा थिएटर

पॅरिसमध्ये असे चारही बाजूंनी इमारतींनी वेढलेले बरेच चौक आहेत एकच मोठा रस्ता त्यांतून जातो व मधोमध स्तंभावर पुतळे आहेत अशाच एका चौकात फ्रान्समधील सर्वांत जुने ऑपेरा थिएटर बघायला मिळाले ह्याचे क्षेत्रफळ १२,००० चौ फूट आहे इथे दोन हजार प्रेक्षकांची सोय होते एकावेळी ४५० लोक स्टेजवर राहू शकतील एवढे मोठे स्टेज आहे १८६२ मधे तिसऱ्या नपोलियनच्या काळात हे बांधले

खालच्या मजल्याला अनेक कमानी त्यावर दुहेरी खांबाचा दुसरा मजला त्याला उंच उंच खिडक्या, त्यावर नक्षीकाम केलेले पॅनल. स्तंभावर पुतळे, कमानीवरपण काही प्रसंग दाखवणारे पुतळे त्यावर उंच घुमट घुमटावर मुगुटा सारखे डेकोरेशन त्यावर व इमारतीच्या दोन्ही कोपऱ्यावर पंख लावलेल्या देवदूतांबरोबर अनेक संगमरवरी पुतळे. घुमटावर हार सोडल्यासारखे कोरीव काम व वेलबुट्टी.

एक ग्रीक आर्किटेक्चरचे चर्च बघितले. पूर्वी हे ग्रीक देवतेचे देऊळच होते ह्याचे वैशिष्ठ्य म्हणजे अनेक खांबांचा आधार असलेला पहिला मजला व वर मध्यावरुन दोन्ही बाजूला उतरते छप्पर मधल्या त्रिकोणांत अनेक प्रसंग कोरलेले अशा किती तरी वास्तू पॅरिस मधे दिसतात

## ग्रँड पॅलेझ

निओ गॉथिक पद्धतीचे, उतरत्या छप्परा ऐवजी अर्धगोलाकार घुमटा सारखे छप्पर असलेले ग्रँड पॅलेझ, ७८७ फूट लांब व ६५ फूट

उच आहे प्रवेशद्वारावर गोल कमान असून बाजूला पुतळे आहेत ह्या ठिकाणी इ स १९०० मध्ये जागतिक प्रदर्शन भरले होते त्यानतर ह्या ठिकाणी सतत पेंटिंग्ज व इतर कला कृतींची प्रदर्शने भरत असत इथले मोटर-शाज् पण इथेच होतात ह्याच्या एका भागामध्ये कायमचे एक म्यूझियम आहे तेथे मानवाच्या प्रगतीचे टप्पे दाखवलेले आहेत दर वर्षी त्यात भर टाकली जाते व त्याना आपडेट केले जाते

आता आम्ही सीन नदीवरच्या एका मोठ्या पुलावरून जात होतो ह्याचे नाव अलेक्झाडर-३ हा पूर्ण पूल एका लोखडी कमानीवर आहे हा ३५० फूट लाब व १३० फूट रुद पूल इ सन् १९०० मध्ये बाधला ह्या पुलाच्या सुरवातीला व शेवटी स्तभावर गरूड आहेत मध्ये मध्ये पण अनेक दिव्याचे स्तभ असून दिव्याखाली पुतळे आहेत पुलाच्या कमानीला हार घातल्या सारखे कोरीव काम केलेले आहे

## कॉंकॉर्ड स्क्वेअर

पूल ओलाडून आम्ही परत एका मोठ्या पण मोकळ्या चौकात आलो. ह्याला कॉंकॉर्ड स्क्वेअर म्हणतात हा चौक खूपच भव्य आहे चार मोठे रस्ते इथून जातात चौकात दोन सुदर कारजी आहेत व मधोमध्य एक दीपस्तभ आहे ह्याच्या चारी बाजुनी चार दीप स्तभ असून ते स्तभ चार बाळानी धरले आहेत त्याच्या बाजूनी दगडाच्या मगरी आहेत त्याच्या तोंडातून फव्वाऱ्या सारखे पाणी उडून ते स्तभावर पडते मधल्या स्तभावर इजिप्शियन देवाचा पुतळा आहे

## प्लेस डी डॉल

कॉंकॉर्ड स्क्वेअरच्या पश्चिमेला, पॅरिसचा सर्वात पॉश भाग आहे. पूर्वी येथे दलदल होती पण नतर ती भरून काढून त्याचे रुपातर प्रसिद्ध शॉपिंग सेटर मध्ये झाले त्याला पूर्वी चॅम्प्स

इलिसिस म्हणत आता त्याला प्लेस डा गॉल म्हणतात ह्या भागात शहरातील श्रीमंत लोकांचे बंगले आहेत तसेच फॅशनेबल व मोठी दुकाने, हॉटेल्स, जगातील सर्व एअरलाइन्सची ऑफिसेस, थिएटर्स इथे आहेत ह्या भागाच्या प्रवेशद्वारा जवळ चौथऱ्यावर उभे असलेले दोन घोडे उडी मारण्याच्या पोझ मधे आहेत

## एफिल टॉवर

ह्या भागात नवीन पद्धतीच्या बिल्डिंग्ज आहेत उंच उंच अपार्टमेंट हाऊसेस पार करून आम्ही एफिल टॉवरच्या आवारांत आलो सीन नदीच्या काठावर एफिल टॉवर मोठ्या दिमाखात उभे आहे पॅरिसचा मानबिंदू अद्वितीय, त्याची आखणी, बांधणी व भव्यता मतिकुंठित करणारी आहे १८८९ मधे येथे भरलेल्या जागतिक प्रदर्शनाच्या निमित्याने हे टॉवर उभारले गेले तो काळ फ्रान्सच्या उद्योगधंद्याच्या दृष्टीने भरभराटीचा होता. नवनवीन शोध लागत होते व त्याचा उपयोग मानवाच्या प्रगतीकडे व जीवन अधिकाधिक आरामदायी व समृद्ध करण्याकडे कसा करता येईल ह्याचा विचार त्यावेळचे विचारवंत करत असत काच, लोखंड, पोलाद, ह्याचा अधिक वापर कसा करता येईल ह्याकडे लोकांचे लक्ष होते

स्टीलचा वापर करून घरे बांधता येतील असे वाटून प्रयोग म्हणून व जाहीरात म्हणून टॉवर बांधण्याचे इंजिनिअर गुस्टेव्ह एफिल ह्याचे स्वप्न १८८९ मधे पूर्ण झाले त्याच्या नावावरूनच ह्याला एफिल टॉवर हे नाव दिले गेले.

ह्याची उंची १०५० फूट असून १५,००० लोखंडाचे भाग जोडून बनवलेले आहे ह्याचा पाया सिमेंटच्या चार भक्कम स्तंभा-वर उभारलेला आहे चारी स्तंभ कमानीने जोडून त्यावर हे टॉवर वर निमूळते होत जाऊन गगनाला भिडल्या सारखे वाटते.

राजकपूरच्या 'संगम' ह्या चित्रपटाची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही बहुतेक अशा उंच टॉवर्सचा उपयोग काही निराश व

कमकुवत मनाचे लोक आत्महत्या करण्याकडे करतात इथून किती लोकानी जीव गमावले हे मात्र कळले नाही

आमच्या प्रमाणेच सारगन कुटुब पण बोट राईडला गेले नव्हते ते रस्त्याच्या मध्यावर असलेल्या आयलडवर, बाकांवर बसलेले दिसले

इथे अनेक ठिकाणी डबल रस्त्याच्या मध्यावर फुटपाथ बाधून बाके व फलझाडाच्या कुड्या ठेवलेल्या आहेत ही सोय छान वाटली

आम्ही बरेच लवकर आलो होतो मग ब्रेड मिळाली तर घ्यावी म्हणून हिडायला निघालो आमच्या नशीबाने ब्रेड मिळाली वाटेत आईस्क्रिम खाऊन आम्ही परत आलो तेवढ्यात बस आलीच हॉटेलवर परत आलो आज आमच्या जवळ ब्रेड होती. त्यामुळे सँडविचेस खाल्ली

उद्या आम्हाला युरोपचा निरोप घेऊन लडनला परतायचे होते गेले १२ दिवस आता स्वप्ना सारखे वाटू लागल कितीतरी दिवस आम्ही फिरतोय असे भासायला लागले

नाना देशाच्या नाना तऱ्हा. प्रत्येकाची खास वैशिष्टये, आवडी निवडी जगण्याची पद्धत किती निरनिराळी परतू भावना मात्र एकच

एकाच आदिमानवापासून विस्तारलेले हे जग, अवयव सर्व तेच परतू सर्व वेगवेगळे, प्रत्येक देशातील माणसांचा वेगळा छाप. नीट लक्ष दिल्यास हा फ्रेच हा इटालियन जर्मन, रशियन, अमेरिकन, अफगाण, मलेशिअन, इडियन, मुसलमान फिलिपिनो, चीनी, जपानी बरोबर ओळखता येतात.

इथल्या निसर्गाबरोबरच इथली माणस पण सुदर, गोरिपान नाकेली ऊच निळ्या डोळयाची छोटी मुल तर इतकी गुटगुटीत की जणू लोण्याचा गोळाच स्त्रियाचे सौदर्य मात्र थोडे उग्र पण त्यात एक प्रकारची प्रौढी वाटते" फ्रेच लोक वागायला पण थोडे तुटक

वाटलें त्याना इग्रजाविषयी अजूनही राग आहे फक्त अतिशय अभिमान आहे

परकीयाबद्दल जास्त अगत्य किंवा आपुलकी ते दाखवत नाहीत व इंग्लिश येत असले तरी बोलत नाहीत

आज १७ तारीख सकाळी ८ वाजता ब्रेकफास्ट घेऊन पॅरिसला रामराम ठोकला इथून कॅले ह्या फ्रान्सच्या बंदरावर जायचे होते कॅले ते डोव्हर हे अतर सर्वांत कमी आहे ते फक्त १ तासाचे

सतत युद्धाची टागती तलवार असूनही व अनेकदा ही राष्ट्रे वेगवेगळ्या राजाच्या आधिपत्त्या खाली येऊन सुद्धा ह्या सर्वच देशानी केलेली प्रगती वाखाणण्या सारखी आहे अनेक वेळा शहरे च्या शहरे उध्वस्त झाली परन्तु ह्या लोकानी चिकाटीने त्यांचे पुनर्वसन केले जुन्या इमारती परत उभारल्या व चिकाटीन प्रगती चालू ठेवली राज्य कोणाचेही असो नवनवीन शोध लागत च होते. प्रतीकूल परिस्थितीलच माणूस जास्त प्रगती करु शकतो आपल्या जवळ नसलेली गोष्ट मिळवण्याचा त्याचा अट्टाहास असतो गरज ही शोधाची जननी आहे असं म्हणतात अनेक महत्वाचे शोध युरोपात लागले आहेत

छोटया छोटया गोष्टी मधली कल्पकता बघितली की आश्चर्य वाटते टॉयलेट्स मधे नळाचे व त्याच्या नॉबस्चे किती प्रकार ! हॉटेल इलिस मधे वॉश बेसिनचा नळच उचलून शॉवर सारखा वापरायचा होता त्याला लांब कॉर्ड हाती

एका ठकाणी टेबल सोपकेस लावलेली बाजूच बटण दाबल तर सोपकेसच्या खालूनच पाणी येऊ लागल एका रेस्टपोस्ट वर सिंक मधे नळा पासून ठर विक अतरावर हात धरला की पाणी येते ते कळायला थोड ऑब्झरवेशन लागत.

कॅलेला आम्ही दोन तासात पाहोचलो इथे सी पोर्टवरच लिंडा व निकीचा निरोप घेतला

परतीचा प्रवास नेहमीच लवकर झाल्यासारखा वाटतो बसने आम्ही लडनच्या व्हिक्टोरिया टर्मिनस वर आलो श्री काळबाडे न्यायला आलेच होते आम्ही चौघेही त्याच्याचकडे गेलो

रात्री सौ ज्योत्स्नाच्या आई–वडिलाकडे बिजव्याकडे जेवायला गेलो संपूर्ण महाराष्ट्रीय साग्रसगीत जेवण १२ दिवसानतर मिळत होते आम्ही सर्व जण अक्षरश तुटून पडलो.

श्री व सौ बिजवे गेल्या ४० वर्षां पासून तेथे आहेत पण ते सुद्धा इडियनच राहिले आहेत शिवाजीराव पटवर्धनाच्या सानिध्यांत राहून त्यानी बरेच काही कमावले होते, ते तिकडे पण टिकून आहे त्याचा आध्यात्माचा पण बराच अभ्यास आहे शिवाजीराव पटवर्धनाच्या अनेक आठवणींना त्यानी त्या रात्री उजाळा दिला त्यामुळे आम्ही युरोपांतून परत आपल्या विश्वात प्रविष्ट झालो

REFBK-0025220

